शनिवार । ३० एप्रिल १९७७
७५ पैसे

# माणूस

शंकरराव चव्हाण
यांनी
अखेरपर्यंत
लढत का दिली ?
' माहितगार '
लिहितो....

शिवाय
इंदिरा-संजय पापवाचन
मोहिमेचे दुष्परिणाम
रत्नाकर महाजन, दिल्ली

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक अट्ठेचाळीसावा

३० एप्रिल १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# राज्य कोणाचे ?

## माहितगार

१६ एप्रिल १९७७ रोजी ' राजकारण संन्यासी ' वसंतरावदादा पाटील यांचे स्वप्न साकार झाले. यशवंतराव मोहिते यांचा दादांनी १०१ मतांनी पराभव केला. मुख्यमंत्रिपदासाठी झालेल्या लढतीमध्ये दादा व मोहिते उतरले. दादांना १८९ व मोहिते यांना केवळ ८८ मते पडली. ही लढत मुख्यमंत्रिपदासाठी झाली तरी, प्रत्यक्षात ती लढत महाराष्ट्रात नेतृत्व कोणत्या गटाचे राहणार या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी झाली, हाच दादा–मोहिते यांच्या सामन्याचा अर्थ आहे. शंकरराव चव्हाण यांनी आपल्या दोन वर्षांच्या कारकीर्दीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाला आव्हान दिले. यशवंतराव चव्हाणांना मानणाऱ्या लोकांशी शंकररावांनी संघर्ष निर्माण केला होता. यशवंतरावांचा पाठिंबा मिळवून वसंतरावदादा नेता निवडीच्या आखाड्यात उतरले. शंकरराव गटाने यशवंतराव चव्हाण यांच्या पश्चिम महाराष्ट्रातच त्यांच्या विरुद्ध फळी उभी केली. यशवंतराव मोहिते यांना दादांच्या विरुद्ध उभे राहावयास तयार केले असे नव्हे तर, यशवंतरावांच्या गटाविरुद्ध मोहिते यांना उभे केले. महाराष्ट्रातील केवळ इतर भागात यशवंतराव यांच्या विरुद्ध लोक आहेत असे नाही. खुद्द पश्चिम महाराष्ट्रात आणि त्यातल्या त्यात सातारा जिल्ह्यामध्येच यशवंतरावाविरुद्ध लोक आहेत हे १६ एप्रिल रोजी शंकररावांनी दाखवून दिले. दादा विजयी झाले म्हणून, शंकरराव गट पराभूत झाला हा या निवडणुकीचा सरळ नि सोपा अर्थ झाला. यशवंतरावांच्या बालेकिल्ल्यातच त्यांच्याविरुद्ध गट निर्माण करण्याच्या राजकारणात शंकरराव गट विजयी झाला आहे. विदर्भ विभागात वसंतराव नाईक यांचे नेतृत्व मानले जाते असे वातावरण निर्माण करण्यात आले होते. त्या विदर्भातही प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नरेंद्र तिडके, विधिमंडळ काँग्रेस-पक्षाचे उपमुख्य प्रतोद बबनराव मेटकर आदींना नाईकांपासून वेगळे करण्यात आले. पारडे कोणाचे जड आहे हे स्पष्ट दिसत असताना शंकरराव चव्हाण यांनी पश्चिम महाराष्ट्र–विदर्भ भागात चव्हाण–नाईक गटामध्ये फाटाफूट घडवून आणली आहे. ही फाटाफूट घडवून आणण्यात शंकरराव विजयी झाले आहेत. दादा नेते म्हणून विजयी झाले आणि मातब्बरांच्या अभेद्य मानल्या गेलेल्या बुरूजांना खिंडार पाडण्यात शंकरराव विजयी झाले असा दादा–मोहिते निवडणुकीचा खरा अर्थ आहे. सत्ता हातात असताना किंवा सत्ता हातात येण्याचा काळ असताना गट फोडणे सोपे असते. त्यात विशेष काही नाही. पण सत्ता जात असताना विदर्भ–पश्चिम महाराष्ट्रात शंकररावांनी यशवंतराव चव्हाण यांच्याविरुद्ध गट निर्माण केले आहेत. महाराष्ट्र काँग्रेसमध्ये नव्याने तयार झालेले गट येत्या काही वर्षांत कायम राहणार हे

उघड आहे. श्रीमती गांधी यांच्या कारकीर्दीमध्येच यशवंतरावांची महाराष्ट्र कॉंग्रेस, यशवंतरावांचा महाराष्ट्र, हे वातावरण नाहीसे झाले होते. श्रीमती गांधींचे नेतृत्व लोकसभा निवडणुकीनंतर छिन्नभिन्न झाले आहे. अशा परिस्थितीमध्येही महाराष्ट्र कॉंग्रेस यशवंतराव चव्हाण यांचीच आहे असे म्हणता येणार नाही. इतकी फाटाफूट शंकररावांनी करून ठेवली आहे. हे चांगले की वाईट या चर्चेत मी शिरत नाही. पण शंकररावांनी पाचर मारून ठेवली हे नक्की. नेता बदलण्याच्या कारस्थानामागचा खरा हेतू यशवंतराव चव्हाणांचे एकमेव नेत्याचे स्थान पुन: प्रस्थापित करणे हा होता. हे स्थान खऱ्या अर्थाने प्रस्थापित झाले आहे का ? यशवंतराव व त्यांचे सहकारी यांचा हा हेतू पूर्णतया यशस्वी ठरला नाही.

नेतृत्वात बदल करण्याच्या मागणीला खतपाणी घालण्यात आले. शंकररावांविषयची मोहीम निर्णायकी करण्यासाठी कोणत्याही मार्गांचा अवलंब करण्याचे बाकी ठेवले गेले नव्हते. लाखो रुपयांच्या घरात जाईल एवढ्या रकमेचा वापर करण्यात आला असा आरोप करण्यात येत आहे. असे आरोप सिद्ध करण्याएवढा पुरावा मिळणेही अवघड असते. त्यामुळे ह्या चर्चेत शिरण्याचे कारण नाही. पण कानावर आले ते नमूद केले. दिल्लीहून आलेल्या निरिक्षकाचा ताजमहालमधील व आपल्या गटाच्या फौजफाटयाचा रिट्झ ह्या पहिल्या श्रेणीच्या हॉटेलवर झालेला खर्च बरेच काही सांगून जातो ! काही आमदारांची आर्थिक परिस्थिती सुधारती तर कोणाला दु:ख वाटायला नको !

¤

कोणत्याही परिस्थितीमध्ये खुर्ची सोडायची नाही, किंवा बारा एप्रिल रोजी दिल्लीत कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक भरेपर्यंत तरी मुख्यमंत्रिपद सोडावयाचे नाही असा पोलादी निर्णय शंकररावांनी केला होता. अखिल भारतीय पातळीवर जे धोरण स्वीकारले जाईल ते महाराष्ट्र अंमलात आणील हा धोशा शंकररावांनी लावला होता अनेक राज्यांत कॉंग्रेसची धूळधाण झालेली आहे. पण त्यामुळे सर्वच राज्यात नेता बदलण्याचा निर्णय घेतला जाणार नाही. तसे झाल्यास शिंके तुटले आणि बोक्याचे फावले या न्यायाने आपलेही जमून जाईल असा शंकररावांचा डाव होता. त्यांच्याविरोधी गटाला याची कल्पना आल्यामुळे त्या गटाने विधानसभेत खर्चाला मंजुरी मिळाल्याबरोबर एक एप्रिलपर्यंत शंकररावांना दूर करण्याचा प्रतिडाव केला. यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधातील ही अखेरची लढाई असल्यामुळेच शंकरराव अटीतटीचे राजकरण खेळत होते. त्यांना दिल्लीत वाली राहिला नव्हता आणि दादा गटाला यशवंतराव चव्हाण यांचा पाठिंबा मिळत होता. तेथून ते राजकीय हालचाली करत होते. शंकररावांना दिल्लीत वाली राहिलेला नव्हता त्यामुळे त्यांना जाण्याशिवाय मार्ग राहिला नव्हता. परंतु कार्यकारिणीच्या बैठकीपूर्वी जाण्याचे वेळापत्रक बदलून घेण्यात ते यशस्वी झाले. खुर्ची टिकवण्यासाठी त्यांचा अट्टाहास चालला होता असे नव्हे ! निकराच्या लढाईतील शेवटचा बुरूज ढासळेपर्यंत लढण्याचा तो प्रयत्न होता.

## वातावरण निर्मिती

२ एप्रिल रोजी विधीमंडळ कॉंग्रेस पक्षाची बैठक भरणार होती. ती ८ एप्रिलपर्यंत पुढे ढकलून मधल्या काळात परिस्थिती बदलून घेता आल्यास पाहावे असा विचार करून शंकररावांनी ८ एप्रिल हा दिवस बैठकीसाठी मुक्रर केला. त्या दिवशी लोकशाही पद्धतीने निर्णय घेतला जाईल. आपला किंवा अन्य केंद्रीय नेत्यांचा निर्णय सुमच्यावर लादला जाणार नाही असे आश्वासन निरीक्षक सी. सुब्रह्मण्यम यांनी आमदारांना दिले व दुसऱ्या दिवशी पुन: बैठक घेण्याचे ठरले. ८ एप्रिलच्या बैठकीस जात असताना शंकरराव चव्हाण चलेजाव, वसंतरावदादा झिंदाबादच्या घोषणा विधानभवनाच्या आवारात जमलेल्या आणि जमवलेल्याही — जमावाने दिल्या. १६ एप्रिलच्या 'माणूस'साठी मजकूर पाठवल्यानंतर ८ तारखेला रात्री अचानक ताजमहालमध्ये वाटाघाटींचे पर्व सुरू झाले. प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष नरेंद्र तिडके यांनी सी. सुब्रह्मण्यम यांच्याजवळ त्यांच्या उपस्थितीमध्ये वाटाघाटी व्हाव्यात अशी सूचना केली. ती सुब्रह्मण्यम यांनी मान्य केली आणि वसंतराव नाईक, वसंतरावदादा पाटील, शंकरराव चव्हाण, स्वत: तिडके या चौघांची सुब्रह्मण्यम यांच्या उपस्थितीतीमध्ये चर्चा सुरू झाली. नेतृत्व बदलाच्या मागणीनंतर दोन्ही गटांच्या नेत्यांमध्ये होणारी ही पहिलीच चर्चा होती. चर्चेच्या पहिल्या फेरीत काहीच निष्पन्न झाले नाही. दुसऱ्या दिवशी — ९ एप्रिल रोजी — वाटाघाटींच्या अनेक फेऱ्या झाल्या. पण निष्पत्ती काहीच दिसत नव्हती. ९ तारखेची पहिली फेरी संपल्यानंतर खोलीपासून लिफ्टमधून बाहेर पडेपर्यंत शंकरराव व वसंतराव नाईक खांद्याला खांदा लावून चालले होते पण या ७–८ मिनिटांच्या काळात ते दोघेही एकमेकांशी काहीही बोलत नव्हते. हे दोघेही शत्रू आहेत हे कोणाही तिऱ्हाईताच्या लक्षांत यावे असे त्यांचे मौन होते. पाठोपाठ पत्रकार होते. सांगण्यासारखे काही नाही असे वसंतराव नाईक म्हणाले. मोटारीत बसताना नाईकांनी एक–दोन पत्रकारांना अवघड आहे. पण काही तरी मार्ग निघेल असे वाटते.' एवढेच सांगितले. त्यानंतर चर्चेच्या छोट्या मोठ्या अनेक फेऱ्या झाल्या पण निर्णय होणे अवघड होऊ लागले. दुपारी बोलावलेली पक्ष बैठकीची वेळ तासा तासाने पुढे ढकलली जात होती, पण निर्णय होत नव्हता. बैठकीच्या ठिकाणी (९ एप्रिल रोजी) वातावरण तंग बनू लागले. आजच निर्णय झाला पाहिजे नाही तर आम्ही अविश्वास ठराव मांडू, असे दादा गटाचे आमदार म्हणत होते. सव्वा पाच वाजता दादा ताजमहालमधील बैठक सोडून गडबडीने बैठकीच्या ठिकाणी गेले. दादांची गाडी येताच बाहेरच्या जमावाने झिंदाबादच्या घोषणा दिल्या. वसंतदादा मुख्यमंत्री झाले म्हणून लोक घोषणा देत टाळ्या वाजवू लागले. दूरदर्शनाच्या लोकांनी दादा येत असताना त्यांच्यावर प्रकाशझोत टाकून कॅमेरा सुरू केला. घोषणा वाढत होत्या आणि दादा 'अरे बाबा, काही ठरले नाही असे सांगून लोकांना शांत करत धावत पळत लिफ्टकडे गेले. तडक दुसऱ्या मजल्यावर. बैठकीच्या हॉलमध्ये दादा आमदार नसल्यामुळे बसू शकत नव्हते. दादांनी यशवंतराव मोहिते, शरद पवार व धुळघाचे शिवाजीराव पाटील यांना बाहेर बोलावून घेतले. एका कोपऱ्यात पाच सात मिनिटे त्यांच्याशी सल्लामसलत केली. दरम्यान सुब्रह्मण्यम, शंकरराव, तिडके बैठकीच्या ठिकाणी आले. मागे राज्यमंत्री धामराव कदम होतेच. शंकरराव येताच त्यांच्या

पृष्ठ ९ वर

## मुक्काम दिल्ली

# हिंदू मन आणि 'इंदिरा द्वेष'

रत्नाकर महाजन

वर्किंग कमिटीतील तथाकथित पराभव-चिकित्सेनंतर, काँग्रेसच्या आघाडीवर तात्पुरती शांतता पसरल्यासारखी दिसतेय. निवडणुकीतील पराभवाने बसलेल्या धक्क्यातून तात्पुरता सावरला असला तरी हा पक्ष अजूनही इंदिरा-मोहिनीतून सुटलेला नाही, हे या कार्यकारिणीच्या एकूण कामकाजाच्या तऱ्हेवरून सिद्ध झालेले आहे. काँग्रेसच्या पराभवाची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे, या प्रांजळपणाचा आव आणणाऱ्या मानभावी स्वीकृतीनंतर आणि तूर्त तरी मी राजकारणात सक्रिय भाग घेणार नाही, असे एका पत्रकारास सांगितल्यानंतरसुद्धा आपल्या भोवतीच्या उपकृतांच्या जोरावर पक्षावरील आपली पकड पक्की ठेवण्याच्या हालचाली बाईंनी पडद्याआडून केल्या आणि त्यात त्या यशस्वीही झाल्या आहेत. कार्यकारिणीची बैठक होईपर्यंतच्या सर्व हालचाली या इंदिरा-बरुआ संघर्षाची बाहेरील चिन्हे होती. बरुआंना अध्यक्षपदावरून दूर करण्यासाठी सर्व कार्यकारिणीचाच सामूहिक राजीनामा देण्याची 'आयडिया' ही इंदिराजींची धूर्त खेळी होती. बरुआंना एकूण परिस्थिती लक्षात आल्यावर ही आयडिया मागे घेणे हीही बाईंचीच शक्कल. पण हे सारे नाटक त्यांनी पडद्यामागे राहून आयोजित केले हाच यावेळचा अनुज्ज्वल फॅक्टर. बरुआंना खाली खेचल्यावर त्यांच्या जागी कोणाला थापायचे याबाबत बाईंनी आपल्या मनाचा थांगपत्ता कोणाला लागू दिला नाही; पण आपल्या बोटाच्या इशाऱ्याप्रमाणे ऊठ-बस करण्याइतकी 'क्षमता' असलेल्या स्वर्णसिंगना त्यांनी बरोबर पुढे आणले आहे. आता त्यांना काँग्रेस महासमितीच्या दिल्ली अधिवेशनापर्यंत अध्यक्षपदाच्या खुर्चीपर्यंत पोचायला पुरेशी उसंत आणि तत्पूर्वी आवश्यक अशा उचापतींना पुरेसा वेळ मिळाला आहे. अशा तऱ्हेने काँग्रेसवर आपले वर्चस्व कायम टिकवण्यास तूर्त तरी बाई यशस्वी झाल्या आहेत. पण याचाच दुसरा अर्थ असा आहे की, काँग्रेस पक्षातील मोठमोठे सह्याद्री, विंध्य आणि मंडळी ही अजूनही मानसिक दृष्ट्या बाईंची गुलाम आहेत. आणीबाणीच्या काळात बाईंच्या इशाऱ्यासरशी मान डोलवायची सवय लागलेले तथाकथित श्रेष्ठी अजूनही त्या गुलामीतून मुक्त झालेले नाहीत.

कार्यकारिणीत झालेल्या चर्चांमध्ये 'पराभवाची जबाबदारी आपणा सर्वांची आहे' चा सर्वसाधारण सूर असल्याचा देखावा केला गेला तरी, प्रत्यक्षात एका प्रदेश काँग्रेसमधील दोन भिन्न गटांमधील लढाईचे प्रदर्शन तिथे झाले. रामसुभगसिंग व बळिराम भगत या बिहारमधील दोन बड्यांचा खटका उडाला. पक्ष-पराभवाची चिकित्सा करताना दोघांनी एकमेकांवर व्यक्तिगत आरोप केले. रामसुभग सिंग भगतना म्हणाले, 'तुमची दिल्लीत दोन घरे आहेत तरी तुम्ही सरकारी जागेत राहता, हे काय आम्हाला माहीत नाही ?' अशा व्यक्तिगत उखाळ्यापाखाळ्यांनी बैठकीचा बराच वेळ खाल्ला. प्रत्येक राज्याच्या काँग्रेसमधील अंतर्गत दुफळीचे असेच प्रदर्शन झाले. महाराष्ट्र काँग्रेसच्या पराभवाची चर्चा चालू असताना बॅरिस्टरसाहेब शंकरराव चव्हाणांना म्हणाले तुमच्या बेलगाम भाषणांमुळे काँग्रेसचा पराभव झाला. (मी आपटलो!) पण हे बोलत असताना बॅरिस्टरसाहेबांना आपल्या स्वतःच्या भाषणाची याद राहिली नव्हती.

बन्सीलाल, व्ही. सी. शुक्ला यांच्यावर आणीबाणीतील अतिरेक व त्यामुळे झालेल्या पराभवाचे खापर फोडून बाकी सारे संघटनेच्या भवितव्याची चिंता करायला मोकळे झाले आहेत. आणीबाणी ही मुळातच चूक होती व या चुकीस इंदिरा गांधी जबाबदार आहेत असे म्हणून त्यांना जाब विचारण्याची हिंमत कुणालाही झाली नाही. यावरूनच ही सारी मंडळी काय कसाची आहेत हे लक्षात यावे. संजय गांधी हे काँग्रेसचे प्राथमिक सदस्यच नसल्याने त्यांच्या वर्तनाची चर्चा न होणे हे मातेच्या गुलामगिरीतून मुक्त न झाल्याचेच लक्षण आहे. अन्यथा या केवळ तांत्रिक मुद्द्यावर ही चर्चा टाळण्याचे कारण काय ? ते प्राथमिक सदस्य नाहीत ही गोष्ट त्यांना कार्यकारिणीत / ए. आय्. सी. सी. त घेताना लक्षात कशी आली नाही ? आली असेल तर, त्यांना हा विशेष सन्मान का देण्यात आला ? पण एवढे बोल्ड प्रश्न विचारणार कोण ? आता निदान बन्सीलाल-व्ही. सी. शुक्ल यांनी तरी, आम्ही जे काही केले ते आम्हाला देण्यात आलेल्या आदेश-सूचनांप्रमाणे केले असा पवित्रा घेऊन वेळोवेळचे आदेश व ते देणारांची नावे जाहीरपणे सांगितली पाहिजेत.

◻

उत्तरेकडील नऊ राज्यांच्या विधानसभा बरखास्त करून तेथे निवडणुका घेण्याच्या प्रश्नावरून केंद्र व ती राज्य सरकारे यांच्यात तणाव निर्माण झाल्याचे चित्र आज दिसत असले तरी, हा तणाव तसा किरकोळ आहे. आपली राज्यघटना ही प्रत्यक्षात केंद्रानुवर्ती असल्याने केंद्र सरकारचे पंतप्रधान व प्रत्यक्षात गृहमंत्री यांच्या हाती अंतिम अधिकार आहेत. त्यामुळे चरणसिंग आपली इच्छा पूर्ण करून घेण्यात यशस्वी होतील. हा मजकूर छापेपर्यंत कदाचित या प्रश्नाचा चरणसिंगांनी आपल्याला अनुकूल असा निर्णय लावूनही टाकला असेल. केंद्र सरकारचा हा निर्णय राजकीय हेतूपोटी घेतलेला आहे असे म्हणून काँग्रेसवाले जनतेच्या दृष्टीने काही रहस्यभेद करीत आहेत असे नव्हे. राजकीय हेतूने घेतले गेलेले सर्व निर्णय वाईट, स्वार्थपरायण असतात असे या घडीला तरी कोणी मानीत नाही. हा निर्णय घेण्याची पाळी काँग्रेसनेच आणली आहे, हे लोकांना माहीत असल्याने तो निकाल लवकर लागावा, अशीच आज लोकांची भावना आहे.

## काँग्रेस : एक प्रादेशिक पक्ष !

अशा परिस्थितीत काँग्रेस पक्षाचे भवितव्य काय ? आज आहे ही जनमताची दिशा कायम राहिली आणि आज आहे याच वातावरणात राज्यविधानसभांच्या निवडणुका झाल्या तर, सबंध उत्तर, पश्चिम, पूर्व इथून काँग्रेसचे उच्चाटन होईल आणि त्यानंतर काँग्रेस हा एक प्रादेशिक पक्ष म्हणून अस्तित्वात राहील असा अंदाज आहे. 'आजपर्यंत काँग्रेसचे पक्ष म्हणून जे काही अस्तित्व होते त्याचा सत्ता हाच आधार होता / आहे.

सत्ता हा काँग्रेसजनांचा प्राणवायू होय. प्राणवायूची ही रसदच तुटल्यावर देह जिवंत कसा राहणार ! म्हणून हातची सत्ता गेल्यानंतर आज दिसणारे धवल मेरू पर्वत कोसळतील आणि काही टेकड्या शिल्लक राहतील. या साऱ्या प्रकारात 'साहेबां'चे पक्षाच्या नेतृत्वप्रभावळीतील स्थान फारसे भूषणावह नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. संसदीय पक्षाचे ते नेते असल्याने व सद्यःस्थितीत काँग्रेसच्या हाती असलेले तेच एकमेव उच्चपद असल्याने त्यांच्या घरी सर्व नेतेमंडळी जमत, तिथे होणाऱ्या बैठकीत बरीच महत्त्वाची खलबते होत आणि त्यांचे घर हे या काळातील राजकीय हालचालींचे एक प्रमुख केंद्र होते / आहे, हेही खरे. पण काँग्रेसचा अंतरिम अध्यक्ष ठरविण्याच्या कामी त्यांचा काही भाग नव्हता, ते नाव त्यांच्या परस्परच ठरविले गेले असे माहीतगारांचे मत आहे. त्यांच्या मते इथून पुढेही साहेब पूर्वीप्रमाणेच दोन्ही दगडींवर हात ठेवून नं. २ वा त्याही खाली राहतील आणि तेथून महाराष्ट्र काँग्रेसची आपली सुभेदारी चालवतील.

### What next ?

एकीकडे काँग्रेसची ही वाताहत चालू असतानाच जनता पक्ष व त्याचे सरकार यांच्याकडे जनता मोठ्या अपेक्षेने पाहत आहे. एका भयपर्वातून देशाला मुक्त केल्यावर या मुक्तिलढ्याच्या नेत्यांकडे- What next च्या अर्थाने आता पाहिले जात आहे. पण दुर्दैवाने या नेत्यांना काळाचे भान आहे की नाही असा प्रश्न पडावा असे त्यांचे वर्तन व बोलणे आहे. जनता पक्षाचे सरकार प्रस्थापित होऊन एवढे दिवस झाले तरी, आणीबाणीतील अत्याचारांचे आणि त्यास दोषी असणाऱ्या इंदिरा–संजय आणि कंपनीवर टीका करण्याचेच दळण अजून ते दळताहेत. जबाबदार राज्यकर्ते म्हणून आपल्या पुढील कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या त्यांच्या योजना काय आहेत हे ऐकायला लोक आता उत्सुक आहेत. गेल्या तीस वर्षांतील काँग्रेसच्या गैरकारभारास विटलेल्या आणि आणीबाणीत आपले स्वतंत्र अस्तित्वच गमावलेल्या जनतेने दोषी माणसांचे दोष काय होते, ते ताडून त्यांना त्यांच्या पापांचे पुरेपूर प्रायश्चित्त दिले आहे. तेव्हा आता पुन्हा तेच कसे दोषी होते, हे ऐकण्यात कुणाला रस उरलेला नाही. अशा परिस्थितीत अजूनही इंदिरा गांधींनी देशाचे कसे वाटोळे केले, हा एकच घोशा जर त्यांनी चालू ठेवला तर, लोकांची साहानुभूती गमावण्याचा आणि विश्वास नाहीसा होण्याचा धोका आहे. हा धोका ध्यानी न घेता आपली निवडणूकपूर्व भाषणेच अजूनही जागजागी दोहरणारे जनता पक्षाचे नेते हे घड्याळाचे काटे उलटे फिरवीत आहेत, हे त्यांच्या जितक्या लवकर ध्यानी येईल तेवढे बरे. एका माजी काँग्रेस मंत्र्याकडे गेलो होतो. गप्पा मारता मारता ते म्हणाले, 'मला तर असे वाटते की, या पराभवातून तावूनसुलाखून बाहेर निघून काँग्रेसला पुन्हा उभे राहायचे असेल तर पक्षाने, आमच्या अक्षम्य चुका झाल्या आहेत, याची आम्हाला जाणीव झाली आहे. या चुकांबद्दल उदारहृदय जनतेने आम्हाला क्षमा करावी आणि सेवेची पुन्हा संधी द्यावी अशा अर्थाचे जनतेची विनशर्त माफी मागणारे डिक्लरेशन काढले तर या देशातले पारंपरिक हिंदू मन हे मूलतः क्षमाशील असल्याने ते झाले गेले विसरून जाईल आणि काँग्रेस पक्ष इथे पुन्हा उभा राहील.' यात बरेचसे तथ्य आहे. ही जनतेची क्षमाशील मनोरचना एका बाजूला व सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचा निखळ इंदिरा द्वेष एका बाजूला. यातील अंतर वाढत गेले तर देश पुन्हा एकदा गर्तेत गेल्याशिवाय राहणार नाही. केवळ इंदिरा द्वेषावर आमचे राजकारण आधारित नव्हते, हे प्रत्यक्ष बोलण्यावागण्यातून व कृतीतून सिद्ध करण्याची संधी आता जनता पक्ष–नेत्यांना प्राप्त झाली आहे. तिचा फायदा घेऊन त्यांनी तसे वर्तन जर केले नाही तर, व्यत्यास सिद्ध होऊन गाडे परत मूळपदावर येईल. ते तसे जर येऊ द्यायचे नसेल तर, जनता पक्ष नेत्यांना आता आपल्या इंदिरा–पापवाचनाची तबकडी बंद करून जनतेचे बेकारी, भूक, दारिद्र्य, अनारोग्य इत्यादी मूलभूत प्रश्न, ते कसे सोडविणार आहेत ते सांगत फिरावे लागेल. अन्नधान्याचे भाव कमी करणे व राखणे, बेकारी हटविणे यांसारख्या कार्यक्रमांच्या पद्धतशीर योजना आखण्यात जनतेचा कोणता सहयोग त्यांना अपेक्षित आहे, हा त्यांच्या भाषणांचा आशय असावा लागेल. जबाबदार राज्यकर्त्यांची जबाबदार, आत्मविश्वासपूर्ण व सावध भाषा आता त्यांच्याकडून अपेक्षित आहे.

अशा जबाबदारीने ते वागले तरच, त्यांना लाभलेल्या राजकीय स्थिरतेचा जनहितार्थ ते वापर करू शकतील.

□

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## □ एक्सप्रेसची लढाई

आणीबाणीबरोबरच प्रसिद्धीपूर्व नियंत्रणे आली, आणि बघता बघता सारी वृत्तपत्रसृष्टी नियंत्रणाचा धबडग्याखाली भरडून निघाली. ताठ मानेने उभे राहण्याचा प्रयत्न करणारांमध्ये 'साधना' हे साप्ताहिक होते. साधनेचे संपादक श्री. यदुनाथ थत्ते यांनी या संकट पर्वामधील अनेक कथा–दूरदर्शनावरील प्रतिमा–आणि प्रतिमा या कार्यक्रमामध्ये सादर केल्या. आपला अंक आक्षेपार्ह असल्याचे शासनाने त्यांना कळवल्यावर 'साधना 'तर्फे विचारणा करण्यात आली की, नेमके आक्षेपार्ह काय आहे? आणि त्या प्रश्नाचे उत्तर शेवटपर्यंत मिळू शकलेले नाही. आपल्यापरीने-पूर्ण शक्तीनिशी साधनाकारांनी संघर्ष केला आणि शेवटपर्यंत टिकाव धरला. इंडिअन एक्सप्रेस या वृत्तपत्राला तर विकत घेण्यापासून मोडून काढण्यापर्यंत सारे प्रयत्न झाले. पण एक्सप्रेसने प्राणपणाने लढा दिला. संकट पर्वामधील त्या भयावह आठवणीचे रामनाथ गोएंका यांनी सांगितलेले किस्से ऑनलूकर या पाक्षिकाने दिले आहेत. शासनाबरोबरील संघर्ष सोडून का दिला नाही असे मला विचारण्यात आल्यावर एक्सप्रेसचे हे वयोवृद्ध सूत्रधार गोएंका म्हणतात आर्थिक सुस्थिरता किंवा मानसिक समाधान यापैकी एकाची निवड करणे शक्य होते. आणि मी माझ्या मनातून उमटलेल्या स्वाभाविक ऊर्मींना प्रतिसाद देऊन मोकळा झालो.

केवळ प्रसिद्धीपूर्व नियंत्रणाचा बडगा दाखवून शासन थांबले नाही तर, माझा कणाच मोडून काढण्याचा शासनाचा निर्णय असल्याने खाजगी जाहिरातदारांनाही जाहिराती देऊ नयेत असे आदेश देण्यात आले. एका बाजूने वाढती दडपणे येत असतानाच दुसऱ्या बाजूने माझी वृत्तपत्रे खरेदी करण्याच्या गोष्टीही शासनामार्फत चालू होत्या. देशामधील सगळ्यात मोठा वृत्तपत्रीय गट म्हणजे एक्सप्रेस वृत्तपत्र समुह. या समुहातर्फे प्रकाशित होणाऱ्या दैनिकांची आणि नियतकालिकांची संख्या १६ असून एकूण विक्री तीस लक्ष प्रतीच्या घरात आहे. या साऱ्या साम्राज्यावर कब्जा मिळावा म्हणून–विद्याचरण शुक्ला यांनी नाना प्रकारचे प्रयत्न केले. आपल्याला अटक करण्याची वेळोवेळी धमकी देण्यात आली असे सांगून गोएंका म्हणतात आपण दाद देत नाही हे लक्षात आल्यावर मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे त्या वेळचे अध्यक्ष रजनी पटेल यांनी आपण तडजोड करावी असा सल्ला दिला. आणि तडजोडीचा अपरिहार्य भाग होता–एक्सप्रेस काँग्रेसला अथवा काँग्रेसमार्फत सुचवल्या गेलेल्या पार्टीला विकायचा. आणि हे जर होणार नसेल तर, आपण कोणतीही मदत करू शकणार नाही असा खुलासाही रजनीभाईनी करून टाकला. एक्सप्रेससंबंधी काही तरी निर्णय घेणे आवश्यकच होते. शेठजींनी सर्व संबंधितांना कल्पना दिली की–येणारे दिवस भयावह आहेत. अंक वेळेवर निघू शकणार नाही. वेळ आल्यास पगारामध्ये कपात स्वीकारावी लागेल आणि कदाचित तसाच प्रसंग ओढवल्यास-वृत्तपत्र बंदही करण्याची वेळ येईल. मालकाचे हे नवीन रूप पाहून मंडळ अवाक् झाली. कधीही न जिंकता येणारी ही लढाई खेळण्यात आपला मालक लवकर मूर्खपणाही करतो आहे असाच अनेकांचा ग्रह झाला. जसजसे दिवस जाऊ लागले–तसतसे त्रास देण्याचे प्रमाण वाढू लागले. रामनाथजींचे एकुलते एक चिरंजीव भगवानदास गोएंका आणि त्यांची पत्नी सरोज यांना अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली अटक करण्यात येईल अशी प्रत्यक्ष धमकी देण्यात आली. या साऱ्यांतून काही मार्ग निघतो का ते पहावे म्हणून भगवानदासजी माहिती मंत्री श्री. विद्याचरण शुक्ला यांना भेटले. मंत्री महोदयांनी सल्ला दिला–तुमच्या मर्जीप्रमाणे तुम्हाला वृत्तपत्र चालवता येईल या भ्रमामध्ये राहू नका. शासन तुम्हाला तसे करून देणार नाही. बचाव व्हावा असे वाटत असेल तर, एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे वृत्तपत्राची विक्री. हा व्यवहार त्वरित व्हावा यासाठी नाना प्रकारची दडपणे येत होती आणि दुसऱ्या बाजूने वृत्तपत्रांचे दैनंदिन काम खिळखिळे करण्याचे सर्व प्रयत्न यथासांग चालू होते. तपासण्यासाठी दिलेला मजकूर वेळवर परत मिळू न शकल्याने–वेळच्या वेळी अंक काढणे कठिण होऊन बसले. अंक वेळेवर निघू न शकल्याने विक्रीवर परिणाम होऊ लागला. शासकीय जाहिराती पूर्वीच बंद झाल्या होत्या. तथापी काही खाजगी जहिराती नियमितपणे मिळत होत्या. शासनाने आपली दृष्टी त्यांच्याकडे वळवली. या अडचणीवर मात करून बाहेर पडणे कठिण आहे असे दिसून आल्यावर शेठजी विक्री व्यवहार करण्यास तयार झाले. मात्र पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत देऊन होऊ घातलेला हा व्यवहार–पांढराशुभ्र असावा आणि सर्व कायद्यांचे काटेकोर पालन केले जावे. हा एवढा प्रचंड आर्थिक व्यवहार करू शकणारा विश्वासाचा मनुष्य मिळविणे,–आणि शिवाय हा सारा व्यवहार कायदेशीर ठरेल. अशा प्रकारे करणे या गोष्टी शासन जमवू शकले नाही,

एक्सप्रेस गटावर ताबा मिळविणे शक्य होत नाही हे लक्षात आल्यावर शासनाने नियंत्रणे वाढवण्याचे ठरवले आणि बहुसंख्य संचालकांची नेमणूक केली. अध्यक्षस्थानी हिंदुस्थान टाईम्सचे सूत्रधार के. के. बिर्ला यांची नेमणूक केली. वृत्तपत्राच्या वृत्त विभागावर व संपादकीय धोरणांवर बारीक नजर ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. मुख्य संपादक एस्. मुळगांवकर, आणि वृत्त विभागाचे प्रमुख कुलदिप नायर यांना नोकरीतून मुक्त करण्यात यावे यासाठी

दडपण येऊ लागले. मंत्री नसूनही–मंत्रिमंडळामध्ये विशेष स्थान असलेले संजय गांधी या मागण्यांचे सूत्रधार होते. नायर यांना मुक्त करून आपल्या निष्ठा व्यक्त करा असे शेठजींना सांगण्यात आले. तथापी पूर्णवेळ पत्रकारांसाठी असलेल्या कायद्याचे संरक्षण श्री. नायर यांना असल्याने आपल्याला याबाबत काहीही करता येणार नाही असे शेठजींनी सांगितले. शासनाची नाराजी त्यांना कळवण्यात आली. त्यानंतर शेठजी हृदयविकाराने आजारी असताना श्री. बिर्ला यांच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या संचालक मंडळाने मुख्य संपादक एस्. मुळगावकर यांना सेवामुक्त केले. हा निर्णय शेठजींना आवडला नाही. तथापी त्याबाबत काही करणे शक्य नसल्याने ते गप्प बसले. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने दिलेल्या एका निर्णयाच्या संदर्भात श्री. अजित भट्टाचार्य यांनी एक लेख लिहिला. लेखामध्ये काही मवाळ विधायक सूचना करण्यात आल्या होत्या. बिर्लाजींनी मागणी केली की, अजितबाबूंना गंगटोक येथे फेकून द्या. गोएंकाजींनी बिर्लांना सुनावले की, महोदय संपादकीय धोरणाबाबत सूचना करणे, आणि नियंत्रण राखणे एवढ्यापुरतेच आपले कार्य मर्यादित आहे याची जाणीव ठेवा. बदल्यांबाबतचे निर्णय तुम्हाला घेता येणार नाहीत. कारण कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे ही व्यवस्थापकीय जबाबदारी असून त्या संदर्भात तुम्हाला काहीही करता येणार नाही. प्रकरण त्यावेळचे माहिती व नभोवाणी मंत्री श्री. विद्याचरण शुक्ला यांच्यापर्यंत गेले. शुक्लाजींनी अर्थातच बिर्लांची बाजू घेऊन गोएंकाजींना पुन्हा एकदा सडकून दम भरला. हातचे काहीही राखून न ठेवता एक्स्प्रेस गटाने शासकीयधोरणांचा सातत्याने पाठपुरावा केला पाहिजे 'अशी आपली अपेक्षा, असल्याचे सांगून शुक्लाजी म्हणाले–याबाबत कोणतीही कुचराई झाली तर, त्याचे गंभीर परिणाम होतील. गंभीर परिणामांचा पहिला दणका पी. आय. बी. ने दिला. कर चुकवण्याचे व लाचखोरीचे आरोप शेठजींवर करण्यात आले आणि लगोलग 'नॅशनल कंपनी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या कलकत्त्यामधील ज्यूट मिलसाठी स्वतंत्र नियंत्रकमंडळ नेमण्यात आले. त्या मंडळावर साधे सदस्य म्हणूनही शेठजींची नेमणूक केलेली नव्हती. लगोलग एक्स्प्रेसच्या आठ ठिकाणांहून प्रसिद्ध होणाऱ्या आवृत्यांसाठी स्वतंत्र नियंत्रण मंडळे नेमण्यात आली. मंदगतीने काम करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे एक्सप्रेसगटाच्या वृत्तपत्रांची विक्री कमी होऊन बावीस लक्ष रुपयांचा फटका बसला. शेठजींनी शासनाविरुद्ध अनेक दावे दाखल केले होते. शेठजींनी संपादकीय धोरण ठरवण्यासाठी उपसमिती स्वीकारावी, आणि बदल्यात शासनाविरुद्धचे दावे काढून घ्यावे असे ठरले. बिर्लांचे एकट्याचे वर्चस्व कमी व्हावे म्हणून शेठजींनी ही योजना स्वीकारली. उपसमितीवर स्वतः शेठजी, के. के. बिर्ला, आणि संजय गांधी यांच्या विशेष विश्वासामधील कलकत्त्याचे उद्योगपती श्री. कमलनाथ यांची नेमणूक करण्यात आली. मुळगावकर यांच्या जागी मुख्य संपादक म्हणून आलेल्या व्ही. के नरसिंहन यांना बाजूला करून त्या जागी टाईम्स ऑफ इंडियाचे एक वार्ताहर मोहम्मद शमीम यांची नेमणूक करावी असा प्रस्ताव श्री. कमलनाथ यांनी समितीपुढे ठेवला. वास्तविक अशा बदलाची आवश्यकता नव्हती. तथापी बदल हवाच असेल तर, एक्सप्रेसचेच वॉशिंग्टन येथील प्रतिनिधी श्री. व्ही. व्ही. परशुराम यांची नेमणूक करावी असे शेठजींनी सुचवले. तेव्हा दोन्ही नावे बाजूला ठेऊन कमलनाथ यांनी एक्स्प्रेसचे एक उपसंपादक श्री. सुमन दुबे यांची मुख्य संपादक म्हणून नेमणूक करण्याचे ठरवले आणि श्री. बिर्ला यांच्या मदतीने उपसमितीमध्ये तसा ठरावही पास करून घेतला.

शासनाबरोबरील लढाई अखेरच्या टप्प्यात नेणारा हा तडाखा होता. तेव्हा झाले एवढे फार झाले असे समजून त्यांनी संपादकीय धोरण ठरवणारी उपसमिती रद्द करून टाकली. टिकून राहण्यासाठी आता पैशाची अत्यंत आवश्यकता होती आणि शासनाच्या कठोर आदेशामुळे बँका कोणत्याही सवलती देण्यास तयार नव्हत्या. एक्स्प्रेसने एकाकी लढा चालू ठेवला. जुलमी सत्तेविरुद्ध लढा देणारे दैनिक असे प्रातिनिधीक स्वरूप एक्स्प्रेसला प्राप्त झाले. सुदैवाने निवडणुका योग्यवेळी घोषित झाल्या आणि आपली सारी शक्ती एकवटून एक्सप्रेसच्या आठही आवृत्त्या रणमैदानामध्ये उतरल्या. निवडणुकांचे निकाल घोषित होऊन नवीन सरकार सत्तेवर आल्यावर शेठजींनी मुळगावकरांना बोलावून घेऊन त्यांना त्यांच्या पूर्वपदी स्थानापन्न केले. व्ही. के. नरसिंहन हे एक्स्प्रेससाठी नियंत्रित लेखन करणारे संपादक झाले.

संकटकाळी आपल्याला अटक करून एक्स्प्रेसला तडाखा देणे, शासनाला सहज शक्य होते. तसे का केले गेले नाही असे विचारल्यावर शेठजी म्हणाले,–इंदिराजींचे आणि माझे जुने संबंध कदाचित लक्षात घेतले गेले असावेत. तथापी मतभेद निर्माण झाल्यावर मी त्यांची कधीही गाठ घेतली नाही. काही मित्रांनी त्यांच्याबरोबर माझी गाठ घालून देण्याची खटपट जरूर केली. परंतु माझी भेट घेण्यामध्ये त्यांना फारसा रस नसावा. एक्स्प्रेसला निवडणुकीच्या प्रचार–काळामध्ये आणि नंतरही प्रचंड प्रतिसाद मिळाला. विक्रीचे उच्चांक गाठले गेले, हजारो प्रति काळ्याबाजारामध्ये विकल्या गेल्या. एक्स्प्रेसचे हे जे प्रचंड स्वागत झाले त्यामागे कृतज्ञतेचा भाव आहे असे शेठजींना वाटते. वृत्तपत्र हे लोकांच्या हातामधील एक अत्यंत प्रभावी शस्त्र बनवणे;–ही आपल्या उर्वरित आयुष्यामधील महत्त्वाकांक्षा असल्याचे शेठजी सांगतात. वृत्तपत्र चालवणे हा केवळ धंदा नाहीतर संघर्षाचे ते एक अत्यंत प्रभावी असे साधन आहे अशीही त्यांची धारणा आहे.

◻

## ◻ थाप मारून लोकसभेमध्ये...

खासदार जनता पक्षाचे असोत, काँग्रेसचे असोत, अथवा अन्य कोणत्या पक्षाचे किंवा अपक्ष असोत. एक सणसणीत थाप मारूनच त्यांना लोकसभेमध्ये प्रवेश करावा लागतो. प्रत्येक नवनिर्वाचित खासदाराला एक निवेदन द्यावे लागते. त्याचे हे पहिलेवहिले निवेदन म्हणजे एक शुद्ध थाप असते. आपल्या निवेदनामध्ये तो नमूद करतो की, निवडणुकीवरील खर्च म्हणून त्याने पस्तीस हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च केलेली नाही. वास्तविक त्याला स्वतःला, त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आणि हे निवेदन दाखल करून घेणाऱ्या अधिकारीवर्गालाही माहीत

असते की, संसदभवनापर्यंत पोचण्यासाठी स्वारीला घोषित केलेल्या रकमेच्या किमान पाच ते दहापट रक्कम खर्ची टाकावी लागली आहे. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ प्ब्लिक ओपिनियन या संस्थेमधील एक तज्ज्ञ डॉ. कोल्टा यांच्या मते लोकसभा निवडणुकीचा एकूण खर्च साधारणपणे ४३·२ कोटी रुपये झालेला आहे. हा खर्च प्रत्येक जागेसाठी सुमारे २ लक्ष रुपये खर्ची पडल्याचे सूचित करतो. अर्थात ही झाली खर्चाची किमान पातळी ! ! आता एवढा खर्च होतो त्याला बिचारे उमेदवार तरी काय करणार. महागाईच बेसुमार झाली आणि कितीही खर्च केला तरी पुरवठा येईना. अखेर १९५१ साली शासनानेच खर्चाची मर्यादा २५ हजार रुपयांवरून पस्तीस हजार रुपयांवर नेऊन ठेवली. लोकसभेचा मतदारसंघ अवाढव्य मतदारांशी संपर्क साधायचा तर वाहन हवेच. १९५१ साली पेट्रोल होते ३७ पैसे लिटर; आज पेट्रोलचा भाव आहे ३ रुपये ३९ पैसे लिटर ! खर्चाचा मेळ बसावा कसा ? आणि पस्तीस हजारांमध्ये निवडणूक आवरावी तरी कशी ? ५०० रुपये भाडे म्हणून फेकले तरखाली टाकी अँम्बेसडॉर गाडी महिनाभर फिरवता येत असे. आज अशीच खाली टाकी अँम्बसडॉर गाडी महिनाभर फिरवायची असेल तर एक हजार दोनशे रुपये मोजावे लागतात. पोस्टाचे दरही बेसुमार वाढले आहेत. अगदी कार्डांचा विचार केला तरी ही वाढ तिप्पट असल्याचे लक्षात येते. या खर्चासाठी अवाढव्य रकमा गोळा होतात कशा ? हातात सत्ता असलेला पक्ष नाना क्लृप्त्या योजतो. पन्नास हजार रुपये घेऊन नगण्य काळ्या पैशाच्या वंद थैल्यांना याच दिवसामध्ये पाय फुटतात. काळ्या पैशाचे पांढरे पेट्रोल उमेदवारांना गावोगावी घेऊन जाते. विशेष प्रतिष्ठेच्या निवडणुका जेथे होतात; तेथे तर पाण्यासारखा पैसा खर्च होतो. मुंबईच्या ज्या मतदारसंघांमध्ये माजी केंद्रीय मंत्री उभे होते, तेथे तर १५ ते २० लक्ष रुपयांची रक्कम खर्ची पडल्याचे सांगितले जाते. असे असूनही ज्यावेळी विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून येतो, त्यावेळी पैशाने गरिबी खरेदी करण्याच्या प्रयत्नाकाठी काही कमाल मर्यादा पडतातच, हे मान्य करावे लागते. □

## □ राजमाता गायत्रीदेवी

राजे-महाराजे निवृत्त झाले तरी त्यांपैकी अनेकजण विरोधी पक्षाच्या बाजूने उभे राहिले म्हणून काँग्रेसच्या लहान पुढाऱ्यांनी त्यांच्या विरुद्ध टीका-टिपणी केली. आणीबाणी ही राजा-महाराजांना कायमचे मोडून काढण्याची नामी संधी होती. जयपूरच्या गायत्रीदेवी यांना याच काळखंडामध्ये स्थानबद्ध करण्यात आले होते. आरोप होता आर्थिक गुन्हेगारीचा. आणि कायदा लागू करण्यामागील प्रेरणा होती धडा शिकवण्याची. विरोधी पक्षाच्या बाजूने उभे राहता नाही का, मग भोगा त्याची फळे...असे बजावण्याची. गायत्रीदेवी पॅरोलवर सुटून आल्या आणि बाहेरच राहिल्या. त्यांनी अलीकडेच दिलेली एक मुलाखत.

**प्रश्न :** तुम्हाला पकडण्यात आले त्यावेळी गुन्हापत्र दाखल करण्यात आले काय ?

**उत्तर :** नाही. आणीबाणीमध्ये कोणालाही पकडण्याचे अधिकार शासनाला असतात. त्या अधिकाराचा वापर करून आणि आर्थिक गुन्हेगारांसाठी जो कायदा असतो, त्याचा आधार घेऊन मला पकडण्यात आले. माझ्याविरुद्ध नेमके आरोप काय होते, हे मला आजतगायत माहीत नाही. आणि मला का पकडण्यात आले हे पण मला सांगता येणार नाही. कदाचित मी विरोधी पक्षामध्ये असल्यामुळे आणि १९६७ साली राजस्थानमधून विरोधी पक्षाला भरपूर जागा मिळाल्यामुळे मला पकडण्यात आले असावे.

**प्रश्न :** इंदिरा गांधी या व्यक्तिशः तुमच्या विरुद्ध होत्या का ?

**उत्तर :** नक्की सांगणे कठीण आहे. तथापि माझी अप्रतिष्ठा व्हावी असे मात्र इंदिराजींना मनोमन वाटत असावे. जयपूरमधून काँग्रेसचा सतत पराभव झाला, ही गोष्ट त्यांना टोचत असावी. अर्थात या वेळीही निकाल काही वेगळा लागला नाही, ही बाब अलहिद.

**प्रश्न :** राजकारणातून तुम्ही निवृत्त झाला आहात, खरे आहे काय ?

**उत्तर :** माझ्या निवृत्तीचे वृत्त साफ खोटे आहे. आणि मी या पूर्वीही त्याचा इन्कार केलेला आहे. मात्र लोकसभेसाठी पुन्हा निवडणूक लढवणे आपल्याला पसंत नाही. विरोधी पक्षीय खासदार म्हणून मी पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ काम केले आहे. आणि याच वेळेला मी निवडणुकीला उभी राहिले नाही. आणि काय गंमत आहे पाहा ! विरोधी पक्ष सत्तेवर आला. जयपूरसाठी काही करता आले तर पाहावे, असाही निवडणूक लढवण्यामागे माझा उद्देश होता. पण आता माझ्या लक्षात आले आहे की, निवडणुका पुन्हा पुन्हा येत असल्या तरी, लोकांच्या गरजा कायम असतात. त्यांना प्रामुख्याने शाळा हवी असते, वीज हवी असते. आणि नळ सोडताच पाणी उपलब्ध व्हावे अशीही त्यांची इच्छा असते. या गरजा पूर्ण करण्यासाठी खासदाराने कितीही प्रयत्न केला तरी, त्याला यश मिळणे संभवनीय नसते. आणि खासदार विरोधी पक्षाचा असेल तर, बोलणेच खुंटले. कारण विरोधी पक्षाचा खासदार निवडून देऊन लोकांनी आधीच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतलेला असतो. निवडणूक प्रचारामध्ये खरी गरज असते लोकांना त्यांच्या मतसामर्थ्याची जाणीव करून देण्याची; मतसामर्थ्यावर शासन बदलता येते हे त्यांना पटवून देण्याची सुदैवाने आज त्यांना ते पटले आहे. मात्र त्यासाठी साऱ्या देशाला वीस महिन्यांच्या अंधकारमय कालखंडामधून जावे लागले आहे.

**प्रश्न :** तुरुंगामधील तुमचे काही अनुभव सांगता का ?

**उत्तर :** तुरुंगामधील इतरांचे अनुभव मी केवळ वाचले असते तर, मी चक्क–ही मंडळी अतिशयोक्ती करतात म्हणून तो विषय बाजूला सारला असता. आणीबाणी लागू केल्यानंतर सुमारे एक महिन्याने मला दिल्ली येथे अटक करण्यात आली आणि तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले. जेमतेम दोन पलंग राहू शकतील अशा खोलीमध्ये मला ठेवण्यात आले होते. आणि खोलीच्या दाराला बाहेरून कुलूप लावत नव्हते, ही एक विशेष मेहरबानीच होती. अवतीभवती असलेल्या स्त्रियांमध्ये वेड्या आणि वेश्या असल्याने–मला कधी शांतता मिळू शकली नाही. आपण चक्क बाजारपेठमध्येच आहोत, असे मला वाटत होते. विशेष मेहरबानी म्हणून मला एक छोटा ट्रॅन्झिस्टर ठेवू देण्यात आला होता. त्याचा फारच थोडा वापर मी केला. तृतीय श्रेणीच्या गुन्हेगार कैद्यांना जे अन्न देण्यात येते, तसले अन्न आम्हाला दिले गेले. आधीच असलेला रक्तदाबाचा विकार बळावला आणि मग थोडेफार औषधपाणी करण्यात आले.

**प्रश्न :** तुरुंगामधून तुमची सुटका कशी झाली ?

**उत्तर :** बेचाळिसावी घटनादुरुस्ती होण्यापूर्वी आपली सुटका होईल असे मला वाटत होते. पण त्यानंतर मात्र सुटकेचे सर्व दरवाजे बंद झाले. वीस कलमी कार्यक्रमाचा उदोउदो केला असता आणि राजकारणामध्ये भाग घेणार नाही, अशी सुस्पष्ट लेखी कबुली दिली असती तर, कदाचित माझी सुटका झाली असती. परंतु मी नकार दिला आणि तुरुंगामध्ये राहणे पसंत केले. पुढे तब्बेतीच्या कारणासाठी माझी तुरुंगातून सुटका करण्यात आली. पण पॅरोलवर सुटून आल्यामुळे असंख्य जाचक नियंत्रणे होती. एकदा मी विमानाने दिल्लीला जाण्याची परवानगी मागितली. त्या दिवशी विमान रद्द झाले. मी जाऊ शकले नाही. आणि पुढे त्याचा खुलासा करता करता नाकी नऊ आले. मला कशासाठी पकडण्यात आले, हे शेवटपर्यंत सांगण्यात आले नाही. आणि म्हणूनच मी तुरुंगामध्ये सहा महिने का काढले, या प्रश्नाला उत्तर नाही.

**प्रश्न :** राजकुटुंबाकडे अघोषित अशी फार मोठी संपत्ती सापडली, हे खरे आहे काय ?

**उत्तर :** कौटुंबिक जडजवाहिरांचा आणि व्यक्तिगत माझा संबंध लावता येणार नाही. कारण एकत्र कुटुंबपद्धतिप्रमाणे–माझा मोठा मुलगा हा कर्ता पुरुष समजला जातो. समजा, असे जरी मानले की, जडजवाहिरांच्या संदर्भातच मला अटक करण्यात आली होती. तरी फक्त मला एकटीलाच का अटक करण्यात आली, हा प्रश्न उरतोच. म्हणजेच माझ्या अटकेमागे राजकीय कारणे असली पाहिजेत असे अनुमान निघते.

**प्रश्न :** सध्या तुम्ही आपला वेळ कशा प्रकारे व्यतीत करता ?

**उत्तर :** मी विलक्षण कार्यमग्न आहे. खूप लोक मला भेटायला येत असतात. त्यांच्या गाठीभेटीसाठी मी दोन तास राखून ठेवते. त्याखेरीज आमच्या राजघराण्याचा एक लोककल्याण निधी आहे. त्याबाबतचे निर्णय घेऊन आर्थिक साहाय्य केले जाते. माऊंट अबू येथे आमचे एक हॉटेल आहे. तिकडेही अधूनमधून फेरफटका मारावा लागतो.

**प्रश्न :** राजघराण्याचा प्रभाव अजूनही टिकून आहे, असे आपल्याला वाटते काय ?

**उत्तर :** प्रत्यक्ष सत्ता आज आमच्या हाती नसली तरी आम्ही पुष्कळ काही करू शकतो असा लोकांचा समज आहे. आमच्या आर्थिक संपन्नतेचा लाभ लोकांना मिळू शकला तर त्याचे अनुकूल परिणाम होतात. आमची इच्छा आणि शक्ती ही आमच्या पूर्वजांनी ज्या भागामध्ये राज्य केले, तेथील लोकांना अजूनही प्रेरणादायी वाटते. मात्र केवळ राजघराण्यातील व्यक्ती म्हणून यापुढे आमचा प्रभाव राहू शकणार नाही. आमचे कार्य आणि वर्तन या गोष्टी जनतेकडून विचारात घेतल्या जातील. □


**पूर्णिया**

अनिल अवचट

किमत : सहा रुपये

राजहंस-प्रकाशन

पुणे ३०

# राज्य कोणाचे ? : पृष्ठ २ वरून

मुर्दाबादच्या घोषणा झाल्या. ' रझाकार चालते व्हा 'च्या घोषणांनी वातावरण दणाणले. शामराव कदमांना धक्काबुक्की झाली.

दादा झिंदाबादही चालूच होते.

१६ एप्रिल रोजी पुन: बैठक बोलवायची आणि त्याच दिवशी नेता निवडावयाचा निर्णय सुब्रह्मण्यम सांगणार होते. ताजमहलमधील बैठकीत तसेच झाले. पण मधल्या काळात काय झाले कोण जाणे ! सुब्रह्मण्यम यांनी शंकरराव चव्हाणांनी नेतेपदाचा राजीनामा देण्याचे ठरवलं आहे; पण नवा नेता १६ एप्रिल रोजी ठरवला जाईल असे जाहीर केले. घोषणांमुळे निर्माण झालेल्या वातावरणाचा परिणाम होऊन सुब्रह्मण्यम यांनी थोडा बदल केला. ९ च्या बैठकीत शंकररावांनी राजीनामा देण्याचे मान्य केले आहे असे न सांगता १६ च्या बैठकीतच ते सांगून, नेताही त्याच बैठकीत लगेच निवडायाचे म्हटले होते. ९ च्या बैठकीत सुब्रह्मण्यम यांनी या निर्णयात बदल केला नसता तर, प्रकरण हातघाईवर गेलं असतं काहींच्या अस्तन्या वर सरसावल्या गेल्या असत्या. ऐनवेळी निर्णयात सुब्रह्मण्यम यांनी बदल केल्यामुळे हा प्रसंग टळला. वातावरणनिर्मिती काय करू शकते याचेही हे उदाहरण !

९ ते १६ एप्रिल या काळात तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न झाले. मराठवाड्याचा कोणीही मुख्यमंत्री व्हावा, काढून टाकलेल्या दादा गटाच्या मंत्र्यांना मंत्रिमंडळात घेऊ. श्रीमती गांधी, सुब्रह्मण्यम व यशवंतराव चव्हाण या तिघांच्या किंवा यशवंतराव चव्हाण यांच्या एकट्याच्या लवादाकडे हा प्रश्न सोपवायचे पर्याय शंकररावांनी दिले होते. १२ एप्रिलच्या कार्यकारिणीच्या बैठकीपर्यंत निर्णय होऊ द्यावयाचा नाही हा निर्धार शंकररावांनी केला होता. त्यामुळे त्यांनी एकामागून एक असे पर्याय देण्यास प्रारंभ केला. दादा गटाने यशवंतरावांचा लवाद आम्हाला मान्य होईल. पण त्या लवादाचा निकाल ९ एप्रिलपूर्वी लागला पाहिजे अशी अट घातली होती ती शंकररावांनी अमान्य केली. दरम्यान दादांच्या विरोधात यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील, मराठवाड्यातील उपमंत्री शिवराज पाटील उभे राहणार असे अंदाज वर्तवले जात होते. मोहिते आमच्या बाजूला आहेत असे दादा गट छातीवर हात ठेवून सांगत होता. रिट्झमध्ये होणाऱ्या दादा-गटाच्या प्रत्येक बैठकीला हजरही राहत होते. मोहिते नेतेपदाची निवडणूक लढवणार असे त्यांचे मित्र सांगत होते आणि मोहिते म्हणत होते की, काहीजण माझ्याकडे आले होते पण मी त्यांना काहीही उत्तर दिलेले नाही. शिवाजी पाटील यांनी १५ एप्रिल रोजी मोहिते आमच्या बाजूला असून ते उभे राहणार नाहीत असे पत्रकारांना सांगितले. अर्ध्या तासातच मोहिते यांचे पाठीराखे सदाशिव मंडलीक यांनी मोहिते नेतेपदाची निवडणूक लढवणार असल्याचे पत्रकारांजवळ बोलताना सांगितले. ' राजकारणात माणूस मित्राशिवाय राहू शकत नाही. मी मित्रांच्या हातात आहे ते काही म्हणतील तर त्यांचे म्हणणे माझ्यावर बंधनकारक राहील ' असे सांगून मोहिते यांनी नेतेपदाची निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले. १५ तारखेला या गोष्टी घडत होत्या त्याचवेळी मुख्यमंत्री चव्हाण यांनी आपण दिलेल्या पर्यायांचा विचार होणार असेल तर, अजूनही मार्ग निघू शकेल असे जाहीर केले. या सर्व घडामोडीमुळे गुंता वाढतच होता. तरीही मोहिते व दादांचे पाठीराखे आपल्या उमेदवाराची एकमताने निवड व्हावी यासाठी प्रयत्न चालू आहेत असे सांगत होते.

### सी. एफ. डी. शी बोलणीचालणी

शंकरराव चव्हाण विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला राज्यपालांना देणार, असा प्रचार भरपूर झाला. मुख्यमंत्रिपदाचा त्यांनी लगेच राजीनामा दिला नाही, म्हणूनही संशय वाढत होता. याचा परिणाम शंकररावांविरुद्ध आमदारांचा राग वाढण्यात होऊ लागला. वृत्तपत्रेही त्यांच्याविरुद्ध अधिक संतापली. या सर्व घडामोडी चालू होत्या त्याच वेळी शंकरराव चव्हाण जगजीवनराम यांच्या लोकशाही काँग्रेस पक्षात जाणार, अशा वावड्या उडू लागल्या. शंकररावही त्याचा स्पष्ट शब्दांत इन्कार करत नव्हते. लोकशाही काँग्रेसमध्ये जायचे ठरले तर मी स्वतः होऊन तुम्हाला सांगेन, असे संदिग्ध खुलासे ते पत्रकारांजवळ करत होते. शंकरराव दिल्लीला गेले की, जगजीवनराम–बहुगुणा आदींना भेटत होते. त्या पार्श्वभूमीवर या वावड्या उडाल्या नसत्या तरच नवल ! मुख्यमंत्री पंतप्रधानांना भेटले तर समजण्यासारखे आहे. किंवा एखाद्या मंत्र्याला त्याच्याकडे असलेल्या खात्यासंबंधी भेटणे वेगळे ! सत्तेवरून हकलवून लावले जात असताना जगजीवनराम व बहुगुणा यांच्याकडे सरकारी पातळीवर बोलणी कशी होणार ? साहजिकच ही भेट शिष्टाचाराच्या किंवा सरकारी कामाकरता झालेली नसावी, असा तर्क करण्यास बराच वाव होता व अजूनही आहे. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्रिपदावरून जाण्याची शक्यता नव्हती तेव्हा श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान या नात्याने ३ मार्च रोजी निवडणूक प्रचारासाठी महाराष्ट्रात आल्या, तेव्हा वसंतरावदादा पाटील जयप्रकाश नारायण यांच्या भेटीस गेले होते. जयप्रकाशांची दादा–ताईंना केवढी काळजी त्या वेळी लागली होती ! ताईंना लोकशाही काँग्रेस किंवा जनता पक्षात जावे असे किती ' वाटत ' होते ! चंद्रशेखर, मोहन धारिया यांच्याविषयीचे मित्रप्रेम किती ओसंडू लागले होते ! पण लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर आणि विशेषत: काँग्रेसचे पानपत होऊन मुख्यमंत्री बदलणार असे दिसू लागल्यावर जयप्रकाशांना भेटावे, चंद्रशेखर-धारिया यांचे मित्रप्रेम आठवावे, असे ताई–दादांना वाटेनासे झाले. महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांना जयप्रकाश नारायण यांच्या प्रकृतीची काळजी वाटून त्यांना भेटण्यास जाण्याचे हंगाम असतात का ! जगजीवनराम यांनी लोकशाही काँग्रेसची स्थापना केल्यानंतर महाराष्ट्रात काँग्रेसची स्थिती चांगली आहे, असे बाबूजींनी सुरुवातीला म्हटले होते. मुंबईच्या दौऱ्यानंतर जगजीवनराम यांनी महाराष्ट्रातील परिस्थितीही बदलली आहे, असे सांगितले होते, ' आम्ही त्यांना

(जगजीवनराम यांना) सांगितल्यामुळे परिस्थिती सुधारली आहे, असे जगजीवनराम म्हणत आहेत,' असे त्या वेळी दादा म्हणत नव्हते का? थोडक्यात काय, कधी दादा-ताई, तर कधी शंकरराव चव्हाण यांना काँग्रेसमधील जुन्या मित्रांची आठवण होते! या आठवणीमुळे झालेल्या भेटी राजकीय संशय निर्माण करून जातात.

शंकरराव चव्हाण सी. एफ. डी. मध्ये जाणार असल्याचे साहेबांना –यशवंतरावांना–समजले. म्हणून त्यांनी आपले मानसपुत्र शरद पवार यांना १५ एप्रिल रोजी सकाळी शंकरराव चव्हाण यांच्याकडे पाठवले, असे मला समजले. शरद पवार शंकररावांकडे गेले होते हेही खरे आहे; पण त्या भेटीचा व सी. एफ. डी. प्रवेशाचा काहीही संबंध नव्हता. पी. के. सावंत व यशवंतराव मोहिते यांचे संबंध घनिष्ट आहेत. पी. के. च्या डावपेचामधून यशवंतराव मोहिते यांची उमेदवारी निश्चित झाली होती. यशवंतराव चव्हाण ज्या सातारा जिल्ह्यामधील, त्याच साताऱ्यामधील मंत्री त्यांच्या निर्णयाविरुद्ध उभा करावयाचा आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये यशवंतरावांच्या उमेदवाराला (दादांना) बिनविरोध निवडून द्यावयाचा नाही, असा विडा पी. के.–शंकरराव यांनी उचलला होता. यशवंतराव म्हणतील ते महाराष्ट्राला मान्य होतेच असे नाही, हेही विकलांग काँग्रेस हायकमांडला दाखवून द्यावयाचे होते. यासाठी मोहितेंना उभे करण्याचा चंग पी. के.–शंकरराव गटाने बांधला. आपल्या शब्दाविरुद्ध सर्व भागांतून आवाज उठतो हे देशाला दिसू नये म्हणून १५ एप्रिल रोजी मध्यस्थी करण्यासाठी शरद पवार यांना शंकरराव चव्हाण यांच्याकडे पाठवण्यात आले होते. मोहितेंना माघार घेण्यास सांगा. दादांच्या मंत्रिमंडळात तुमच्यासह तुमच्या माणसांना स्थान दिले जाईल, अशी मध्यस्थी करण्यासाठी पवारांना पाठवले गेले होते, अशी मला मिळालेली माहिती आहे.

## जातीय पातळीपर्यंत प्रचार

बहुसंख्य आमदार विरुद्ध गेले असतानाही शंकरराव मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत नव्हते. खुर्चीच्या हव्यासासाठी ते राजीनामा देण्यास तयार नव्हते असे नव्हे! यशवंतरावांविरुद्ध निकराचा सामना देता येईल तेवढा देण्याचा त्यांचा तो प्रयत्न होता. शंकररावांनी यशवंतराव चव्हाण यांच्या उमेदवाराविरुद्ध केवळ उमेदवार उभा केला असे नाही. नरेंद्र तिडके, मेटकर, राम मेघे, पी. के., देशमुख व मराठवाडा येथील आमदारांना यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात उभे केले आणि एकत्र आणले! मध्यस्थीसाठी शंकररावांकडे गेलेल्या शरद पवारांना शंकररावांनी कसे सुनावले? पवारच ते सांगतात. 'पक्ष फुटला तरी चालेल; पण आता आम्हाला काय करावयाचे ते करू. माझ्या मुर्दाबादच्या घोषणा दिल्या, आम्हाला रझाकार म्हटले, शामराव कदमांना धक्काबुक्की केली याबद्दल नापसंती तरी व्यक्त केली काय? मराठवाड्याचा अपमान करता आणि आता मध्यस्थीचे प्रयत्न करण्यासाठी आला आहात? पक्षफुटीची काळजी आम्हाला नाही. जे काय व्हायचे ते होऊ द्या!' असे शंकररावांनी शरद पवार यांना सुनावले. 'नेतृत्वासंबंधीचा प्रश्न सोडून इतर कोणत्याही गोष्टीवर बोला,' असे सांगून शंकरराव चव्हाण यांनी शरद पवार यांना वाटेला लावले, नवा नेता एकमताने निवडला गेला असता तर, साहेबांच्या नेतृत्वाची शान राहणार होती! १६ एप्रिल रोजीच सकाळी रिट्झ हॉटेलवर झालेल्या आमदारांच्या बैठकीत बोलताना वसंतराव नाईक म्हणाले, 'यशवंतरावांची प्रतिमा डागाळेल, असे काही करू नका. देश यशवंतरावांचे नेतृत्व मानतो; पण महाराष्ट्र त्यांचे नेतृत्व मानत नाही, असे वातावरण मेहरबानी करून निर्माण करू नका!' शरद पवार शंकररावांकडे का फेऱ्या मारत होते, त्याचे गुपित नाईकांच्या भाषणातून बाहेर पडले. म्हणूनच 'महाराष्ट्रात माझ्याविरुद्ध जे काही चालले आहे ते यशवंतराव चव्हाणांच्या प्रोत्साहनाने चालले आहे.' असे शंकरराव शरद पवार यांना बजावून सांगत होते.

शंकररावांना काढण्यासाठी मोहीम सुरू करण्याचे ठरले तेव्हाच यशवंतराव मोहिते यांनी, प्रथम पुढचा नेता कोण ते ठरवा असे यशवंतराव चव्हाण आदींना सांगितले होते. दादा 'संन्याशी' झाले आहेत. त्यामुळे शरद पवारांचे नाव पुढे येईल अशी भीती मोहिते यांना वाटत होती. पवारांचे नाव आम्ही मुळीच मान्य करणार नाही अशी मोहिते यांनी भूमिका घेतली. मग वसंतरावदादांचे नाव यशवंतरावांनी (चव्हाण) पुढे आणले. दादांच्या विरोधात उभे राहावे की नाही, असा संभ्रम मोहितेंना पडला. तेव्हा पी. के. सावंतांनी कृष्णाची भूमिका वठवली. मोहितेंना लढण्यासाठी कुरूक्षेत्रावर त्यांनी आणले. तोपर्यंत रिट्झमधील शंकरराव चव्हाण यांच्या विरोधी गटाच्या बैठकींना मोहिते हजर राहत होते. अगदी १६ एप्रिल रोजी सकाळी झालेल्या बैठकीतसुद्धा मोहिते हजर होते. म्हणूनच दादांचे दादाजी कोंडदेव आपणच आहोत असे समजून वावरणारे शिवाजीराव पाटील, मोहिते यांचा आम्हाला पाठिंबा आहे असे पत्रकारांना सांगत होते!

रिट्झमध्ये झालेल्या बैठकांमध्ये मोहिते यांना भाषण करण्यास सांगितले पाहिजे होते. म्हणजे त्यांना, दादांना पाठिंबा देण्यास बांधून घेता आले असते, असे दादा गटाच्या लोकांना वाटत होते. वसंतराव नाईक म्हणत होते, यशवंतरावांना उभे राहूच दे. म्हणजे त्यांना आपण मोठे आहोत, आपल्याला काय स्थान आहे याची जाणीव होईल. वसंतराव नाईक हे म्हणत होते तेव्हा मोहिते यांचा अहोजाहोनेसुद्धा उल्लेख करत नव्हते! एकमताने दादांची निवड व्हावी यामागे पक्षातील ऐक्याची भावना दिसावी हा हेतू नव्हता. यशवंतरावांच्या शब्दाला महाराष्ट्रात किती किंमत आहे हे दाखवावे हा हेतू होता. यशवंतरावांच्या पाठिंब्याने उभे राहणाऱ्या व्यक्तिविरुद्ध कोणाला तरी उभे कराच हा आग्रह दिल्लीतील काही वरिष्ठ नेत्यांनीही धरला होता. त्यात श्रीमती गांधी, ब्रह्मानंद रेड्डी यांचाही समावेश होता. हायकमांडमधील काहींचा आपल्याला पाठिंबा आहे हे पाहूनच शंकरराव चव्हाण यांनी राज्यात मानहानीची टीका झाली तरी चालेल, पण राजकारण खेळण्याचा निर्धार केला. पी. के. सावंत यांनी यशवंतराव मोहिते यांना उभे राहण्याचा आग्रह केल्यावर दादा–मोहिते लढतीला पाटील विरुद्ध देशमुख असे किळसवाणे जातीय स्वरूपही दिले गेले. मोहिते देशमुखांपैकी! त्यामुळे देशमुखांची देशमुखी पाटलांनी हाणून पाडली पाहिजे असे 'पाटील'–आमदारांना सांगितले जात होते, आणि लढतीत पाटील विजयी झाले. या लढतीचा परिणाम म्हणून काहींनी काँग्रेस सोडली तर,

याच यशवंतराव चव्हाण यांचा तो नैतिक पराभव म्हणावा लागेल. सर्वांना बरोबर घेऊन जाण्यासाठी शंकररावांचे नेतृत्व बदलले पाहिजे असे साहेबांचे म्हणणे होते. दादांच्या निवडीनंतर काहींनी पक्ष सोडला तर सर्वांना बरोबर घेण्याचे तत्त्व कोठे सांभाळले जाणार आहे? म्हणून पक्षत्यागाची घटना घडली तर, यशवंतराव चव्हाणांचा तो नैतिक पराभव ठरेल. दादा पडले असते तरी त्यांचा पराभव ठरला असता आणि एकेकाळच्या सहकाऱ्यांचा, अनुयायांचा पक्षत्याग झाला तरी तो यशवंतरावांचा पराभव म्हणावा लागेल! यशवंतरावांचा पराभव दुहेरी आहे. निर्भेळ यशाचे समाधान त्यांना मिळणार नाही.

¤

दादांची नेतेपदी निवड झाली. सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय चळवळीत पडलेल्या दादांनी क्रमाक्रमाने आपले नेतृत्व वाढीस लावले. महाराष्ट्राचे नेते म्हणून ते वावरू लागले. याला त्यांचे नेतृत्वाचे कसब कारणीभूत आहे हे मान्यच करावे लागेल. पण 'दादा मुख्यमंत्री झाले, कारभार कोण करणार? असा प्रश्न आताच निर्माण झाला आहे. खरा मुख्यमंत्री कोण? दादा की, त्यांच्यामागे उभा राहिलेला चौघांचा गट?

नेतेपदाची निवड झाल्यावर विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात दादांची पत्रकार परिषद झाली. दादांना विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे एकतर, माजी मुख्यमंत्री, खासदार वसंतराव नाईक देत किंवा नाटकात काही वेळा पात्रांना प्रॉम्प्टिंग केले जाते असे खासदार नाईक दादांना प्रॉम्प्टिंग करून काय उत्तर द्यावयाचे ते सांगत. बऱ्याच वेळा दादांऐवजी नाईकच पत्रकारांना 'हे आताच विचारू नका,' 'सध्या तुम्ही एवढेच घ्या' अशा सूचना देत होते. उद्या नाईक प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाले तर, या पत्रकारात वाढच होणार आहे.

दादांच्या पत्नी शालिनीताई–महत्त्वाकांक्षी व्यक्ती! पतीला मुख्यमंत्रिपद मिळाले असे वाटण्यात काहीच गैर नाही. पण पतीच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडावी म्हणून त्या जेव्हा राजकारण करतात तेव्हा स्वतः दादाही अडचणीत येतात! दादा केवळ मंत्री असताना ताई कारभारात कशा हस्तक्षेप करत होत्या याची ज्यांना थोडीशी जरी कल्पना असेल, ते महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एका मुख्यमंत्र्याच्या पत्नी–ताई–काय करतील त्याचीही कल्पना करता येईल. पहिल्या ताई श्रीमती कन्नमवार! दुसऱ्या ताई–शालिनीताई पाटील.

यशवंतरावांचे मानसपुत्र शरदराव पवार! मुख्यमंत्रिपदाचे भावी उमेदवार! यशवंतरावांची मर्जी सांभाळण्यासाठी शरद पवारांना दुखवून चालणार नाही. यशवंतरावांना दुखवायचे नसेल तर, शरद पवार यांच्या शब्दाला किंमत दिलीच पाहिजे. या जोरावर शरद पवार दादांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणार! यशवंतराव-पवार यांची जवळीक लक्षात घेता मुख्यमंत्री नसतानाही पवारांचा शब्द परवलीचा होईल. आणि तेही आपल्या मताप्रमाणे मुख्यमंत्री दादा वागत आहेत हे दाखवून देण्याचा प्रयत्न करतील. त्यात पवार किती यशस्वी होतात हा प्रश्न आहे. दादांनी मंत्रिमंडळ २० एप्रिल रोजी रात्री जाहीर केले तेव्हा दादासाहेब रुपवते यांना हे समजले तेव्हा २० एप्रिलच्या रात्रीच रुपवतेंना मंत्री करावे असा आग्रह त्यांनी धरला असे समजले.

शिवाजी गिरिधर पाटील यांना वसंतरावदादांचे खरे हितकर्ते आपणच आहोत असे वाटते. दादांचे प्रवक्ते म्हणून ते नेता निवडीच्या राजकारणात वावरतच होते. हीच भूमिका यापुढेही वठवण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. मुख्यमंत्रिपदाची शपथ दादांनी घेतल्यानंतर दादांच्या पहिल्याच पत्रकार परिषदेत शिवाजीराव पाटील दादांच्या उजव्या हाताला बसून त्यांना मार्गदर्शन करीत असल्याचे दृश्य दिसतच होते. वास्तविक पाहता त्या वेळी शिवाजीराव पाटील मंत्री म्हणून नेमलेले नव्हते की, प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारीही नव्हते.

### असंतुष्ट आत्मे

दादांना आपल्या हातात ठेवण्याचा या सर्वांचा प्रयत्न राहील. त्यात पहिल्या पत्रकार परिषदेत दादांनी घोषित केल्याप्रमाणे त्यांनी स्वतःकडे खाती ठेवली नाहीत तर मात्र दादा नामधारी मुख्यमंत्री होण्याचाच धोका संभवेल! महाराष्ट्राचे राजकारण आपल्या हातात ठेवण्याचा या मंडळींचा प्रयत्न होत राहील तेव्हा हळूहळू त्याच्याविरुद्ध आणखी एखाद्या गटाचे राजकारण शिजू लागेल आणि दादांच्या जवळ गेलेल्यांपैकी एखाद्याला हाताशी धरून त्याला मुख्यमंत्री करण्याचा प्रयत्न होईल. यावेळीही नेता हटाव


## वर्गणीदारांस सूचना

१ : अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२ : वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३ : तीन वर्षांची वर्गणी रु. १००/– आहे.

४ : रु. ३००/–ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

मोहिमेचे कंत्राटदार बाबुराव कोतवाल, विलास लोणारी, रामकृष्ण नाईक, रवींद्र मोरे आदी दुसऱ्या कोणाचे तरी कंत्राटदार बनतील ! कारण, दादांनी घोषित केलेल्या मंत्रिमंडळात त्यांच्यापैकी कोणाचीही वर्णी लागलेली नाही. मंत्री केले नाही म्हणून शंकरराव चव्हाणांच्या विरोधात जाणारे बाळासाहेब पवार यांना दादांनीही वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. आता तरी आपण मंत्री होऊ असे वाटून ज्यांनी शंकररावांविरुद्ध मोहीम उघडली ते असंतुष्ट आत्मे असंतुष्टच आहेत ! त्यांचे काय ?

दोन्ही सभागृहांपैकी कशाचाच सभासद नसलेले नाशिकराव तिरपुडे व सुधाकर नाईक यांना मंत्रिमंडळात घेतल्यामुळे इच्छुक असलेल्या आमदारांमध्ये द्वेष निर्माण झालेलाच आहे. शिवाय, लोकसभा निवडणुकीत शंकररावांनी आपल्याच पाहुण्यांना तिकिटे दिली अशी ओरड झाली होती. मग दादांच्या मंत्रिमंडळात पाहुण्यांचे राजकारण झालेले नाही काय ?, वसंतराव नाईक यांचे पुतणे सुधाकर नाईक यांना कोणत्या कारणामुळे मंत्रिमंडळात घेण्यात आले आहे ? अशी कोणती कार्यक्षमता त्यांच्याजवळ आहे ? कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसताना त्यांना मंत्रिमंडळात का घेण्यात यावे ? उत्तमराव राठोड हेही वसंतराव नाइकांचे पाहुणे आहेत. नाईकांनी आपल्या पाहुण्यांची सोय केली. पण त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचे साडू दादासाहेब जगताप व भाचे बाबुराव कोतवाल यांना हेचि फळ काय मम तपाला असे म्हणायची वेळ आली ! यशवंतरावांच्या नातेवाईकांना कृष्णा-कोयनेच्या संगमावर हवा खाण्यास लावून आपल्या नातेवाईकांना राजकारणाच्या प्रवाहात आणून सोडण्यात वसंतराव नाईक यशस्वी ठरले आहेत.

राज्याच्या विभागाप्रमाणे मुख्यमंत्रिपद देण्याचा प्रघात पडला आहे. काँग्रेसची राजवट भविष्य काळातही राहिली आणि विभागवार मुख्यमंत्रिपद देण्याची प्रथा मोडली नाही तर, काही वर्षांनंतर मुख्यमंत्रिपद आपल्याच घराण्याकडे यावे या हेतूने वसंतराव नाईक यांनी आपल्या पुतण्याला मंत्रिमंडळात आणले असण्याची शक्यता आहे. हा हेतू तडीस किती जाईल हे वेगळे ! पश्चिम महाराष्ट्राकडे ८–१० वर्ष मुख्यमंत्रिपद राहिले की पुढची टर्म विदर्भाची येईल. तेव्हा विदर्भातून सुधाकर नाईक यांचे नाव पुढे आणावयाचे असेल तर, आतापासूनच त्यांना राज्याच्या राजकारणात आणून सोडले पाहिजे. याच एका कारणामुळे सुधाकर नाईक साधे आमदार नसताही त्यांना मंत्रिमंडळांत घेतले गेले आहे. सुधाकर नाईक यांना ते आपले पुतणे आहेत म्हणून मंत्रिमंडळात घेतले, असे होऊ नये म्हणून आपले व आपल्या मोठ्या भावाचे–बाबासाहेब नाईक यांचे–बिनसले आहे. बाबासाहेबांनी दादांशी संपर्क साधून आपल्या मुलाला मंत्रिमंडळात घेण्यासाठी प्रयत्न केला असा प्रचार वसंतराव नाईक यांनी मंत्रिमंडळाची रचना होण्यापूर्वीपासूनच केला आहे. हा प्रचार करण्याला 'साकेत–पत्रकार' उपयोगी पडतात ! बाबासाहेबांविषयी वसंतराव नाईकांच्या भावना, आदर ज्यांना माहिती आहे ते शेंबडे पोरगेही बाबासाहेब नाईक व वसंतराव नाईक यांचे बिनसले आहे यावर विश्वास ठेवणार नाही !

## प्रदेश काँग्रेस अध्यक्ष दूरच

मंत्रिमंडळाची रचना कशी असावी हे ठरवण्यासाठी मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांनी यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, मधुकरराव चौधरी आदींशी चर्चा केलीच. पण दोन हजारावर कार्यकर्ते व आमदार यांच्याशीही चर्चा केली. पण प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र तिडके हे मंत्रिमंडळ रचनेच्या चर्चेत कोठे होते ? मंत्रिमंडळ बनवत असताना प्रदेश काँग्रेस अध्यक्षाला विश्वासात घेतले नाही ही महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे ! मंत्रिमंडळासंबंधी चर्चा झाल्या. त्या ठिकाणी तिडके एकदाही फिरकले नाहीत. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याच्या नादांत दादा प्रदेश काँग्रेस अध्यक्षालाच विसरलेले दिसतात !

कधी नव्हते एवढे चाळीस जणांचे मंत्रिमंडळ करूनही नेता हटवण्याच्या कामात पुढाकार घेतलेल्यांना मंत्रिमंडळात घेतले गेले नाही; या लोकांचा असंतोष किती काळ शांत राहणार आहे ? हितसंबंधितांच्या हितसंबंधांना दादांच्या राजवटीत संरक्षण मिळते म्हणून त्यांची राजवट बराच काळ टिकणार की कारभारांत ढिलेपणा आला आहे असे सांगून काही वर्षातच आज जवळचे म्हणवणारे सहकारी दादांच्या विरोधांत जाणार या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. परंतु आज तरी दादांपेक्षा त्यांच्या मागून कार्य करणाऱ्या तिघा–चौघांच्या गटाचेच महाराष्ट्राच्या राजकारणावर वर्चस्व राहणार हे निश्चित ! कदाचित यालाच सामुदायिक नेतृत्व असे गोंडस नावही दिले जाईल.

हे तिघा–चौघांचे वर्चस्व जसजसे वाढत जाईल तसतशी आणखी एक 'टोळी' उभी राहील. मात्र ही घटना लगेच घडणार नाही. काही कालावधी त्यासाठी जावा लागेल ! □

पॅपिलॉन
पॅपिलॉन
लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर
किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चक्रमचक्री (११)

दीर्घस्मृती विश्वनाथ

## □ खडू–डस्टर झिंदाबाद !

'ती पाहा, ती पाहा, आली आली !'

'कोण आली ?'

'मिरवणूक हो ! पाहिलीत ना, बोरीबंदरकडून ओव्हलच्या दिशेने येणारी ? अरे, मिरवणुकीतली मंडळी तर ओळखीची दिसतात.'

'खरंच की ! बिनीला ते पाहा आपले प्रा. केणी आणि ठेकेदत्त. आहे ना, पंधरा महिन्यांच्या कृष्णगृह–वासाचं तेज ? नंतर आदबीचं अंतर राखून चालताहेत ते प्रा. मांजरेकर आणि कामत. मागून ही तर आपली पुण्याची माणसं–प्रा. मेहता, तारळेकर बाई, उन्हात ज्यांचं टक्कल चकाकतंय् ते गोळे.'

'पण या खडूधारांच्या मागून पंधरा–वीस पावलांवर चाललेलं ते एक टोळकं बघितलंत ना !'

'कोण हो ते ?'

'त्यांच्यातही एकदोन जवळपास–हुतात्मे आहेत बरं का – प्रा. केन्द्रूकर आणि प्रा. अनिरुद्ध देशपांडे ! 'आम्ही पण तुरुंगात होतो म्हटलं.' हा नूर दिसतोय् ना त्यांच्या चेहऱ्यावर ? त्यांच्या मागून तरुणपणी राजनारायण जसे दिसत असतील तसा दिसणारा जवान आहे ना, तो मुकुंद तापकीर ! पुण्यातल्या तरुणाईचा तारणहार !'

'तापकीरच्या बरोबर वाढलेल्या दाढीवरून पुनःपुनः हात फिरविणारे आणि नाक चोळणारे कोण चाललेत हो ? हातात एक छडीही दिसतेय्.'

'हां हां, ते आहेत विद्वद्वर्य विनायक महादेव ! त्यांच्या मते तापकीर हे पिळल्या जाणाऱ्या असंघटित वर्गाचं प्रतिनिधित्व करतात, तर आघाडीचे डस्टरधारी पिळवणूक करणारे सुखासीन प्राध्यापक आहेत. प्राध्यापकांनी संप केला तर विद्यार्थ्यांनी हातात छडी घेऊन प्राध्यापकांना जाब विचारला पाहिजे, असं त्यांनी पूर्वीच सांगितलं आहे– उदाहरणादाखल. तेव्हा थोड्याच वेळात तापकीर आपल्याकडे छडी मागतील या अपेक्षेने छडी घेऊन चालतायत. पण छडी मारता मात्र कामा नये हो ! आता ते पुटपुटताहेत ना ते हेच – छडी घ्या, पण मारू नका.'

'पण तापकीर काही दखल घेता दिसत नाहीत विनायक महादेवांची.'

'छे. त्या अ. भा. वि. प. वाल्यांची घोषणा ऐकलीत ना ! 'विरोध नाही मागणीला, तो तर केवळ वेळेला', म्हणजे प्राध्यापकांच्या मागण्या त्यांना मान्य आहेत, मात्र परीक्षेवर बहिष्कार घालू नका, इतकाच त्यांचा आग्रह आहे.'

'म्हणजे छडी विनायक महादेवांच्याच हाती राहणार तर.'

'तसंच दिसतंय. आपले विनायक महादेव आणि शॉ यांच्यांत फार साम्य आहे. दाढी बघून म्हणत नाही मी ! शॉचं बोलणं लोक हसून सोडून द्यायचे तसंच यांच्याही भाषणांचं होतं. अर्थात विद्वद्वर्ग जास्ती अपेक्षाही ठेवीत नसावेत.'

'पण हे सगळं पब्लिक अशा उन्हातान्हात आणि उकाड्याच्या दिवसांत मुंबईच्या डांबरी रस्त्यावर कशापायी आलंय् ?'

### कहाणी दुर्दशेची

तीच तर महत्त्वाची गोष्ट आहे. मागे पु. ल. देशपांडे एकदा म्हणाले होते, 'पगारवाढीसाठी शिक्षकांचा मोर्चा' अशी बातमी वाचली की डोळ्याला पाणी येते. पण आपण लोक आता असे निगरगट्ट झालो आहोत की, शिक्षकांचा मोर्चा म्हटल्यावर पहिल्यांदा आमच्या आय्. आय्. टी. ला बसणाऱ्या आणि मेडिकलला जाऊ इच्छिणाऱ्या मुलांचं कसं व्हायचं ही चिंता आम्हाला लागते–मग शिक्षकांच्या मागण्यांचा विचार ! आपल्या समाजाचं प्रतिनिधित्व करणारं जे सरकार, त्याच्या निर्लज्जपणाला सीमाच उरलेली नाही. माजी शिक्षणमंत्री प्रभा राव यांनी ९ एप्रिल ७५ रोजी दिलेली आश्वासनं आता तरी अंमलात आणा, या मागणीला त्यांनी १३ एप्रिल १९७७ रोजी नकार दिला, आता बोला !

पण या कॉलेज शिक्षकांच्या मागण्या तरी काय आहेत ?

१९७५ च्या मार्चमध्ये कॉलेज–शिक्षकांनी परीक्षांवर बहिष्कार घातला होता. त्या वेळी त्यांच्या तीन मागण्या होत्या : (१) आम्हाला वेळेवर आणि पुरा पगार मिळेल अशी व्यवस्था करा. (२) शिक्षकांना वेळोवेळी कामावरून काढून टाकण्यात येते, त्याला आळा घाला आणि नोकरीची शाश्वती द्या. (३) विद्यापीठ अनुदान मंडळाने मान्य केलेली वेतनश्रेणी आम्हाला द्या. या सर्व मागण्या महाराष्ट्र सरकारने ९ एप्रिल १९७५ ला मान्य केल्या, इतकेच नव्हे तर त्या कशा अंमलात आणण्यात येतील याविषयी रोखठोक आश्वासनेही दिली. आज दोन वर्षांनंतर अशी स्थिती आहे की, ७५ सालची परिस्थिती परवडली !

असं झालं तरी काय ?

पहिल्यांदा वेळेवर आणि पूर्ण पगाराची मागणी घेऊ. पूर्वीपासून ग्रामीण भागातील कॉलेजांतून वेळेवर आणि पुरा पगार मिळाला, असं क्वचितच होत असे. मालेगावचं कॉलेज आणि कोल्हापूरचं गोखले कॉलेज यांची ख्याती तर सर्वांना माहीतच आहे. आज असं झालं आहे की, धुळे, जळगाव, नगर आणि खुद्द पुणे इथल्याही कॉलेजांतून वेळच्या वेळी पगार होत नाहीत. कित्येक नामवंत कॉलेजे दर पस्तीस दिवसांनी पगार देऊन वर्षातून दोन महिन्यांचा पगार बाकी ठेवण्याच्या योजना शिक्षकांना विश्वासात घेऊन आखत असतात ! नऊ-नऊ, बारा-बारा आणि पंधरा-पंधरा महिन्यांचे पगार थकल्याच्या हकीकती आहेत. बायकामुलांना माहेरी पाठवून, वाण्याची तोंडं चुकवत, रिकाम्या खिशाने, भकास चेहऱ्याच्या प्राध्यापकांच्या टोळ्या गावात गटाण्या घालत हिंडत असतात, अशी उदाहरणे आहेत. जुन्या एका सिनेमात होतं ना, 'वकिली म्हणजे बेकारी' तसं 'प्राध्यापकी म्हणजे वेठ–बिगारी' असं नवं वाक्य प्रचारात येऊ लागलंय.

पण बिन–पगारी का होईना, नोकरी तर आहे ?

हे कुंकवापुरतं सौभाग्य तरी सगळ्यांच्या कपाळी कुठंय ! मालेगावच्या कॉलेजातल्या सात शिक्षकांना दोन वर्षांपूर्वी काढून टाकल

त्यांना द्या म्हणून सरकारनं लिहिलं, विद्यापीठानं लिहिलं, उपोषणं झाली, पण अजून ते सप्तर्षी रस्त्यावरच आहेत. हे जुने बडतर्फ प्राध्यापक तर सोडाच, पण नवीन हजार–पाचशे कॉलेज–शिक्षक बेकार होणार त्यांचं काय ?

ही काय नवी भानगड ?

पुणे विद्यापीठाच्या एकशेदोन कॉलेजेसपैकी बासष्ट कॉलेजेसना सरकारकडून पत्रं गेली आहेत, 'तुमच्याकडचे अमुक अमुक विषय बंद करा' म्हणून. कुठे मराठी बंद करा, संस्कृत बंद करा, तत्त्वज्ञान बंद करा वगैरे ! मग चालू काय ठेवा ? आपले संकटराव करीत तसं शिवलीलामृताचं वाचन ? हे असंच चालू राहलं तर, एकट्या पुणे विद्यापीठात दोन–तीनशे आणि साऱ्या महाराष्ट्रात दीड हजार शिक्षक यंदा बेकार होतील. नंतर कदाचित ही संख्या चक्रवाढीनं वाढतही राहील. आणि इतकं असून आपले विनायक महादेव म्हणतात की, कॉलेज–शिक्षकांचा वर्ग हा सुखासीन, संघटित आणि असंघटितांची पिळवणूक करणारा आहे, म्हणून !

आहेत ह्या नोकऱ्या टिकत नाहीत आणि आहेत ते पगार मिळत नाहीत, अशी स्थिती असताना नव्या पगारांची मागणी हे लोक कशी करतात ?

## नवी वेतनश्रेणी

सगळ्यांना-म्हणजे समाजाला, सरकारला, विद्यार्थ्यांना आणि विनायक महादेवांना–डाचणारी गोष्ट तर हीच आहे. वेळेवर पगार व्हावा, हे सगळ्यांना पटतं. आहे ही नोकरी जाऊ नये, याला कोणाची हरकत नाही. पण सातशे–चाळीस–सोळाशे अशी घवघवीत वेतनश्रेणी या खडूघाशांना मिळावी, ही गोष्ट मानवत नाही. अर्थात, ज्या पटणाऱ्या गोष्टी आहेत, त्याही प्रत्यक्षात येत नाहीत, हे सोडा.

पण मीही तेच म्हणतो. अहो, वर्षातून जेमतेम सहा महिने आणि तेही रोजी दोन–अडीच तास कसंबसं शिकवणारी ही मास्तरं सात–सातशे रुपये बेसिक म्हणजे झटक्याला नऊ–साडेनऊशे रुपये पगार मागायला लागली तर द्यायचं कसं ? बरं, तेवढा वेळ का होईना, पण हे लोक मनापासून काम करतात असं मानलं तरी, समाजाला उपयोग काय त्या कामाचा ? यांनी दिलेल्या डिग्र्यांनी काही नोकऱ्या मिळत नाहीत, की ज्ञानही वाढल्याचं दिसत नाही.

हे तुमचं मत झालं. पण विद्यापीठ अनुदान मंडळाला वाटतं ना की, शिक्षकांच्या कामाची किंमत किमान सातशे रुपये आहे असं. १९६६ मध्ये शिक्षण मंडळाने दिलेल्या अहवालात असं म्हटलं होतं की, दर पाच वर्षांनी शिक्षकांच्या पगारात सुधारणा झाली पाहिजे. त्यानुसार अनुदान मंडळानं सेन कमिटी म्हणून एक कमिटी नेमली आणि तिनं ही श्रेणी सुचवली. ती अंमलात यायला हवी होती १९७३ सालापासून. त्यासाठी शिक्षकांनी परीक्षांवर बहिष्कार घातला ७५ साली. तेव्हा महाराष्ट्र सरकारने जानेवारी त्र्याहत्तरपासून नवीन श्रेणीनुसार पगार देऊ, असं मान्य केलं. आज सत्त्याहत्तर सालीसुद्धा नवा पगार मिळत नाही ! आता त्र्याहत्तरपासूनचा पगारातला फरक द्यायचा म्हटला तरी, प्रत्येक शिक्षकाला ५–६ हजार रुपये द्यावे लागतील ! आणि महाराष्ट्रात किमान पंधरा हजार कॉलेज–शिक्षक तरी असतील ! शिवाय, दरम्यान ७८ सालची वेतन सुधारणा आलीच, कारण शिक्षण मंडळानं म्हटलंच आहे, दर पाच वर्षांनी वेतनश्रेणीचा फेरविचार व्हावा म्हणून. पण सरकारनं जर नवी वेतनश्रेणी मान्य केली होती तर, हे सगळं प्रकरण श्रीखंडाच्या चक्क्यासारखं टांगून कशाला ठेवलं ?

९ एप्रिल १९७५ ला सरकारनं नवी वेतन-श्रेणी मान्य केली. नंतर २६ जूनला आणीबाणीचा पुकारा झाला आणि शंकररावांचा अनुशासन–शंकर झाला. त्यांना लहानपणापासूनच सर्व शिक्षकांचा अतिशय तिटकारा असावा ! त्यामुळे त्यांनी ठरवलं की, या जमातीला झोपडून काढायचं ! म्हणून सरकारनं ऑक्टोबर १९७५ मध्ये नवी वेतन–श्रेणी अमलांत आणण्याबद्दल हुकूम काढला. त्यांतनवीन वेतन हवं असेल तर शिक्षकांनी अनेक अटी स्वीकारल्या पाहिजेत असं म्हटलं होतं. या अटी विद्यापीठ अनुदान मंडळानं घातलेल्या नव्हत्या, तर महाराष्ट्र सरकार, त्याचं शिक्षण खातं आणि मुख्य म्हणजे त्या वेळचे शिक्षण–सचिव मोघे यांच्या डोक्यातून निघालेली ती शक्कल होती.

अशा अटी तरी काय होत्या ?

अटी अनेक होत्या; आणि बहुतेक सगळ्याच शिक्षकांची मानहानी करणाऱ्या होत्या. एकच अट सांगतो. कॉलेजेस् वर्षातून चार महिने बंद असतात. त्या चार महिन्यांपैकी फक्त दीड महिना शिक्षकाला सुट्टी मिळेल. उरलेले अडीच महिने 'कॉम्पीटंट ॲथॉरिटी' ठरवेल ती कामं शिक्षकानं केली पाहिजेत. इतकंच नव्हे तर दीड महिन्याच्या रजेत गावाला जायचं असेल तर त्या 'कॉम्पिटंट ॲथॉरिटी'ची परवानगी घेतली पाहिजे ! बरं ही ॲथॉरिटी कोण, तिनं सांगायची कामं कोणती याचा काही खुलासा ?

तर काय, त्या आणीबाणीच्या काळात कलेक्टर आणि मंत्री यांच्या घरचं पाणी भरण्याचं कामसुद्धा सांगितलं असतं !

तरी शिक्षक संघटनांनी वेळोवेळी वाटाघाटींची मागणी केली. पण त्यांच्या पत्रांना उत्तरं सोडाच, पोचसुद्धा सरकारनं पाठवली नाही. उलट संघटनेचे अध्यक्ष केणी आणि चिटणीस ठेकेदत्त यांना अटक केली. साहजिकच संघटना हायकोर्टात गेल्या आणि सर्व प्रकरण अजून तिथंच आहे !

## परिक्षांवरील बहिष्कार

तुम्ही म्हणता त्यावरून या मास्तर–मंडळींची फार दिवस उपेक्षा झालेली दिसते खरी, पण तरी देखील परीक्षांवर बहिष्कार टाकून त्यांनी विद्यार्थ्यांना ओलीस धरावं, हे काही खरं नाही ! सकाळ, केसरी, महाराष्ट्र टाईम्स हे सगळे असंच सांगून राहिलेत की, 'समाजाची सहानुभूती तुम्ही गमावाल !'

आणि आजपर्यंत काय मोठी सहानुभूती समाजानं यांच्याविषयी दाखवली ? अहो, समाजाची सहानुभूती असती तर 'मालेगावच्या कॉलेजातल्या शिक्षकांनी आत्महत्या केव्हा करावी ?' असा प्रश्न विधानसभेत कशाला विचारावा लागला असता ? ही वर्तमानपत्रं आठवड्यातून एकदा चित्रपटांविषयी सदर चालवतात, एकदा खेळाविषयी सदर देतात, पण महिन्यातून एकदा देखील शिक्षकांच्या हालचालींविषयी पुरवणी काढणं यांच्यानं होत नाही; उलट, शिक्षक संघटनांची पत्रकं मात्र स्वतः सेन्सॉर करून छापतात, असं मानायला जागा आहे. बरं, वर्षभर मुलं

कॉलेजात जातात, तेव्हा असा उपेक्षिलेला, उद्यांच्या फिकिरीत असलेला शिक्षक त्यांना शिकवत असताना मुलांच्या शिक्षणाचा खेळ-खंडोबा होत नाही; मात्र, परीक्षा–की जो शिक्षणातला न्यूनतम महत्त्वाचा भाग आहे–अडचणीत आल्या की विद्यार्थी ओलीस धरले जातात काय? समाजाला शिक्षणाविषयी आस्था नाही, मुलांच्या परीक्षा होण्यात त्याचा जीव अडकला आहे! अशा समाजाकडून, म्हणजेच त्या समाजाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या सरकारकडून काही मिळवायचं असेल तर त्या समाजाला महत्त्वाची वाटणारी गोष्टच अडवली पाहिजे.

थोडक्यात, ही शिक्षक संघटना आणि समाज यांच्यातलीच लढाई आहे, म्हणा की!

शिक्षक संघटना आणि सरकार यांना तसं म्हणणं सोयीचं वाटत नाही इतकंच! पण या सर्व प्रकारणाचं खरं स्वरूप तेच आहे. कारण, आपल्या समाजाला शिक्षणाविषयी आस्था नाही.

परीक्षात शिक्षणाचं सर्वस्व साठलेलं आहे अशी त्याची वेडगळ समजूत आहे. त्यामुळे परीक्षेत वर्षानुवर्ष आलटूनपालटून येणाऱ्या १५–२० प्रश्नांची तयारी करून घेणं यापलीकडे लोकांच्या दृष्टीने शिक्षणाला अर्थ नाही. ते काम खाजगी क्लासवाले आणि खाजगी शिकवण्या घेणारे शिक्षक करतातच आहेत! त्यासाठी पैसा टाकायला लोकांना फारसे जड वाटत नाही. मग मरे ना का कॉलेज-शिक्षक आणि तिथे मिळणारं शिक्षण! अशी वृत्ती समाजाची असेल, तर शिक्षकांना परीक्षांवरील बहिष्काराखेरीज दुसरा मार्गच उरत नाही! सुदैवाने परीक्षा घेणे त्यांच्या हातात आहे, आणि परीक्षांना–भ्रान्त समजुतीतून आलेले का होईना–महत्त्व आहे.

आता वसंतरावदादांनी वाटाघाटी चालू केल्या आहेत, निघेल काही तोड!

तोड निघेल, बहिष्कार मागे घेतला जाईल; विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांची घोडी गंगेत न्हातील! मग पुन: आहेतच सर्व लोक वर्षभर झोपा काढायला मोकळे! □

# पाकिस्तान

## पुन्हा लष्करी क्रांतीकडे

वा. दा. रानडे

भारतात इंदिरा गांधींची हुकूमशाही पद्धतीची राजवट जनतेने निवडणुकीत शांतता व लोकशाहीच्या मार्गाने उलथून टाकली. भारताच्या आधी नऊ दिवस पाकमध्ये निवडणुका झाल्या. आपण प्रथम निवडणुकांची घोषणा केल्याने इंदिरा गांधींना निवडणुका घेणे भाग पडले अशी फुशारकी भुट्टो मारीत होते. इंदिरा गांधींच्या निवडणूक निर्णयामागे हे एक कारण असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाकिस्तानात निवडणुका होऊन लोकशाही येत आहे, तर भारतात हुकूमशाही स्थिर होत आहे, अशी प्रक्रिया इंदिरा गांधींना जगात निर्माण होऊ द्यावयाची नव्हती'. म्हणून भुट्टोंच्या निवडणूक घोषणेनंतर थोड्याच दिवसांत त्यांनी निवडणुकांची घोषणा केली.

पण दोन देशांतील साम्य येथेच संपते. पाकिस्तान नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकांत भुट्टोंच्या पाकिस्तान जनता पक्षाने २१६ पैकी १५५ म्हणजे दोनतृतीयांशपेक्षा अधिक जागा मिळविल्या. विरोधी पक्षांच्या आघाडीस अवघ्या ३३ जागा मिळाल्या. पाकिस्तानात नागरी सरकार अधिकारावर असताना झालेल्या या पहिल्याच निवडणुका. नऊ विरोधी पक्षांनी या निवडणुकांसाठी संयुक्त आघाडी केली होती. आपल्या पराभवाने त्यांना धक्का बसला. आपण एवढे मोठे यश मिळवू असे भुट्टोंच्या पक्षालाही वाटत नव्हते. निवडणुकांत बनवाबनवीचे प्रकार घडले. या खुल्या निवडणुका नसून मतपेट्यांत घालमेल करून भुट्टोंच्या पक्षाने निवडणूक जिंकली, असा आरोप विरोधी पक्षांच्या आघाडीचे अध्यक्ष मौलाना मुफ्ती महमूद यांनी केला. विरोधी पक्षाचे दुसरे नेते एअरमार्शल असगरखान म्हणाले, 'या निवडणुका अविश्वसनीय आहेत. कोणताही सुबुद्ध माणूस हे निकाल मान्य करणार नाही. आता विधानसभा निवडणुकांत भाग घेण्यात अर्थ नाही. त्यावर आम्ही बहिष्कार घालणार आहोत. कारण त्या निवडणुका म्हणजेही असाच मोठा फार्स ठरणार आहे.'

विरोधी पक्षांचा हा आरोप म्हणजे आपले अपयश लपविण्यासाठी पुढे केलेली सबब नव्हती. नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकांत खरोखरच खोटेपणाचे, बनवाबनवीचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडले होते. निवडणूक कमिशनकडे अनेक तक्रारी आल्या. त्यांपैकी काहींची चौकशी करण्यासाठी कमिशनने न्यायमूर्तींची नेमणूक केली. तीन प्रकरणांतील निकाल आतापर्यंत जाहीर झाले. या तिन्ही बाबतीत विरोधी पक्षांचे आरोप न्यायमूर्तींनी ग्राह्य धरले आणि भुट्टोंच्या पक्षांच्या उमेदवारांची निवडणूक रद्द केली. विरोधी पक्षांच्या आरोपांना या निकालांनी बळकटी आली. त्यांनी तेवढ्यावर न थांबता विधानसभा निवडणुकांवर बहिष्कार घातला आणि भुट्टोंचा राजीनामा व नव्या निवडणुकांच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले. दीड महिन्यात या आंदोलनाने तीव्र स्वरूप धारण केले. गोळीबाराला न भिता ठिकठिकाणी मिरवणुका निघाल्या, निदर्शने झाला. स्त्रियांनीही त्यात भाग घेतला. विरोधी नेत्यानी सार्वत्रिक संप व हरताळाचा आदेश दिला. आयूबची राजवट उलथली जाण्यापूर्वी आयूबविरोधी निदर्शनांनी देशात जसे वातावरण निर्माण झाले होते, तसे पुन्हा एकदा निर्माण झाले.

हा असंतोष विरोधी पक्षांपुरताच मर्यादित राहिला नाही. भुट्टोंच्या पक्षालाही त्याची झळ लागली. पक्षाच्या काही सभासदांनी राजीनामे देऊन निवडणुकांची मागणी

केली. स्पेन आणि ग्रीसमधील पाक वकिलांनी राजीनामे दिले. हे दोन्ही वकील माजी लष्करी प्रमुख होते. भुट्टोंना सत्तेवर आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली होती. त्यापैकी हवाईदलाचे माजी प्रमुख एअरमार्शल अब्दुल रहीमखान म्हणाले, भुट्टोंना आम्ही अधिकारावर आणले तेव्हा त्यांनी मला व लष्कराचे त्या वेळचे प्रमुख जनरल गुल हसन खान यांना आश्वासन दिले की, पाकिस्तानात यापुढे लोकशाही चिरस्थायी होईल. पण दोन महिन्यांतच या दोघांना भुट्टोंनी त्यांच्या लष्करी अधिकारपदावरून दूर केले आणि परदेशात वकील म्हणून पाठविले.

भुट्टोंशी झालेल्या आपल्या संघर्षाबद्दल बोलताना या अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्या वेळी काही शहरांत पोलिसांचा संप चालू होता. हा संप लष्कराने मोडून काढावा, अशी भुट्टोंची मागणी होती. जनरल हसन यांनी ते नाकारले. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एक निमलष्करी संघटना उभारण्याचा भुट्टोंनी घेतलेला निर्णय. ही संघटना लष्करापासून पूर्णपणे स्वतंत्र व केवळ भुट्टोंशी एकनिष्ठ, या उद्देशाने उभारली जावयाची होती. जरूर पडल्यास लष्कराविरुद्ध तिचा उपयोग करता यावा, अशी भुट्टोंची योजना होती. पाकिस्तानात विरोधकांची चळवळ दडपून टाकण्यासाठी या वीस हजार सैनिकांच्या दलाचाच मुख्यतः उपयोग करण्यात येत आहे. पुढे मागे लष्कराशी या दलाचा संघर्ष होऊन त्यातून यादवी युद्ध होणे शक्य आहे, असे या माजी सेनाधिकाऱ्यांना वाटते. एअर मार्शल रहीमखान म्हणाले की, 'परिस्थिती आणखी बिघडली तर, भुट्टोंना लष्करी कायदा पुकारून लष्कराची मदत घ्यावी लागेल. लष्करी कायद्याचा भरपूर अनुभव सेनाधिकाऱ्यांनी घेतलेला असून त्यांना त्याचा वीट आलेला आहे.' एअर मार्शल रहीमखान यांचे हे भाकित थोड्याच दिवसांत खरे ठरले. पाकिस्तानातील कराची, लाहोर आणि हैदराबाद या तीन शहरांत भुट्टोंनी लष्करी कायदा पुकारला व दंगल-प्रकार करताना कोणी दिसताच त्याला गोळ्या घालण्याचे हुकूम २१ एप्रिलला देण्यात आले. पण या दडपशाहीपुढे व दहशतीपुढे विरोधक नमले नाहीत. त्यांनी संप, हरताळांच्या मार्गांनी आंदोलन चालूच ठेवले. लष्करी कायदा जारी असताही दुसऱ्या दिवशी निदर्शने झाली. ती मोडण्यासाठी लष्कराने केलेल्या गोळीबारात वीसजण ठार झाले. लष्कर आपल्या बाजूस राहावे म्हणून सैनिकांच्या पगारात भुट्टोंनी नुकतीच वाढ केली. पण सैन्ये केवळ पोटावर जगत नाही. लोकशाही हक्कांबद्दल त्यांच्यातही जागृती होऊ लागली आहे. सेनाधिकाऱ्यांनी भुट्टोंना पदच्युत करून नव्या निवडणुका घ्याव्यात, असे आवाहन जनरल हसन यांनी अथेन्सहून केले. सैनिकांचा आता भुट्टोंवर विश्वास राहिलेला नाही. तेव्हा भुट्टोंना पदच्युत करण्यासाठी पाकमध्ये लष्करी क्रांती होण्याची शक्यता आहे.

लष्करी क्रांतीतून एखादा नवा लष्करी हुकूमशहा पाकमध्ये सर्व सत्ता आपल्या हाती एकवटण्याची शक्यता नाकारता येत नाही. लष्करी क्रांतीत हा धोका नेहमीच असतो. आम्ही लवकरच लोकप्रतिनिधींकडे कारभार सोपवू. फक्त शांतता, कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आम्ही सत्ता हाती घेतली आहे, असे सगळेच लष्करी हुकूमशहा सुरुवातीला सांगत असतात. पण हळूहळू ते आपली राजवट चिरस्थायी करण्याच्या मागे लागतात, असा बहुतेक लष्करी राजवटीचा अनुभव आहे. पण दोन लष्करी हुकूमशहांचा अनुभव पाकच्या जनतेने आतापर्यंत घेतला असल्याने लष्करी हुकूमशाहीला ती विरोध करील. पण पाकमधील लोकशाहीची वाट खडतर आहे, हेच सध्याच्या घटनांनी दाखवून दिले आहे. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**। मॅक्झिम गॉर्की ।**

**। सुमती देवस्थळे ।**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

# दारिद्र्याकडून समृद्धीकडे नेणारा कार्यक्रम

ना. रा. गुजर, कल्याण

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सतत तीस वर्षे स्थिर सरकार एका पक्षाच्या हाती होते व सव्वीस वर्षे अनेक पंचवार्षिक व वार्षिक योजनाबद्ध विकास केला गेला. ह्या योजनांपायी सुमारे ऐंशी हजार कोटी रुपये खर्च झाले. पण श्रीमंत अधिक श्रीमंत झाले, गरीब अधिक गरीब झाले व बेकारीचे प्रमाण वाढले ह्या बेकारीत अशिक्षितांप्रमाणे सुशिक्षितांचेही प्रमाण वाढतच राहिले. ह्याचे मुख्य कारण आपले नियोजन बरोबर नव्हते व आपली शिक्षणपद्धती चुकीची होती व आहे. हे सर्वांना पटत होते पण निश्चित काय करावे ह्याबाबत कोणीही स्पष्ट व निश्चित बोलेना. आपल्या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारात अद्याप गोंधळ आहे. जो तो उठतो तो उत्पादनवाढ झाली पाहिजे म्हणजे GNP (ग्रॉस नेट प्रॉडक्ट) वाढेल, व दरमाणशी उत्पन्नवाढ (Per Capita income growth) झाली की समृद्धी येईल व माणूस सुखी होईल अशा स्वप्नात आजपर्यंत दंग होते व अजूनही आहेत. त्यांचे म्हणणे खूप मोठे भांडवल उद्योगधंद्यात घातले की, उत्पादन वाढेल, रोजगार वाढेल, काम करणाऱ्या मजुरांची खरेदीशक्ती वाढेल व ते जास्त बचत करतील पुन: उत्पादन वाढेल व रोजगार वाढेल. शेतीची जमीन वाढत नसल्यामुळे शेती उत्पादन काही मर्यादेपलीकडे वाढणार नाही. तेव्हा जास्तीत जास्त भांडवल मोठ्या उद्योगधंद्यात घातले की झाले. शेती उत्पादनात भांडवल फार गुंतविणे फायदेशीर ठरणार नाही. ते अमेरिका, इंग्लंड, प.जर्मनी, रशिया या देशांत जसे नियोजन झाले तसेच आपल्याकडे चालू होते व अजूनही आहे. पाचव्या योजनेच्या सुरुवातीस 'अरेच्या! चुकलेच आपले. आपण उगीचच शेतीच्या ऐवजी या मोठ्या उद्योगधंद्यांवर फार भर दिला!' असा पश्चात्ताप नियोजनकार व पुढाऱ्यांवर करण्याची पाळी आली. परंतु प्रत्यक्षात 'गरिबी हटाओ' व 'दुर्बल घटक हा नियोजन केंद्रबिंदू असला पाहिजे,' अशा घोषणा देण्यापलीकडे विशेष भरीव काम झाले नाही. मग देखाव्याकरिता गरिबांना शेळ्या–मेंढ्या द्या, कुठे त्यांना झोपड्या बांधून द्या, घरांसाठी जागा द्या, सरकारी नोकरीत त्यांचे प्रमाण वाढवा, जरूर नसतील अशा ठिकाणी रस्त्याची व पाझर तलावांची कामे काढा व रोजगार हमी नावाच्या खोट्या क्रांतिकारक योजनेसाठी रक्कम मंजूर करा, अशा तऱ्हेचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. त्या कार्यक्रमात जीवही नव्हता व जोरही नव्हता. लोक बिचारे खेडेगावात पोट भरेनासे झाले की, बाडबिस्तारा घेऊन मुंबईसारख्या शहराकडे धावू लागले व अजूनही बिचारे गाव सोडून जात आहेत. 'हरित क्रांती यशस्वी झाली व कृषि–औद्योगिक समाज निर्माण करण्यात आपण यशस्वी झालो,' असे पुढारी म्हणत राहिले. पाहता पाहता बृहन्मुंबईची लोकसंख्या आज साठ लाखांवर गेली आहे व अर्थशास्त्रज्ञांच्या अंदाजाप्रमाणे ही संख्या इ. २००० साली १ कोटीपर्यंत नक्की जाईल.

मूळ दुखणे काय ते समजून त्यावर इलाज करण्याऐवजी मलमपट्टया बांधण्याचे काम चालू आहे.

जनता पक्षाने निवडणुकीच्या प्रांगणात ह्या दृष्टीने मूलभूत विचार केला आहे, व तो बरोबर आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ आर्थर लुईस यांनी मुंबईला भाषण केले. त्यांनी सांगितले, 'कुठल्याही देशाची प्रगती व्हावयाची असेल तर, उत्पादन वाढलेच पाहिजे पण ते वाढविताना तेथील परिस्थितीचा विचार केला पाहिजे. त्यांनी त्यासाठी चार सूत्रे सांगितली ती अशी—

१ : भारतासारख्या कमी विकसित देशात ज्या उद्योगात जास्त माणसे गुंतलेली आहेत, म्हणजे शेतीसारख्या उद्योगात जास्त भांडवल गुंतविले पाहिजे.

२ : जास्त भांडवल गुंतवणूक तंत्राऐवजी जास्त श्रमप्रधान तंत्र वापरले जावे.

३ : ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या बेकारांचा लोंढा थांबविला पाहिजे.

४ : ज्या भागात, ज्या उद्योगात व ज्या व्यक्तीचे उत्पन्न जास्त आहे त्यांच्यावर कर बसवून तो कराचा पैसा ग्रामीण भागात रस्ता, शाळा व दवाखाने ह्यांसारख्या सोयी करण्यात उपयोगी आणावा.

आजपर्यंत आपल्या सरकारने फक्त चौथ्या सूत्राचा मोठ्या प्रमाणात अंमल केला. बाकीची सूत्रे जी. म. गांधींनी पूर्वी सुचविली होती तिकडे पूर्ण दुर्लक्ष केले. जनता पक्षाने आपला आर्थिक विकासाचा कार्यक्रम गांधीवादी पद्धतीने होणार हे जाहीर केले. प्रत्यक्षात काय केले असता दारिद्र्य नाहीसे होईल, आर्थिक विषमता कमी होईल व रोजगार वाढेल ह्या दृष्टीने खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

### शेतीउत्पादन

१ : शेती उत्पादन वाढले पाहिजे. अर्थशास्त्रज्ञ काहीही म्हणोत, पण शेती हा असा धंदा आहे की, तो जसा व जितका वाढेल तितका त्यात जास्त लोकांना रोजगार मिळेल. शेतीमुळे त्यांच्या जीवनाच्या अत्यावश्यक गरजा सहज भागतील. ती वाढण्यासाठी दोन गोष्टींची जरूर आहे. एक म्हणजे तो धंदा वाढविण्यासाठी अवश्य ती साधने त्यांना मिळाली पाहिजेत. आतापर्यंत निरनिराळ्या समाजविकास व शेतीविकास योजना राबविल्या गेल्या, पण त्या योजनेचा बराचसा फायदा जास्त जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांनी घेतला. अल्पभूधारक अत्यल्पभूधारक व शेतमजूर यांची संख्या एकूण शेतकऱ्यांच्या ७० टक्के आहे. त्यांच्याजवळ जमीन व घर याखेरीज फारसे स्थिर भांडवल उरले नाही. ना चांगली जनावरे, ना अवजारे. त्यांना भांडवल मिळाले पाहिजे. नवी विहीर खणणे, इंजिन पंप घेणे वगैरे कामासाठी राष्ट्रीय बँकाही ह्या अत्यल्पभूधारकांना कर्ज देण्यास नाखूष असतात. मोठमोठ्या कारखान्यांना कर्जासाठी सरकार गॅरंटी देते. तशी गॅरंटी सरकारने दिल्यास त्यांना बँका कर्जे देतील. नाहीतर बँकाकडे हेलपाटे घालण्यातच हे छोटे शेतकरी थकून जातात व आपला कोणी त्राता नाही म्हणून कपाळाला हात लावून बसतात.

ह्या छोट्या शेतकऱ्यांना पन्नास टक्के आर्थिक मदत किंवा कर्जासाठी निदान गॅरंटी सरकारने द्यावी. त्याचबरोबर ह्या कर्जाचा उपयोग योग्य होतो की नाही, हेही बँकेने व सरकारी अधिकाऱ्याने बारकाईने पाहावे.

## २ : शेती आनुषंगिक उद्योग

ज्यांना शेती कमी आहे व ज्या शेतीला पाण्याची सोय नाही, तेथील शेतकरी वर्षातून काही महिने बेकार असतो. त्याला इतर उद्योग देणे जरूर आहे. खालील उद्योग सुरू करणे किंवा वाढविणे शक्य आहे.

१ : वैयक्तिक शेतकऱ्याचे शेतांना बांध घालणे.

२ : नवीन जमीन पाडणे व दुरुस्त करणे (Soil Conservation a Terracing).

३ : गवतवाढ, फळबाग वाढ, किंवा वृक्षसंवर्धन करणे हे कार्यक्रम ज्या ठिकाणी शेतीचे दुसरे उत्पन्न घेणे शक्य नाही अशा एका गटात जमिनीचे मोठे क्षेत्र निवडून अनेकांनी मिळून करावे. काही कुटुंबांना या क्षेत्राची देखभाल करण्याचे व संरक्षण करण्याचे कायम स्वरूपाचे काम द्यावे. त्या ठिकाणी ॲग्रिकल्चरल इस्टेटसारखी योजना तयार करावी. ज्या गावी जागा असेल त्याप्रमाणे क्षेत्र निवडावे.

४ : जिथे पाझर तलाव बांधणे शक्य नसेल त्या गावात अनेक ठिकाणी शेतजमिनीजवळ दहा ते वीस एकर जमिनीला लागणारे पावसाचे पाणी साठविता येईल, अशी तळी बांधावी. त्यामुळे पावसाळ्यात पाऊस मध्येच गेला तर, पाणी देता येईल व हिवाळ्यातही थोडेबहुत पीक घेता येईल. जिथे सामुदायिक विहिरी खोदता येतील तिथे त्या विहिरी खोदाव्यात.

५ : लोकांना डेअरी व पोल्ट्रीचे शिक्षण द्यावे व धंद्यासाठी संकरीत गाई व कोंबड्या द्याव्या.

## ३ : श्रमप्रधान–तंत्र असलेले उद्योग

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भांडवल–तंत्राऐवजी श्रमप्रधान–तंत्र असलेले उद्योग सुरू करावे.

आपल्या घटनेत प्रत्येक नागरिकाला काम मिळावे असे सूचक तत्त्व (Directive) आहे. भांडवलप्रधान–तंत्राचा उपयोग करून मोठे उद्योग कितीही वाढले तरी, जास्त लोकांना त्या पद्धतीने रोजगार मिळणे शक्य नाही. म्हणून उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण हा मार्ग म. गांधींनी सुचविला होता. त्यांच्या सिद्धांताप्रमाणे सत्तेचे व उद्योगाचे केंद्रीकरण हे लोकशाहीशी विसंगत आहे. उद्योगधंद्यात जुनेच तंत्र वापरायला पाहिजे असे नाही. सुधारित तंत्र वापरायचे ते अमेरिका, इंग्लंड, प. जर्मनी व रशिया या पद्धतीचे न वापरता छोट्या व घरगुती सुधारित तंत्राचे उद्योग केल्याने जास्त लोकांना उद्योग मिळतो व ग्रामीण भागात समृद्धी वाढते. लोखंड, पोलादसारख्या वस्तूचे उत्पादन छोट्या उद्योगधंद्यांच्या पद्धतीत होणे शक्य नसते, तिथे मोठे उद्योगधंदे काढण्यास हरकत नाही. पण जीवनाच्या आवश्यक गोष्टी–उदा–कापड, तेल, साबण, गूळ, फर्निचर, पादत्राणे, तयार कपडे वगैरे वस्तू, हस्तव्यवसाय व छोट्या उद्योगाच्या साहाय्याने बनविणे सहज शक्य आहे. तिथे हे मोठे यांत्रिकीकरण कशासाठी ? अशा तऱ्हेच्या उद्योगात मध्यम तंत्राचा उपयोग करण्याने तेवढीच वस्तू बनविण्याच्या क्रियेत अनेक पटीने लोकांचा रोजगार वाढतो व भांडवल कमी लागते. सूत–गिरणीच्या मोठ्या उद्योगात एका माणसाला रोजगार देण्यासाठी १ लाख दहा हजार रुपये भांडवल गुंतवणूक करावी लागते. विकेंद्रित अर्थव्यवस्थेत म्हणजे सहा चाती असलेल्या सूत–यंत्राने उत्पादन करणाऱ्या मजुराला काम देण्यासाठी फक्त सुमारे दोन हजार रुपये भांडवलासाठी खर्च येतो. साखर कारखान्यात एक माणसाला काम देण्यासाठी ४० हजार रुपये भांडवल खर्च येतो तर खांडसरी साखर उद्योगासाठी माणसी दोन हजार रुपये भांडवल लागते. उसाचा गूळ बनवायला तर माणशी फक्त १५०० रुपये भांडवल लागते. हीच गोष्ट गोडेतेल, पादत्राणे, साबण, वगैरे गरजांच्या वस्तूंची आहे. अशा तऱ्हेने आपल्या उद्योगधंद्यात विकेंद्रीकरण केले तर, कमी भांडवलात जास्त लोकांना ग्रामीण भागात रोजगार मिळेल. खेड्यातून शहरात येणाऱ्यांचा लोंढा हळूहळू थांबेल. ज्या उद्योगात (उदा. कापडधंद्यात) एकाच तऱ्हेच्या वस्तू हस्तव्यवसाय, मध्यम उद्योग व मोठे उद्योग करतात, तिथे समान उद्योग किंवा अशा तऱ्हेचा उत्पादन कार्यक्रम (Common Production Programme) निश्चित करावा लागेल. नाही तर चढाओढीत छोटे उद्योग पुन्हा नाहीसे होतील.

ह्या पद्धतीला लोकांचा फार पाठिंबा लागेल. कारण अशा पद्धतीने बनलेल्या वस्तू दिसायला तितक्या सुबक व आकर्षक असणार नाहीत व थोड्या महागही असतील. पण लोकांनी गरीब व बेकार लोकांना उद्योग मिळतो व शहरातील गर्दी त्यामुळे कमी होते हा विचार करून ह्या वस्तू खरेदी करून उत्पादकांना प्रोत्साहन दिले पाहिजे, किंवा सरकारने सवलत दिली पाहिजे.

कुठल्याही परिस्थितीत सरकारने ह्या वस्तू बनविणारे नवे कारखाने किंवा गिरण्या काढण्यास बंदी करावी व जे आहेत त्यांचा विस्तार होऊ देऊ नये. त्याऐवजी नवीन तंत्राचा उपयोग करून छोटे उद्योग काढण्यास चालना द्यावी व त्यांना सर्व मदत करावी.

## ४ : चैनीच्या वस्तूंचे उत्पादन यापुढे वाढू देऊ नये

उच्चभ्रू व श्रीमंत लोक खालील वस्तू मोठ्या प्रमाणात वापरीत असतात. ज्या देशात जीवनावश्यक वस्तू लोकांना मिळत नाहीत, त्या देशात अशा वस्तूंचे उत्पादन होणे म्हणजे मूल्यवान भांडवलाचा गैरउपयोग करणे आहे. त्याचा विस्तार बंद करावा.

१ : छोट्या मोटारी. २ : रेफ्रिजरेटर. ३ : टी. व्ही. ४ : वातानुकूलित यंत्रणा. ५ : मद्य (दारू). ६ : धुण्याची, पाणी गरम करण्याची, पाणी थंड करण्याची, टेपरेकॉर्डर वगैरे यंत्रसामग्री.

ह्यातील ज्या वस्तूंना परदेशी मागणी आहे तेवढ्या वस्तू प्रथम बनवाव्या. बाकीच्या वस्तू त्यावर मोठे कर लादून श्रीमंतांना विकत घेण्यास परवानगी द्यावी. हे धंदे आणखी काही दिवस तरी वाढू देऊ नयेत.

## ५ : ज्या वस्तू किंवा यंत्रसामग्री हिंदुस्थानात बनू शकते त्यांची आयात कमी करावी किंवा बंद करावी

अशा तऱ्हेच्या खालील वस्तू भारतात आयात केल्या जातात व त्यासाठी भारताला डॉलर मोजावे लागतात. त्या वस्तू अशा –

१. धान्य व त्याचे पदार्थ, २. भारी कापड. ३. लांब धाग्याचा कापूस, ४. हिरे व माणके, ५. वनस्पतिज व प्राणिज तेले किंवा चरबी, काही प्रकारची मशिनरी व यंत्रे, उदा–बुलडोझर वगैरे.

ह्या वस्तूंशिवाय भारताचे सहज चालू शकेल. स्थानिक कच्च्या मालाचा व साधनांचा उपयोग करून या वस्तू आपल्याला बनविता

येतील. परदेशी चलन घेऊन, परदेशी चलनाचा वापर करून ह्या वस्तू मागविणे शक्य तो टाळावे.

### ६ : नव्या तंत्रज्ञानाला पोषक ठरणारे संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना व पंडितांना उत्तेजन देणे

भारतात आतापर्यंत जे बरेचसे संशोधन झाले ते परदेशीय तंत्रज्ञानाची नक्कल होती. तिकडचे उद्योग–तंत्रज्ञ भांडवलप्रधान होते. श्रम करणाऱ्या माणसांची संख्या कमी करत यंत्राने उत्पादन कसे जास्त करावे त्यावर तिकडील तंत्रज्ञानाचा कटाक्ष होता. भारतातील लोकांचे राहणीमान, शिक्षण, येथील मनुष्यबळ, साधी राहणी, ग्रामीण जीवन वगैरे परिस्थितीला साजेसे परंतु उत्पादन वाढवू शकणारी छोटी किंवा मध्यम तंत्राची यंत्रे शोधून काढणे अवश्य आहे. मग ती शेतीसाठी असोत किंवा दुसऱ्या छोट्या उद्योगासाठी असोत. ती छोटी यंत्रे मनुष्यबळावर किंवा विजेवर चालणारी असावीत. त्यामुळे माणसाला श्रम कमी पडावे; व त्याचे उत्पादन वाढावे.

तसेच पावसाचे पाणी नदीत किंवा समुद्रात वाहून न जाता कसे साठविता येईल, विजेखेरीज सूर्यशक्ती, पवनशक्ती, गोबर गॅस प्लँट, जलशक्ती अशासारख्या शक्तींचा उपयोग करून स्वस्त उत्पादन किंवा उपयोगी साधने बनविण्याच्या शोधालाही चालना मिळावी.

### ७ : उत्पन्न व मजुरी याबाबत सुसंगत व न्याय्य धोरण ठरविणे

समाजवादी रचनेचा हा पाया आहे. समृद्धी वाढली तरी संपत्तीचे वाटप समान होणे शक्य नसले तरी ते न्याय्य व योग्य व्हायला पाहिजे. नुसते श्रीमंतावर कर लादा व तो पैसा गरिबांच्या योजनेकरिता खर्च करायचा एवढेच धोरण नसावे. श्रीमंत व गरीब यांच्यातील दिसणारी दरी कमी झाली पाहिजे. जनता पक्षाने कर वजा जाता उरलेल्या उत्पन्नाचे प्रमाण गरीब व श्रीमंत यांच्यामध्ये जास्तीत जास्त १ : २० असावे असे त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात ठरविले आहे. त्या पद्धतीने काही लोकांच्या मजुरीचे दर किंवा पगार वाढवावे लागतील व काही लोकांचे कमी करावे लागतील. खेड्यात दिवसभर काम करणाऱ्या मजुराला जर फक्त ३ रु. मजुरी असेल तर भारतात कुणाही माणसाला त्याच्या उत्पन्नातून कर वजा जाता दरमहा १८०० रु. पेक्षा पगार किंवा उत्पन्न मिळता उपयोगी नाही. आज भारतात साठ टक्के लोकांचे माणसी सरासरी उत्पन्न दरमहा ३० रु. हून कमी आहे. याबाबत योग्य तो निर्णय व कारवाई करणे जरूर आहे.

तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे योग्य भाव मिळाले पाहिजेत. निरनिराळ्या शेतमालाच्या भावातही वरील तफावत आहे. ज्वारी, बाजरी, गहू, शेंगदाणे वगैरे माणसाच्या जास्त गरजांची पिके घेण्यापेक्षा ऊस पिकविणे शेतकऱ्याला जास्त फायदेशीर झाले आहे. कारण उसाचे भाव बांधलेले आहेत व ते भाव इतर पिकांपेक्षा जास्त आहेत. म्हणून सगळीकडे ऊस लागवडीची व त्या अनुषंगाने साखर कारखान्यांची मागणी वाढत आहे. त्यामुळे शेतीसाठी सरकारने उपलब्ध केलेल्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग उसासाठी केला जात आहे. ह्यासाठी उसाखेरीज इतर पिकांचे भाव वाढविले पाहिजेत. आहारदृष्ट्या ज्वारी, बाजरी, गहू, भुईमूग यापेक्षा साखर हा निकृष्ट पदार्थ आहे. भारतासारख्या गरीब देशाचे मौल्यवान भांडवल मोठ्या प्रमाणात ऊस–उत्पादनासाठी व साखर कारखान्यासाठी गुंतविणे हा राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय आहे. इतर शेतपिकांना योग्य भाव मिळाले तर शेतकऱ्यांचे साखर कारखान्याचे वेड कमी होईल. असे बचत झालेले भांडवल भुईमूग, सोयबिन, लांब धाग्याचा कापूस, कडधान्ये वगैरे शेतपिकांसाठी किंवा इतर शेतीच्या आनुषंगिक उद्योगासाठी वापरता येईल.

### ८ : शिक्षणात क्रांतिकारक बदल

स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताच्या पंतप्रधानापासून सर्व मंत्री, पुढारी व शिक्षणतज्ज्ञ शिक्षणात अमूलाग्र बदल करण्याची भाषा बोलत आले आहेत. काही किरकोळ म्हणजे ११ + ४ वर्ग की १० + २ + ३ वर्ग अशा तऱ्हेचे बदल झाले व शिक्षणासाठी ऐच्छिक विषय म्हणून कार्यानुभवाचे काही उद्योग अभ्यासक्रमात अवतरले. पण प्रत्यक्षात सामान्य माणसाच्या जीवनापासून ते शिक्षण दूरच राहिले. भारतात शिक्षित माणसाचे व अशिक्षित (विशेषतः ग्रामीण) माणसाचे अशी दोन जगे वेगळी निर्माण झालेली दिसतात. ह्याचे कारण मुलगा शिकला की शेतकऱ्याच्या किंवा कारागिरीच्या दृष्टीने तो निरुपयोगी होतो. म्हणजे त्याच्या घरच्या पालकांना त्याचा काही उपयोग होत नाही. तो स्वच्छ कपडे घालून पुस्तकी काम व थोडेसे लॅबोरेटरीत काम करण्यापलिकडे काही शारीरिक श्रमाचे काम करणे कमीपणाचे मानतो. आजच्या शिक्षणाचा जीवनाशी संबंध येण्यासाठी ग्रामीण भागातील शिक्षण हे शेती–पायाभूत असे हवे. ह्या देशात ऐंशी टक्के लोक खेड्यात राहतात तर शिक्षण हे खेड्याच्या जीवनाशी सुसंगत असेच पाहिजे. अर्थशास्त्रज्ञ काहीही म्हणोत, शेती हा असा धंदा आहे की, त्यात रोजगार वाढविण्यास भरपूर क्षमता आहे. आजचे शिक्षण इंग्लंड, अमेरिका व रशिया येथील शिक्षणपद्धतीची नक्कल आहे. तांत्रिक (टेक्निकल) शिक्षणाच्या नावाखाली इंग्रजी, गणित व सायन्स हे विषय सक्ती करण्यात आले आहेत. परंतु त्यांचा उपयोग विशेष काही होणार नाही. हे शिक्षण घेऊन एस्. एस्. सी. पास झालेल्या मुलांना किंवा मुलींना नोकरी किंवा उद्योग मिळण्याची शाश्वती नाही. म्हणजे शिक्षण घेऊन त्यांतील बरेचसे लोक बेकार राहणार व नोकरीसाठी फिरत राहणार. त्याऐवजी ते शेतीचे तंत्र पहिल्या इयत्तेपासून शिकत राहिले तर काही वर्षांनंतर स्वतःच्या पायावर ती मुले उभी राहू शकतील. इंजिनीअरिंग (मग ते इलेक्ट्रिकल असो की मेकॅनिकल असो) व मेडिकल विषयाप्रमाणे शेती हा तांत्रिक विषय म्हणून शिकविण्यात आला, तसेच पद्धतशीर व शास्त्रोक्त पद्धतीने शेती केली तर भरपूर उत्पन्न मिळविता येते, हे विद्यार्थ्यांना पटले तर शेती या विषयाकडे ते वळतील. या दृष्टीने शेती हा मूळ विषय धरून शिक्षणाची पुनर्रचना करणे जरूर आहे. अशा तऱ्हेने शिक्षणात खरी क्रांती होईल.

थोडक्यात, सबंध नियोजनाची उभारणी पारंपरिक अर्थशास्त्रज्ञांच्या सिद्धान्ताप्रमाणे खूप भांडवल घालायचे, मोठे कारखाने काढायचे, याऐवजी जास्त भांडवल शेतीस व घरगुती उद्योगात व छोट्या धंद्यात घालून उत्पादन वाढवायचे. Mass Production ऐवजी Production by the masses अशा पद्धतीने उत्पादनतंत्र बदलायचे ते अनेक क्षेत्रांत बदलायचे. शेतीचे योग्य भाव ठरवायचे. उत्पन्न व मजुरी याचे प्रमाण ठरवायचे व शिक्षणात वर लिहिल्याप्रमाणे आनुषंगिक उद्योग व हस्तव्यवसाय यांना उपक्रम द्यायचा. अशा पद्धतीने ग्रामीण जीवनात क्रांतिकारक बदल होईल. बहुजन समाजाची अशा कार्यक्रमामुळे दारिद्र्याकडून समृद्धीकडे घोडदौड सुरू होईल. त्यामुळे भारताचे संपूर्ण चित्र बदलेल. ह्या नियोजनाला बहुजन समाजाचा मोठा पाठिंबा लागेल व त्यांना त्यात सहभागी व्हावे लागेल. दारिद्र्य व बेकारी निवारण लढाईत नुसते सेनापती व सैन्याधिकारी दारिद्र्य-बेकारीच्या लढाईत आघाडीवर राहून चालणार नाही. त्यांच्या मागून सैन्याने तशीच जोरदार चाल केली पाहिजे, तर हे होईल. ☐

१ मे १९७७ या दिवशी महाड येथे क्रांतिस्तंभाचे उद्‌घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते होत आहे. त्यानिमित्त या कल्पनेचे जनक श्री. घनश्याम तळवटकर यांची मुलाखत

# महाडचा क्रांतिस्तंभ

प्रा. झुंबरलाल कांबळे

श्री. घनश्याम तळवटकर यांचे व्यक्तिमत्त्व बहुगुणसंपन्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा वारसा ते समर्थपणे चालवीत असतात. बाबासाहेबांच्या जीवनाबद्दल, चळवळींबद्दल त्यांचे सारखे चिंतन चाललेले असते. महाडला होणाऱ्या क्रांतिस्तंभाची कल्पना ही त्या चिंतनाचे फलित होय. बौद्ध कार्यकर्त्यांपुढे ते अशा क्रांतिकारक कल्पना मांडतात आणि बौद्ध समाज त्या उचलून धरतो.

२६ डिसेंबर १९२७ साली मनुस्मृतीचे दहन महाडला ज्या जागेवर करण्यात आले ती एक एकर साडेआठ गुंठे जागा क्रांतिस्तंभासाठी विकत घेतली आहे. स्मारकाचे काम वेगात सुरू आहे. या स्मारकाची संपूर्ण कल्पना यावी म्हणून काही दिवसांपूर्वी श्री. तळवटकर यांची एक छोटीशी मुलाखत मी घेतली. ती पुढे दिली आहे.

**क्रांतिस्तंभाची नावीन्यपूर्ण कल्पना आपणाला कशी काय सुचली ?**

डॉ. बाबासाहेबांच्या कार्याबद्दलचे विचार सारखे माझ्या मनात तरळत असतात. त्यांनी महाडला जी क्रांती केली तिला साजेसे स्मारक इथे असावे असे मला वाटत होते. जगात जिथे जिथे क्रांत्या झाल्या तिथे तिथे त्यांची प्रतीकात्मक स्मारके उभारली आहेत. अमेरिकेत जी क्रांती झाली तिच्यातून 'लिबर्टी-स्टॅच्यू' या स्मारकाचा जन्म झाला. रशियन राज्यक्रांती झाली, फ्रेंच राज्यक्रांती झाली, तिथेही त्यांची स्मारके उभारलेली आहेत.

डॉ. बाबासाहेबांनी महाडला जी चळवळ सुरू केली किंवा नंतरच्या काळात ज्या चळवळी केल्या त्यांचेही स्वरूप असेच होते. दडपलेला माणूस स्वतंत्र करावा. गुलामगिरीतून त्याला मुक्त करावे. माणूस म्हणून जगण्याची संधी त्याला प्राप्त करून द्यावी, तशी जाणीव त्यांच्यात निर्माण करावी यासाठी बाबासाहेबांची चळवळ होती. It was a movement of liberation. अस्पृश्यांच्या बंधमुक्ततेची ती चळवळ होती. इथेच त्यांच्या नवजीवनाची सुरुवात झाली. हा मुक्तिसंग्राम होता. या संग्रामाला साजेसे स्मारक असावे या जाणीवेतून क्रांतिस्तंभाच्या कल्पनेचा जन्म झाला. सम्राट अशोकाने बुद्धाची स्मारके भारतात ठिकठिकाणी उभारली. बुद्धाच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना जिथे घडल्या तिथे स्तंभ उभारले. तसाच हा क्रांतिस्तंभ.

**किती दिवसांपासून ही कल्पना आपल्या मनात रेंगाळत होती ?**

१९ व २० मार्च १९२७ ला महाडची पहिली परिषद झाली. त्यानंतर १९ मार्च हा क्रांति दिन म्हणून साजरा करण्याची प्रथाच पडली. १९ मार्च १९७५ रोजी ४८ वा क्रांतिदिन साजरा करण्यासाठी मी महाडला आलो होतो. त्यावेळी क्रांतिस्तंभाची कल्पना कार्यकर्त्यांपुढे मांडली. ती त्यांना नावीन्यपूर्ण वाटली. मुळात ही कल्पना आजच्यासारखी भव्य नव्हती. जिथे बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले ती १०'×१०' ची जागा विकत घ्यावी आणि काहीसे स्मारक उभारावे असा विचार होता, १९ मार्च १९७५ या क्रांतिदिनी तो क्रांतिस्तंभाच्या स्वरूपात असावा असा विचार पक्का झाला. ती संपूर्ण जागा विकत घ्यावी, तिथे भव्य स्मारक उभारावे, असे ठरले व दुसऱ्याच दिवशी म्हणजे २० मार्चला जागेचे खरेदीखत केले.

**क्रांतिस्तंभाचे स्वरूप कसे असेल ?**

सम्राट अशोकने सारनाथ लुंबिनी इथे जे स्तंभ उभारले ते पाहण्यासाठी देशोदेशींचे लोक येतात, तसाच हा क्रांतिस्तंभही असावा, अशी योजना आहे. ३०×४० फुटांचा चौथरा असेल. त्याची उंची ७ फूट असेल व वर चढण्यास पायऱ्या असतील. चौथऱ्यावर ३½×३ फूट आकाराचा बाबासाहेबांचा अर्धपुतळा असेल. त्याखाली चौथऱ्यावर ७ फूट उंचीचे पेडेस्टल असेल. पुतळ्याच्या मागे क्रांतिस्तंभ उभा असेल. त्याची चौथऱ्यापासूनची उंची ४० फुटांची असेल. स्तंभाचा खालचा भाग ५ चौरस फुटांचा असेल. टोकाला अडीच ते तीन चौरस फुटांची ज्वाला असेल. चौकोनी आकाराच्या स्तंभास शिरोभागी ज्वालेजवळ विशिष्ट आकार दिलेला असेल. ह्या आकाराचे शिल्प कार्ले येथील लेण्यात असलेल्या स्तंभाच्या शिल्पाबरहुकूम डिझाईन केलेले असेल. वर ज्वाला दगडात कोरली जाईल. संपूर्ण स्तंभ राजस्थानी (Yellow Bassalt) दगडात बांधला जाईल. ज्वालेसाठी Red stone वापरला जाईल.

**सर्व काम दगडीच होणार ?**

होय. सर्व काम दगडातच होईल. चौथरा फरशी असेल. वर शहाबादी ओबडधोबड फरशी असेल. कारण बाबासाहेबांचा जीवनमार्ग असाच ओबडधोबड व संघर्षमय होता. चौथऱ्यांचा उपयोग सभेसाठीही करता यावा, अशी योजना आहे.

**स्तंभावर बाबासाहेबांची काही वचने कोरणार ?**

बाबासाहेबांच्या जीवनातील काही प्रसंग-

चित्रे धातुकामात कोरलेली स्तंभाच्या तीन बाजूंना जोडण्याचा विचार आहे. बाबासाहेब मनुस्मृतीचे दहन करीत आहेत, भारतीय घटना लिहून राष्ट्राध्यक्षांच्या स्वाधीन करीत आहेत,बौद्ध धर्माची दीक्षा स्वतः घेऊन आपल्या अनुयायांना देत आहेत, ते तीन महत्त्वाचे प्रसंग असतील. मनस्मृती दहनापासून मानवतावादापर्यंतची ही तीन प्रसंगचित्रे असतील. चौथ्या बाजूला स्तंभ उभारल्याची माहिती असेल.

**पुतळा कसा असेल ?**

पुतळा तयार झाला आहे. शिल्पकार वाघ यांनी तो तयार केला आहे. डिझाइन करताना बाबासाहेबांचा चेहरा तरुण वयातला घेतला आहे. चेहऱ्यावर दृढनिश्चय आहे. आत्मविश्वास आहे.

**पुतळ्याचे तोंड कोणीकडे असेल ?**

तोंड पश्चिमेकडे असेल. तिथून पश्चिमेकडे जवळच असलेली पाल्याची बौद्धलेणी आहेत. स्तंभाच्या चौथऱ्यावरून ही लेणी सहज दिसतील, तर लेण्यातून हा स्तंभ सहज दिसेल. मुंबई–गोवा हा राजमार्ग याच पाल्याच्या लेण्याजवळून वळसा घालून महाडला येतो. त्या मार्गावर गाडी येताच प्रवाशांना स्तंभ दिसेल.

**याशिवाय तिथे आणखी काय होणार आहे ?**

एक विहार आणि त्याला जोडून सभागृह बांधण्याचा विचार आहे.

**त्यासाठी एकूण खर्च किती येईल ?**

पुतळा, स्तंभ व सुवर्णमहोत्सव ही योजना दोन लाख रुपयांची आहे.

**हा पैसा आपण कसा उभारणार ?**

हा सर्व पैसा लोकांकडून मिळणाऱ्या देणग्यातून व वर्गणीतूनच जमा केला जाईल. सध्या काम सुरू आहे. खेडयापाडयांत व शहरांतील झोपडपट्ट्यांत राहणारे लोक सुद्धा आपण होऊन देणग्या देत आहेत. लोकांनी आपल्या श्रमातून दिलेल्या देणग्यातूनच स्तंभ उभारला जाईल. जे देणगीदार १०१ किंवा त्याहून अधिक देणगी देतील त्यांना स्वागत-समितीचे सदस्य केले जाईल. अशांची नावे स्मरणिकेत प्रकाशित केली जातील.

**क्रांतिस्तंभाला विजयस्तंभ म्हणता येईल का ?**

हा विजयस्तंभच आहे. डॉ. बाबासाहेब ज्या तत्त्वांसाठी झगडले त्यांचा विजय झालेला आहे. त्यांच्या चळवळीमुळेच सर्वांना समान मानवी हक्क मिळाले. अस्पृश्यांना माणूस म्हणून जगता येऊ लागले. सर्वांना सामाजिक, राजकीय स्वातंत्र्य मिळाले. म्हणून याला विजयस्तंभही म्हणता येईल. पण इथे त्यांनी दलितांच्या मुक्ततेसाठी क्रांतिकारक सुरुवात केली म्हणून हा क्रांतिस्तंभ.

विजयस्तंभ उभारावयाचा असलाच तर, तो कुठे उभारावा लागेल ? असा श्री. तळवटकर यांनी आम्हाला प्रश्न विचारला. या मुलाखतीच्या वेळी प्रा. बिवलकर, प्रा. तारताळकर हेही उपस्थित होते. थोडावेळ शांततेत गेला. नंतर मी विचारले, कुठे उभारावा लागेल विजयस्तंभ ?

'दिल्लीला !' तळवटकरसाहेब तात्काळ म्हणाले. कारण तिथेच त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तत्त्वांवर आधारलेली घटना लिहिली. आणि सर्वांना समान हक्क, समान संधी, सामाजिक व आर्थिक न्याय तिच्या द्वारे मिळवून दिला.

**या क्रांतिस्तंभामुळे नेमके काय साध्य होईल ?**

हा भावी पिढ्यांना स्फूर्ती देईल, डॉ. बाबासाहेबांनी दलितांना नवजीवनाचा जो संदेश दिला त्याची आठवण करून देईल. त्यांना समाजसेवेची, देशसेवेची प्रेरणा देईल. हा स्तंभ समतेचे प्रतीक असेल. स्वातंत्र्याचे प्रतीक असेल. माणसाला माणसासारखे जगू द्या, या संदेशाचे प्रतीक असेल. □

---


ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

## श्री ग्रा मा य न

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य : पंधरा रुपये


---

कथा

# जिद्द

सौ. मंदाकिनी चिपळूणकर

दोन्ही टाचांखाली साडी दडपीत,आरशासमोर स्वतःची छबी शंभराव्यांदा न्याहळीत असलेली शुभा मला ठसक्यात म्हणाली, 'आई, या महिन्याला तरी मला ४।५ साड्या घेतल्याच पाहिजेत, बरं का? 'जगदीश' मध्ये काय टॉप साड्या आल्या आहेत बघ!' 'पण या तुझ्या साड्या मला तर छान दिसताहेत आणि हव्याच असल्या तर घे तुझ्या पैशानं.' मी उत्तरले. 'हं, आख्ख्या वर्षात एकही साडी घेतली नाही. अग, किती फॅशन्स बदलल्या आहेत, कल्पना नाही तुला आई? आणि आई, माझे ग कुठले पैसे?. अं!' 'अग शुभा, तुला कसं कळत नाही पोरी! परिस्थिती काय आपली? परवाच मोनेबाई विचारत होत्या मला, त्यांच्या आजारी मुलापाशी बसायला कुणी मिळेल का म्हणून. त्यांचा टाईपरायटर पण तुला वापरायला मिळेल, त्यांचं काम, तुझं काम! कसं?' 'हूं!' तुच्छतेनं मान उडवत धाडकन दरवाजा ओढून शुभी गेली. पण त्याचवेळी हे जिना उतरून खाली येत होते. 'मी जरा बाहेर जातो आहे. काही आणायचं आहे दुकानातून?' मी नुसती नकारार्थी मान हलवली. पंधरा–वीस वर्षं संसार करून आम्ही दोन अनोळखी माणसांसारखं वागत होतो. हे बाहेर गेले आणि मी सुस्कारा सोडीत कामाला लागले. सध्या गडीमाणसांना पूर्ण रजा दिली होती ना...

दोनच महिने झाले त्या गोष्टीला, तरी किती काळ गेल्यासारखं वाटतो आहे! ती धूसर संध्याकाळ, उदास उदास वाटणारी, चांगली स्मरणात आहे माझ्या. ऑफिसातून हे अगदी संथ चालीने आले. आल्या आल्या खुर्चीत अंग टाकीत म्हणाले, 'संपलं सगळं, मृणाल!' मी घाबरून म्हटलं, 'संपलं, म्हणजे काय म्हणताय तुम्ही?' 'हेच की, आजपासून माझी नोकरी संपली. आमची कंपनी दुसऱ्या मोठ्या कंपनीनं खरेदी केली आणि ते लोक त्यांच्याच कंपनीतल्या सीनिअर माणसांना नेमणार आहेत. हं, कठीण अवस्था आहे.' म्हणजे वयाची चाळिशी उलटल्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. मध्यम वयाच्या दोन कच्च्याबच्च्यांच्या बापाची अचानक चाकरी गेल्याचं दुःख काय असतं, हे तो बापच जाणे! कंपनीतून फंड इ. मिळणार होतं, पण नियमित उत्पन्नाचा ओघ खंडित होणार होता. चार मोठी खाणारी तोंडं, शुभदाचं कॉलेज, सुदर्शनची महागडी शाळा, खर्चाची उधळण होती अगदी. साठवणीचं पाणी न् साठवणीचा पैसा असा किती दिवस पुरणार? हजार विचारांनी मनात भुंगा सुरू केला. ह्यांचा ओशाळवाणा, केविलवाणा चेहरा मला पाहवेना. मी पटकन म्हटलं, 'अहो, घाबरता काय? तुमच्यासारख्या अनुभवी माणसाला काय आत्ता नोकरी मिळेल!' वरवर मी यांना धीर देत होते खरी, पण अंतर्यामी मीच खचले होते. आजपर्यंत यांनी मिळवायचं आणि आम्ही मजेत राहायचं, असा परिपाठ पडला होता. क्षुल्लक गोष्टीतसुद्धा मी यांच्यावर अवलंबून राहायची. पहिल्यापासून मला नोकरीची नावड, त्यामुळे मी माझ्या गृहिणी-जीवनात अगदी सुखी, समाधानी होते. छोटंसं घरकुल, कमवता नवरा, गोजिरवाणी दोन मुलं. तारुण्याच्या उन्मादाचा खळखळाट अद्याप मागे पडला नव्हता. पैसा येत होता तसाच जात होता आणि अशा वेळी शुभ्र आकाशातून वीज कोसळली. परिस्थितीची मुलांना कल्पना द्यावी म्हणून सांगितलं तेव्हा सुदर्शननं अगदी माझंच वाक्य उच्चारलं. त्या वेळी यांनी माझ्याकडे टाकलेली नजर पुष्कळ काही सांगून गेली–पुष्कळ काही–मध्यमवयात संसारसागरावर उठणारी अडचणींची, संकटांची वादळे, कशी निभावू यातून? मुलांना दिलेली आश्वासनं मोडावी लागली तेव्हा ती दोघे नाराज झाली. मोटार काढावी लागली, नोकरमाणसांना रजा द्यावी लागली. स्वतःच्या खर्चाचे पैसे स्वतःच मिळवावे, अशी मी सूचना केली. तेव्हा त्यांचे चेहरे पाहून मला वाटलं, आम्ही इतके दिवस त्यांना सर्व गोष्टी विनासायास पुरवल्या, हे चुकलंच आमचं! सुदर्शनला रेकॉर्ड खरेदीचं असं काही वेड लागलं होतं आणि शुभीचा बहुतेक वेळ बिलोरी आरशासमोर स्वतःचा मेकअप करण्यात जात असे. या एवढ्या आकर्षक आकाराच्या डौलदार कुप्या न् बाटल्या हारीनं उभ्या होत्या आरशापुढे. काय जरूर आहे या खर्चाची! विचारांच्या जाळ्यात गुरफटत मी रिकामं घर आवरायला घेतलं. कुणाला म्हणून स्वच्छता की शिस्त नव्हती. सुदर्शन शाळेत, शुभी कॉलेज–टायपिंग यांत गुंतलेली आणि हे वाचनालयात पेपर बघत शोधत असतील नोकरी. हसतमुख, खिलाडू माणूस नष्ट होत चालला आहे. पैसा नाही, त्यामुळे क्लब बंद, मित्रांच्या गप्पागोष्टी बंद; त्यामुळे चिडचिडा, त्रासिक स्वभाव झाला आहे. घरात काम नाही, नुसते बसलेले पाहिले त्यांना, की मला अगदी कीव व चीडही येते. त्या चिडीतून मग वादावादीला सुरुवात होत आहे. नाही नाही, असं होता कामा नये. मी माझा तोल सावरला पाहिजे. काहीतरी केलंच पाहिजे, केलंच पाहिजे आणि झटकन मला आठवलं ते 'विश्राम' रेस्टॉरंट, त्याचे मालक, आमच्या बाबांचे जिगरी दोस्त. बस्, मदत करतील तर तेच. घर तसंच टाकून मी झटपट साडी बदलली, केस बांधले, कुलूप घालून बसमधून निघाले धावत...लग्न झाल्यापासून ह्यांना न विचारता प्रथमच माझा मी घेतलेला निर्णय–काय फलश्रुती होईल या साहसाची..

रेस्टॉरंटमध्ये आल्यावर मी सरळ नानासाहेबांच्या खोलीची वाट धरली–जाता जाता स्मृतींचं मोहोळ कानाशी गुणगुणत होतं. हसत-खेळत, लाजत-मुरकत साजरे केलेले लग्नदिवस, वाढदिवस–हं, जाऊ दे. हेही दिवस जातील–खोलीच्या दारावर टकटक करताच Yes, come in असा नानासाहेबांचा भरदार आवाज ऐकूनच मला एकदम धीर आला, विश्वास वाटला.–'आं, मृणाल तू?

काय यावेळी ? कुणी आजारी आहे का ? का एखादी पार्टी arrange करायची आहे?' एका दमात त्यांनी अशी प्रश्नांची सरबत्ती केलेली पाहून तशाही अवस्थेत मला हसू आलं. 'तसं काही नाही साहेब–सर्व ठीक आहे–पण आज मी आले आहे ती–मी, मी–तुमची पेपरातली जाहिरात वाचून–नोकरीकरता...' 'ए मृणाल, चेष्टा करू नकोस माझी–तुझं स्वयंपाकातलं कौशल्य – तुझी college मधली बक्षिसं, कप न् पेले-याबद्दल मी सर्व जाणून आहे–पण म्हणजे–अजून जावईबापूंना नोकरी नाही का मिळाली योग्यशी ? माझ्या ह्या हॉटेलात त्यांच्या योग्य काय असणार, म्हणून मी–माझा नाइलाज आहे–यात ते काय करणार ?' या त्यांच्या विधानाचाच धागा पकडून मी म्हटलं, 'हो ना, म्हणून तर मी आले–माझ्या लायकीची आहे ती जागा.' ते चाचरत उत्तरले, 'ते खरं ग, पण–एक तर जागा तात्पुरती–शिवाय जावईबापू काय म्हणतील?' 'पण हा निर्णय माझा मी घेतला आहे–तुम्ही दुसरं कुणी नेमलं नसलं तर–' आणि अर्ध्या तासानं मी बाहेर पाऊल टाकलं ते दुसऱ्या दिवसापासून कामाला येण्याचं कबूल करूनच ! घरी आल्यावर मुद्दयाची गोष्ट रात्रीच्या जेवणाच्या वेळी काढायचं ठरवून मी झपाट्यानं कामाला लागले. बाजारातून चांगलं दोन महिन्यांच्या बेगमी-इतकं सामान आणून टाकलं–घरकामाच्या कामाचा आराखडा तयार केला–अशा जय्यत तयारीनिशी जेवायला बसलो सर्वजण. पण विषयाला तोंड कसं फोडावं हेच मला सुचेना. इथं शुभी माझ्या उपयोगी पडली. 'आई उद्या मी ताराकडे राहणार आहे बरं का रात्री–तिचे आईबाबा पुण्याला जाणार आहेत.' 'बरं झालं सांगितलंस, मी पण उद्या-पासून, '–आणि मी माझ्या नोकरीची गोष्ट काढली. शुभी एकदम ओरडली, 'आई, तू स्वयंपाकीण–' तर सुदर्शन म्हणाला, 'मग आमचं काय ?' 'अरे, घाबरता काय असे ? मी सगळं करून जाईन स्वयंपाकाचं–बाकीचं मात्र–केरकचरा, आवराआवरी हे काम दर्शन तुझं !–शुभे, तू तुझं कॉलेज, टायपिंग, क्लास सांभाळून संध्याकाळचं जेवण बनवायचं. मोनेबाईंच्या मुलाकडे दोन तास बघायचे, त्याचे त्या तुला ४० रु. देणार आहेत, कळलं.' मधेच यांनी गंभीर आवाजात विचारलं, 'आणि मला काय सूचना, ऑर्डर्स ?' शुभी रडव्या आवाजात म्हणाली, 'बाबा, तुम्ही मला मदत कराल ना ?' 'अग ही तात्पुरती योजना आहे. तुम्ही आता मोठे झालात, तेव्हा जबाबदारी कळली पाहिजे तुम्हाला. घराबाहेरचं विश्व पहावं असं मला किती वाटत होतं. अलीकडे खूप स्त्रिया अर्थार्जन करतात–मदत म्हणून, गरज म्हणून–' मी समारोप केला. हे रागवलेले दिसले, पण सध्या संसार सावरण्याला खोट्या अभिमाना-पेक्षा पैशाची गरज होती. कसं समजावू यांना ?

दुसऱ्या दिवशी 'विश्राम'च्या मागच्या-दारानं आत जाणं म्हणजे दिव्य वाटत होतं. पण मी ताठ मानेनं आत पाऊल टाकलं. प्रवेश केल्यावर तिथला तो शुभ्र फेनधवल ॲप्रन चढवल्यावर मी माझ्या कामात अशी काही गुंगून गेले–प्रत्येक पदार्थ म्हणजे माझ्या स्वतःच्या मुलांना भरवण्याचा घास असं मनाशी म्हणत, मी त्यात तनमन ओती–पहिले काही दिवस खूप जड गेले–थकून-भागून घरी जावं तर प्रत्येकजण कामात दंग असे–पटकन उठून त्यांना मदत करावी असे वाटे–पण मी निर्धारानं बसून राही–हे सर्व त्यांना आलंच पाहिजे या विचारानं–पहिला पगार पर्समध्ये सरकवताना मला इतका अभिमान वाटला, माझी मान उंचावली, डोळ्यात नवतेज झळकलं, पायात आपो-आपच चैतन्य आलं–ठरवलं, आता थांबायचं नाही. मग मी माझ्या आजूबाजूच्या सह-काऱ्यांच्या सुखदुःखात लक्ष घालू लागले–भांडी घासणारं आनंदी जोडपे सारखं चिव-चिवत असे, तर झाडूवाली सखू सारखी सिनेमाच्या गोष्टी करी, इडली दोसा बनवणारा स्वामी रगडा फिरवताना सारखा गाणं म्हणे. या क्षुल्लक गोष्टीतही मला स्वारस्य वाटू लागलं. आमचं एक कुटुंबच बनलं होतं जणू. घरी कुरबुरी चालू होत्या. स्वारी नोकरीकरता पृथ्वीपर्यटना-एवढी भटकत होती. पण नन्नाचा पाढा चालू होता. मला अलीकडे घरापासून दूर राहण्यातच विरंगुळा वाटत होता. असं मला कधी वाटेल, असं मी स्वप्नातही चित्रं रेखा-टलं नव्हतं. त्याचं त्या जीवनाचा उबग आला होता. शुभी, सुदर्शन अलीकडे खूप सावरले होते. सुदर्शननं रेडिओ दुरुस्ती शिकून घेतली होती, तर शुभी बऱ्याच लोकांचं टायपिंगचं काम मोनेबाईंच्या टाईपरायटरवर करून हातभार लावीत होती. संध्याकाळी आम्ही एकत्र जेवत असू, तेव्हा माझ्या लक्षात आलं की, मुलं आताशा माझ्याकडे एका नव्याच आदराच्या जाणीवेनं पाहत आहेत. माझ्या सामर्थ्याचा त्यांना प्रत्यय येऊ लागल्याची ही जाणीव फार सुख-कर होती. हे तर हल्ली सारखे म्हणत, 'मृणाल, तू बदलत चालली आहेस. स्वतंत्र बाण्याची, निर्भय स्त्री बनू पाहत आहेस.' खरंच मी बदलत आहे का ? ह्यांचा दुखा-वलेल्या स्वाभिमानाच्या पायावर तर माझी इमारत उभी करत नाही ना ? उद्या माझी नोकरी संपणार होती, तोच नानासाहेबांनी मला दुसरीकडची offer सांगितली. माझ्या अनुभवाचा त्यांच्या धंद्याला फारच फायदा झाला होता. तरी पण मला त्यांचं तात्पुरतं काम सोडणं भाग होतं. मी ती दुसरी नोकरी स्वीकारावी अशा विचारानं घरा-कडे परतले. एकदा यांचा अहंकार मी दुखा-वला होता. तसं न करण्याचं मी यावेळी ठरवलं. यांचा विचार घेऊनच पुढचं पाऊल टाकायचं असा मनोमन निश्चय केला.

घरात पाऊल ठेवताक्षणीच मला तो बदल जाणवला. एक उत्सुक उत्साहाची लाट झुळझुळत आली असं मला वाटलं. दारातच शुभीनं मला मिठी घातली. सुदर्शननं हात धरत आत नेलं तो हे आनंदानं हसत कोचा-वर बसले होते. नेत्रात तीच पूर्वीची निर्भर चमक, उंचावलेले भरदार खांदे. अगदी माझे आनंदी पूर्वीचेच 'हे' – मी बाहू पसरीत यांच्या समीप जात म्हटलं, 'अंहं बोलू नका, मी ओळखलं–' मी घाई करत म्हटलं, 'शुभी चल आज मस्त जेवण, सिनेमा –' 'अंहं आज खाना–पिना–मजा करना – सर्व सर्व बाहेर.' मी खुषीनं यांच्या अंगावर सर्व भार टाकून समाधानाचा निःश्वास टाकला... शुभी हसत म्हणाली, आता कसं पहिल्या-सारखं वाटतं नाही का आई ?' 'नाही नाही, पहिल्यासारखं कसं ? माझी ही लाडुली शुभी ... एक कर्तृत्ववान, चलाख तरुणी बनली आहे. तर हा सुदर्शन एक करारी, निग्रही, स्वतंत्र वृत्तीचा तरुण बनू पाहत आहे– यांचं कारण ... यांची गेलेली नोकरी –या संघर्षातून मला पण एक धडा मिळाला आहे... मी तुमच्या बाबांवर फार म्हणजे फारच विसंबून राहत होते– फार मोठी चूक करत होते मी– आता मला माझं व्यक्तिमत्त्व गवसलं आहे. आता संकटांचे डोंगर मी लीलया पेलू शकते अशी मला जिद्द आली आहे. विश्वास आला आहे, भरवसा वाटत आहे. संसाराची काटेरी उशी आपण सर्वां-नींच उशाखाली घेतली, म्हणून आता पराच्या गादीवर झोपायला मिळू शकेल बरं बाळांनो ! परिस्थिती पूर्वीसारखी नाही शुभी ...'

□

सर्वोत्तम लेखक ( ' टाईम 'वरून )

# □ अॅन्टन चॅकॉव्ह □ जेम्स जॉईस आणि □ मार्सेल प्राऊस्ट

परिचय : जे. एन्. पोंडा (फिनिक्स लायब्ररी, पुणे)

' टाईम ' साप्ताहिकाच्या ७ मार्च १९७७ च्या अंकात ' Education ' या सदराखाली विसाव्या शतकातील १३१ सर्वोत्तम पुस्तकांची यादी आली आहे. ही यादी वाचून झाल्यावर त्यांतली बरीच पुस्तके माझ्या वाचनालयात आहेत असे आढळून आले.

या वेळेला त्या यादीतील पुस्तकांचा व लेखकांचा त्रोटक परिचय करून देतो. हा परिचय करून देताना संदर्भ ग्रंथाचा माझ्याकडील असलेल्या कात्रणांचा व मी स्वतः वाचलेल्या पुस्तकांबद्दलच्या माझ्या मतांचा मी आधार घेतला आहे.

' टाईम ' साप्ताहिक हे जगातील महत्त्वाचे साप्ताहिक समजले जाते. थोडीफार पुस्तके या यादीत manipulation ने आली असतीलही. परंतु ' टाईम 'ला सुद्धा स्वतःची अशी विशिष्ट प्रतिमा ठेवायची असते. त्यामुळे या यादीतील बरीचशी पुस्तके महत्त्वाची आहेत. ' टाईम ' मधील ' बेस्टसेलर ' यादीमध्ये सुद्धा काही पुस्तके manipulation ने निश्चितच येत असतील. परंतु वर सांगितलेल्या कारणामुळे त्या पुस्तकांचे प्रमाण कमी असते.

यासोबत १९०१ पासून १९७३ पर्यंतच्या नोबेल प्राईज् विजेत्या साहित्यिकांची यादी दिली आहे. या लेखनमालेत त्यांतील बरेच लेखक आहेत.

पहिल्याप्रथम नाव आहे अॅन्टन चॅकॉव्हचे. चॅकॉव्ह हा लघुकथांविषयी प्रसिद्ध आहे. त्याने ८०० कथा लिहिल्या. त्याची Three sisters व चेरी ऑर्चार्ड ही दोन पुस्तके या यादीत दिली आहेत. चॅकॉव्ह या रशियन नाटककार व लघुकथालेखकाचा जन्म १८६० साली झाला. तो १९०४ मध्ये दिवंगत झाला. त्याच्या साहित्यात गरीब व गरजवंत रशियन लोकांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत व श्रीमंत, सुखवस्तू लोक हे अगदी कंटाळवाणे व आळशी आयुष्य जगत असत. बुद्धिवंतांचा सर्व वेळ व शक्ती सरकारी कामात खर्च होत असे. तसे झाले नाही तर, इतर unproductive कामात ती शक्ती खर्च होत असे. रशियन जीवन हे फार थिटे आहे, असे चॅकॉव्ह त्याच्या साहित्यातून सांगत असे. रशियात काल, आज आणि उद्या अगदी सारखेच कंटाळवाणे आहेत असे ४४ व्या वर्षी दिवंगत होण्यापूर्वी ती म्हणाला होता. चॅकॉव्हच्या आयुष्याची शोकान्तिकाच झाली होती.

जे आयुष्य जगलेच नाही, किंवा आयुष्य जगून त्याचे चीजच झाले नाही, अशी शोकान्तिका चॅकॉव्हच्या साहित्यात कधी कधी सापडतात. त्याची वर्णनशैली डॉस्टॉव्हेस्की इतकीच संवेदनाशील आहे. चॅकॉव्ह डॉक्टर होता. साहित्यिकांनी विधायक कार्य करावे, असे तो म्हणत असे. तसे तो करूनही दाखवत असे. ( जर्मनीचा गंटर ग्रास हा प्रख्यात साहित्यिकही राजकारणात हिरीरीने भाग घेत असे. ) त्याच्या ४४ वर्षांच्या आयुष्यात त्याने कितीतरी गरीब लोकांना विनामूल्य औषधपाणी दिले. गारठून टाकणाऱ्या थंडीत तो स्वतःच्या प्रकृतीचा विचार न करता हिंडत असे. घर बांधण्यात व बाग करण्यातसुद्धा तो निष्णात होता. चॅकॉव्हचे लग्न ४१ व्या वर्षी झाले. वैवाहिक जीवनात तो सुखी होता, पण ४४ व्याच वर्षी चॅकॉव्ह क्षय रोगाने दिवंगत झाला. कलेसाठी कला नाही परंतु जीवनासाठी कला याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे चॅकॉव्ह. ( येथे आंद्रे मॉलरोची सुद्धा आठवण होते. या प्रख्यात फ्रेंच साहित्यिकाने तर, बांगला देश अत्याचाराच्या वेळेस पाकिस्तानविरुद्ध लढण्याची स्वतःची इच्छा इंदिरा गांधींना पत्राने लिहून कळवली होती. )

पुढे जेम्स जॉईस याचे नाव आहे. त्याचे Ulysses आणि Portrait of the young man as an artist या दोन पुस्तकांची नावे दिली आहेत. जेम्स जॉईसचे Ulysses म्हणजे इंग्रजी साहित्यातला एक आगळा वेगळा प्रयोग. युलीसीसमध्ये डब्लीन शहरातल्या एका दिवसाचे चित्रण केले आहे. Ulysses मध्ये जेम्स जॉइसने ' Stream of consciousness technique ' चा भरपूर प्रमाणात वापर केला आहे. Stream-of-consciousness technique म्हणजे एखाद्या पात्राच्या मनातले विचार भराभर मांडणे. त्या विचारात link नसते, logic नसते, पण विचारांची साखळी असते आणि त्या पात्राच्या विचाराचा केंद्रबिंदू भराभर बदलत असतो. वृत्तान्तात एक प्रकारची असंबद्धता येत असते. आपले conscious मनन म्हणजे एक पहारेकरी सुप्त ( unconscious ) मनातले विचार वर आले की, हा पहारेकरी जागृत होतो व त्या विचारांना दाबून ठेवतो. पण कधीकधी हा पहारेकरी झोपतो तेव्हा सुप्त मन जागृत होते (outcropping of the subconscious). stream of consciousness मध्ये हा जागृत पहारेकरी झोपलेला असतो असे ढोबळपणे म्हणायला हरकत नाही. युलिसिसमधील बराच मजकूर आत्मचरित्रात्मक आहे. ' युलिसिस ' कितीही विनोदी व खोडसाळ असले तरी, शेवटी त्यातून चित्र उभे राहते ते शहरातील बकालीपणा आणि शहरातल्या गर्दीतले एकाकी जीवन याचे. या पुस्तकात जेम्स जॉईसने कितीतरी नवे शब्द व वाक्यप्रयोग टाकले आहेत व बऱ्याच प्रख्यात साहित्यिकांची parody केली आहे.

इलियटने जशी Waste Land लिहून इंग्रजी पद्याला एक वेगळीच कलाटणी दिली आहे, तसेच जॉइसने ' युलिसिस ' लिहून इंग्रजी गद्याला एक वेगळेच वळण दिले.

जेम्स जॉईस हा डब्लिनमध्ये २ फेब्रुवारी १८८३ मध्ये जन्मला. त्याच्या वडिलांना कुणी, ' तुम्हाला किती मुले आहेत ? असे विचारले तर ते म्हणत असत –' असतील सोळा किंवा सतरा ! ' पहिल्या महायुद्धाच्या काळात जॉईस झुरीसमध्ये होता व त्याची आर्थिक परिस्थिती अगदीच खालावली होती. शेवटी प्रीन्ही पर्समधून त्याला £ १०० ची

ग्रँट मिळाली, व एका धनिक स्त्रीने त्याला मदत केली, असेही ऐकले आहे.

२८-७-१९७५ च्या 'टाईम' मध्ये जॉईसबद्दल एक मजेदार चुटका आला होता; तो मी 'युलिसिस' ला डकवून टेवला आहे. ('युलिसिस' अश्लील होते म्हणून त्याच्यावर खटला भरण्यात आला होता.) या चुटक्यात एका माणसाला 'युलिसिस' अगदी भन्नाट आवडले व त्याने जेम्स जॉईसला म्हटले, 'ज्या हातांनी Ulysses लिहिले गेले त्या हाताचे मी चुंबन घेऊ का ?' यावर जेम्स जॉईस तोऱ्यात त्या चाहत्याला म्हणाला, 'पण त्या हाताने इतर अनेक गोष्टी केल्या आहेत !' ('युलिसिस' वर अश्लीलतेचा खटला भरला गेला होता, हे मुद्दाम परत एकदा सांगतो.)

जेम्स, जॉईसने म्हणे त्याच्या गद्यात 'संगीत' (काव्य नव्हे) उतरवले आहे ! त्याचा स्वतःचा आवाज पण सुरेल होता. पॅटरनी एकदा असे सांगितले होते की; 'All art constantly aspires to the condition of music.' म्हणजे आईनस्टाईन म्हणाला होता तसं : 'विज्ञान आणि अध्यात्म थोडया दिवसांनी एकमेकांना भिडतील.'

पुढील नाव आहे प्रख्यात फ्रेंच लेखक मार्सेल प्राऊस्ट याचे. प्राऊस्टने ५० वर्षे लिखाण केले. तो neurotic होता. म्हणजे त्याचा 'मी' पणा त्याने प्रस्थापित व्यवस्थेत हरवला नव्हता. तो आजारी होता. त्याला दम्याचा त्रास होता. त्याला आवाज; प्रकाश व धूळ. अजीबात सहन होत नसे. सुरुवातीला तो समाजात फार लोकप्रिय होता. परंतु पुढे तो एकदम एकाकी बनतो. स्वतःला खोलीत कोंडून ठेवतो व त्याच्या अनुभवविश्वाचा व संवेदनाचा न भूतो न भविष्यती असा वेध घेतो. याच मनःस्थितीत त्याने प्रख्यात 'Remembrance of Things Past' लिहिले. जणू या कलाकृतीला जन्म देण्यासाठीच तो जगू लागला. प्रथम फ्रेंचमध्ये या पुस्तकाचे प्रकाशन १६ भागांत झाले. Remembrance of Things Past याच्यामध्ये काळ घडयाळाच्या लंबकासारखा इकडून तिकडे हलत असतो. त्यात कालक्रम (chronology) नाही. परंतु जणू काळ आणि वेळ या पुस्तकात नेहमीसाठीच अधिष्ठित झाली आहेत. आणि तो कालखंड आहे मार्सेल प्राऊस्ट जीवन जगला त्याविळचा. कला, जीवनाचा अर्थ, शिल्पशास्त्र, प्रेम, समलिंगी प्रेम, अमीर-उमरावांचे विश्व- थोडक्यात म्हणजे सबंध संस्कृतीचेच सारखे बदलणारे दृश्य या पुस्तकात दिसते. कधी कधी त्याच्या लांबलचक वाक्यात आपण जणू एखाद्या सुंदर अभयारण्यात हरवलो आहोत, असा आपल्याला भास होतो.

मार्सेल प्राऊस्टची निरीक्षणशक्ती भलतीच होती. लेखणीची शैली मनोवेधक होती. त्याने मनावर घेतले असते तर, तो एक अत्यंत लोकप्रिय कादंबरीकार होऊ शकला असता. यशासाठी लागणारा सर्व मसाला त्याच्यापाशी होता. पण जसा तो समाजात लोकप्रियतेच्या लाटेवर डौलाने आरूढ असतानाच एकदम एकाकी झाला तसाच तो सवंग प्रसिद्धीपासून अलिप्त राहिला. जेम्स जॉईससारखेच Stream of Consciousness चे तंत्र प्राऊस्टने अवगत केले होते. इंग्रजी साहित्यावरही प्राऊस्टच्या लेखनाचा बराच परिणाम झाला. व्हर्जिनिया वुल्फ या लेखिकेवरही प्राऊस्टने बरीच छाप पाडली. बुद्धी आणि मनोनिग्रह (will) याला प्राऊस्ट कमी महत्त्व देत असे. उत्स्फूर्तता आणि अंतर्ज्ञान यालाच तो प्राधान्य देत असे. □


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | |
|---|---|
| १. एका पिढीचे आत्मकथन : (संपादक : पु. शि. रेगे, वा. ल. कुलकर्णी, रा. भि. जोशी, गं. बं. ग्रामोपाध्ये | रु. २५/- |
| २. सुबोध ज्ञानेश्वरी : (आधुनिक पोशाखातील ज्ञानेश्वरीचा कथारूपी गद्यावतार)-य. गो. जोशी | रु. ४०/- |
| ३. आधार : (कादंबरी)-बाबा कदम | रु. २५/- |
| ४. रमी : (कथासंग्रह)-बाबा कदम | रु. १७/- |
| ५. खुनी नंदकिशोरी : लक्ष्मीदास बोरकर | रु. १६/- |

| | |
|---|---|
| 1. **I Ching** : A New Interpretation For Modern Times- (The Chinese method of fortune telling)-Sam Reifler | Rs. 14·55 |
| 2. **A Tale Told By An Idiot** : (Describing dacoits in MP & other interesting incidents)-R. P. Noronha | Rs. 35/- |
| 3. **Agent In Place** : (Spy Story-Bestseller)-Helen MacInns | Rs. 10/- |
| 4. **The Prophet** : Khalil Gibran | Rs. 15/- |

- नॉन मेंबर्सकरिता डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# खेळिया

## प्रेक्षकांनाही अखेरपर्यंत खेळविणारे नाटक

थिएटर अॅकॅडमीची मराठी रंगभूमीला देणगी ( contribution ) या विषयावर खूप काही लिहिण्यासारखं आहे आणि पुढंमागं मी त्यावर सविस्तर लिहीनही. तूर्त ज्या वैशिष्ट्याचा उल्लेख करायचा ते असं की, या ग्रुपचं आजपर्यंतचं कुठलंही नाटक, प्रसंगी एकांकिकासुद्धा, प्रेक्षकांच्या डोक्याला आणि जिवाला थोडाफार, बहुधा फारच, त्रास दिल्याशिवाय राहात नाही. त्रास हा अर्थातच चांगल्या अर्थानं. निदान मला आणि थिएटर अॅकॅडमीच्या ( टी. ए. हे प्रचलित नाव ) अनेक चाहत्यांना हा त्रास हवाहवासा वाटला आहे. किंबहुना ऊठसूठ प्रेक्षकांच्या काळजाला हात घालणारी, डोळ्यांचे तळ रिकामे करायला धावणारी शाकाहारी नाटकं, किंवा बटबटीत विनोदांनी / वासनांनी / आतडी पिळवटेपर्यंत हसवणारी / चेतवणारी मांसाहारी नाटकं यांच्या भाऊगर्दीत डोक्याला खाद्य पुरवणारी महानिर्वाण, महापूरसारखी नाटकं स्वागतार्ह वाटतात. घाशीरामनं तर इतिहास घडवलाच, पण भलभलत्या लोकांच्या जिवाला भलतासलता त्रासही दिला. अर्थात त्याबाबत नवीन लिहिण्यासारखं काही नाही. मुद्दा असा की, खेळिया हे टी. ए. चं नवीन नाटकही ही परंपरा चालवणारंच आहे. बुद्धिचापल्याच्या बळावर परस्परांना खेळवणाऱ्या दोन खेळियांची ही क्षुंज प्रेक्षकांनाही डोकं वापरल्याशिवाय सहजी उमजणार नाही, अनुभवता येणार नाही. त्या दृष्टीनं बुद्धिबळाच्या डावासारखंच आहे हे नाटक. बुद्धिबळाची एखादी नामी चाल खऱ्या अर्थानं appreciate करायची तर, खेळ पाहणाऱ्यालाही खेळणाऱ्याइतकीच अक्कलहुशारी वापरावी लागत नाही काय ?

खेळिया हे नाटक टी. ए. ची ही परंपरा चालवणारंच आहे असं वर म्हटलंय् आणि ते खरंही आहे. पण तरीही टी. ए. च्या या पूर्वीच्या नाटकांमध्ये हे नाटक आपल्या वेगळेपणानं उठून दिसण्यासारखं आहे. टी. ए. च्या नाटकाची यापूर्वीची एक चौकट मोडण्याचं कामही 'खेळिया'नं केलं आहे, त्याचं मी मन:पूर्वक स्वागत करीन. टी. ए. चं नाटक / एकांकिका म्हणजे निळ्याजांभळ्या पडद्यापुढे लेव्हल्स / डॅडोज् आणि पंचवीस–तीस पात्रांचे समूहदृश्य हा जो समज–अपसमज सामान्य प्रेक्षकांत 'महानिर्वाण'नंतर दृढमूल झाला होता, त्याला धक्का देण्याचं काम प्रथम 'महापूर'नं केलं. या नाटकात सेट आला आणि बऱ्यापैकी नास्तववादी स्टेजप्रॉपर्टी आली. पब्लिकला खटकलेलं आणि न कळलेलं ते 'आतडं' वास्तववादातनं अर्थातच वगळायचं! पात्रांची संख्या महापुरात कमी झाली असली तरीही आठबारा पात्रं होतीच. खेळियामध्ये पात्रांची संख्या यापेक्षाही कमी झाली आहे. साहजिकच त्यांची individuality वाढली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला काही निश्चित आकार, दिशा, dimensions आल्या आहेत. आणि नाट्याभिनयाचा केंद्रबिंदू सामूहिक आविष्कारतंत्रातून उठून वैयक्तिक अभिनयसामर्थ्यात येऊन बसला आहे. एक प्रकारे महापूरनं रुजवात केलेला बदल खेळियानं पुरा केलेला आहे. खेळियाचं सेटिंग त्या दृष्टीनं पाहावं. एवढं संपन्न आणि देखणं नेपथ्य टी. ए. च्या कोणत्याच नाटकात यापूर्वी नव्हतं. ( अर्थात याचा अर्थ टी. ए. नं जादा झाले म्हणून पैसे उधळलेत असा नाही. खेळियाच्या गरजा काही वेगळ्या होत्या, विशिष्ट होत्या आणि त्या भागविल्या गेल्या आहेत एवढंच. ) नमुन्यादाखल म्हणून ज्यांच्या घरात नाटक घडतं त्या आबासाहेब अक्षीकरांचा खाजगी शराबखाना पाहून घ्यावा. दिलखुश प्रकार आहे तो. निदान त्यातल्या रसिकांना. टी. ए. चा या नाटकाचा निर्मितिखर्च दहा हजारांच्या घरात असल्याचं कळलं. हेही नवीनच. ( जाता जाता: खेळियाची गुजराती आवृत्ती 'खेसनदो' या नावानं यापूर्वीच रंगभूमीवर येऊन गेली. त्याचा निर्मितिखर्च साठ हजार असल्याचं ऐकलं आणि थंड झालो. अर्थात त्या नाटकाचे गुणवत्ताविषयक वृत्तान्त ऐकल्यानंतर निर्मितिमूल्य आणि नाट्यमूल्य ही व्यस्त प्रमाणात असतात असं वाटायला लागलं. असो. )

खेळियाची आणखीही काही वैशिष्ट्यं आहेत. एक तर हा प्रामुख्यानं 'स्टोरी-प्ले' आहे. त्याच्या नावामुळं तो, आधी 'कॅरॅक्टरप्ले' असावा असं वाटतं, पण वस्तुतः हे नाटक खेळियांचं असण्यापेक्षा त्यांच्या चढाओढीनं झालेल्या खेळांचं आहे. अगदी निरपवादपणे रहस्यकथा आहे ती. इतकं घट्ट, सूत्रबद्ध, आदि–मध्य–अंत असलेलं आणि इतर नाट्यघटकांवर प्रभुत्व मिळविणारं कथानक टी. ए. च्या नाटकांना प्रथमच लाभलेलं आहे. अर्थात हा प्रश्न चर्चास्पद ठरू शकेल. पण घाशीराम, बीज, महानिर्वाण किंवा महापूर हे सर्व इतक्या ठळकपणे आणि अग्रक्रमानं स्टोरीप्लेज् होते असं मला वाटत नाही. या सर्व नाटकांना कथा अर्थातच होती, पण घाशीराममध्ये नाट्यतंत्र, नाटकाचा form हे कथेपेक्षा वरचढ ठरले. शिवाय नानाची व्यक्तिरेखा भाव खाऊन गेली. 'बीज' मध्ये भावना तर 'महानिर्वाण'-मध्ये विचार आणि 'महापूर'मध्ये कल्पना हे घटक, कथेवर वर्चस्व गाजवून गेले. जास्त ढोबळ वर्गीकरण करायचं झालं तर ही तीनही नाटकं मी 'play(s) of Ideas' या सदरात घालीन. खेळिया मात्र आपल्या गुंतागुंतीच्या, कल्पक आणि निर्दोष कथानकरचनेमुळेच ( plot-construction ) मुख्यत: पकड घेते. यातही दणकट व्यक्तिचित्रण आहे, समलिंगी आकर्षणासारख्या विकृतीची झलक आहे.' विखुरलेल्या ideas आहेत, विशेष म्हणजे रहस्यकथांचाच अगदी उघड आणि broad असा उपरोधही आहे. पण या सगळ्यांना महत्त्व येतं ते कथावस्तूच्या भरभक्कम चौकटीतच. थोडक्यात, कथा ही अन्य नाट्यघटक उठावदारपणे टांगण्यासाठी खुंटी म्हणून वापरली गेलेली नाही, आणि हेही निश्चितच स्वागतार्ह आहे.

अलीकडेच श्री. रत्नाकर मतकरी यांच्याशी भेट झाली आणि 'समोरच्या घरात' या त्यांच्या ताज्या रहस्यनाट्याविषयी बोलणं निघालं; तेव्हा त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला होता. त्यांच्या मते बहुसंख्य मराठी दिग्दर्शक रहस्यनाट्याला वेगळी काहीच treatment देत नाहीत. एखाद्या सामाजिक नाटकासारखंच ते रहस्यमय नाटकही सरळसपाट बसवतात. वेगळ्या वातावरणनिर्मितीकडे पुरेसं लक्ष दिलं जात नाही. शेवटी रहस्यस्फोटापाशी एक बारीक धक्का बसतो. एवढ्यामुळेच त्याला सस्पेन्स थ्रिलर म्हणायचं. याउलट मतकरींनी अनुभवलेले अरविंद ठक्कर, कांती मडिया आणि प्रवीण जोशी हे तिघेही गुजराती दिग्दर्शक रहस्यनाट्याचा

वेगळा विचार करणारे आहेत. मतकरींचा मुद्दा सामान्यीकरण म्हणून रास्त असला तरी 'समोरच्या घरात'ला अरविंद ठक्कर यांनी दिलेली 'ट्रीटमेंट' वेगळी असूनही फारशी सफाईदार आणि कलात्मकदृष्टया समाधानकारक नाही, हेही नमूद केलंच पाहिजे. खेळियाचे दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची हाताळणी वरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर मला वैशिष्टयपूर्ण वाटली. वस्तुतः मतकरी म्हणतात ती रहस्यानुकूल वातावरणनिर्मिती करायला खेळियामधल्या उपहास-विनोदाच्या प्रवाहाचा बऱ्यापैकी अडथळा होण्यासारखा आहे. शिवाय खेळियामधलं रहस्य अधिक बुद्धिनिष्ठ, तर्कनिष्ठ आहे हे लक्षात घेऊन डॉ. पटेल यांनी त्याला शारीरिक संघर्षानं पुरेसं तोलून धरलं आहे. हा शारीरिक संघर्षही त्यांनी दोन प्रकारे वापरला आहे – एक : आबासाहेब अक्षीकर (डॉ. मोहन आगाशे) याला राकेश सोनावणे (डॉ. विद्याधर वाटवे) यांच्यासंबंधी वाटणारं विकृत समलिंगी आकर्षण, आणि दोन : दोघांमधील प्रत्यक्ष शारीरिक चकमक. नाटकात पात्रं कमी असतानाही सतत काही ना काही घडत राहील आणि निरनिराळ्या वेळी रंगमंचाचा कानाकोपरा वापरला जाईल अशी दक्षता त्यांनी घेतलेली आहे. त्यामुळेच नाटक कुठेही थबकल्यासारखं, रेंगाळल्यासारखं किंवा ठराविक ठिकाणी साकळल्यासारखं वाटत नाही. नाटकातील बौद्धिक कसरती exploit करण्याचं काम नाटकाच्या संहितेनं केलंच आहे, तथापि त्यातल्या शारीरिक धाग्यांचा वापर प्रेक्षकांना बारीक धक्के देऊन जागी खिळवून ठेवण्यासाठी करण्याची कामगिरी त्यांनी बजावली आहे. अचूक पात्रयोजना आणि दोन वेगळ्या व्यक्तिरेखांतला फरक ठळकपणे मांडण्यातील श्रेय त्यांचं आहे. तसं नाटकाच्या काहीसा किचकट बनलेल्या तांत्रिक बाजू सांभाळण्याचं श्रेय त्यांच्या त्या त्या सहकाऱ्यांना द्यायला हवं यात नेपथ्यातल्या जिन्याचा उल्लेख करायलाच हवा. या जिन्यामुळे आणि त्यावरच्या सर्रास रहदारीमुळे रंगमंचाला सहसा न लाभणारी अशी उंचीसारखी महत्त्वाची dimension लाभली आहे आणि जब्बार पटेल व नाटकातील पात्रांनी तिचा पुरेपूर उपयोग करून घेतला आहे.

डॉ. मोहन आगाशे व डॉ. विद्याधर वाटवे या दोघांनीही आपापल्या भूमिका जिवंत साकार केल्या आहेत. अनेक प्रसंग त्यांनी आपल्या अभिनयातून झकास खुलवले आहेत. राकेशचे विदुषकी चाळे, विशेषतः विदूषक व बुलफायटरची सांगड, अक्षीकरांनी राकेशला केलेली एकतर्फी मारहाण, नकली दरोडयाची दृश्यं, दुसऱ्या अंकात राकेश अक्षीकरांना खुणेच्या वस्तू शोधायला लावतो तो प्रकार, राकेशसाठी वेषांतराचं साहित्य शोधतानाची धमाल अशी पुष्कळ उदाहरणं आहेत. मोहन आगाशे यांनी इतर पात्रांच्या कल्पनेनंच केलेल्या नकला आणि पहिल्या अंकाच्या ऐन शेवटाशी त्यांनी राखलेलं बिनतोड बेअरिंग अविस्मरणीय. दुसऱ्या अंकात अक्षीकरांच्या धावपळीची राकेशनं केलेली कॉमेंटरीही तशीच.

खेळियाच्या, संशोधित स्वरूपातल्या सध्याच्या संहितेविषयी मी स्वतः तरी असमाधानी नाही. राजाराम हुमणे यांनी केलेलं हे अँन्थनी शॅफरच्या 'स्लुथ' चं रूपांतर, विशेषतः त्यातली भाषा, टी. ए. मधल्याच काहींना विशेष पसंत नसल्याचं ऐकलं. एका विशिष्ट शैलीची किंवा घराण्याची (school) भाषा सवयीची झाल्याचा हा परिणाम असावा. आहे यापेक्षा रोखठोक, रिॲलिस्टिक, अनलंकृत, किंवा आधुनिक वगैरे भाषेत हे नाटक यशस्वीपणे उतरलं असतं असं मला वाटत नाही. कारण मुळात हे नाटक, त्यातलं नाट्य, आपल्याकडंच नाहीच. यातला अक्षीकर नाटकाच्या आणि त्या दोघांच्या परिचयाच्या प्रारंभीच 'तू माझ्या बायकोशी लग्न करणारेस म्हणे!' असा प्रश्न राकेशला करतो. मग थंडपणे त्या लग्नाविषयी वाटाघाटी करतो. हा प्रकार उघडच परकीय वाटणार. यातला शस्त्रांचा व तंत्रयंत्रांचा वापर, समलिंगी आकर्षणाचा उघड व्यवहार हेही सगळं भारतीय नाही. तेव्हा प्रचलित मराठी भाषेची फुटपट्टी खेळियाला लावणं हानिकारक ठरेल. मुळात अँन्थनी शॅफरनं तर, हे नाटक टेनिसच्या खेळातल्या चढउतारांवर बसवलंय्. तो खेळही आपल्याकडं सर्वपरिचित नाही. मात्र मूळच्या नाटकातल्या त्या अनपेक्षित, विस्मयजनक आणि डोकेबाज खेळी – प्रतिखेळचांबद्दल आपण शॅफरला मानलंय्. या लेखाच्या सुरवातीला खेळियाच्या ज्या बुद्धिनिष्ठ आवाहनाचा उल्लेख मी केलाय् त्याचा उगम या दोघा खेळियांचे डाव – प्रतिडाव हाच आहे.

खेळियाची प्रकृती ध्यानात घेता त्याची कथा उघड करण्यात अर्थ नाही. तथापि या खेळियाला घडविण्यात जी प्रमुख मूलतत्वे (elements) सामील आहेत, त्यात अक्षीकरचं विकृत समलिंगी आकर्षण हे एक प्रमुख आहे. किंबहुना त्याचं खेळियापण हे त्याची मूळ धडता आणि त्यावरचं विकृतीचं आवरण यातूनच जन्म पावलेलं आहे, असा निष्कर्ष काढणं फारसं धाडसाचं होणार नाही. 'एकेरी हाक मारल्याशिवाय जवळीक नाही वाटायची', 'माझ्या दूरदेशच्या सहलसम्राटा', 'तुझ्या छक्केपणाचा मला तिरस्कार वाटतो', 'मारण्यापूर्वी तुला स्पर्श करू दे', 'दोन खेळियांनी एकत्र राहायला काय हरकत आहे?' अशी अक्षीकरांची वाक्यं, राकेशशी नाना मार्गांनी सतत लगट करण्याचा त्याचा प्रयत्न, त्याला कपडे उतरवायला लावून आपण ते चवीचवीनं भोगण्याची इच्छा, अशा या विकृतीच्या डझनावारी सूचना नाटकभर विखुरल्या आहेत. अक्षीकरची व्यक्तिरेखा या विकृतीच्याच ताण्याबाण्यांनी विणली गेली आहे, तर राकेश सोनावणेचा पहिल्या अंकातला Submissiveness आणि दुसऱ्या अंकात अक्षीकरांच्या खेळीची प्रतिक्रिया म्हणून त्याच्यात उफाळलेलं तात्पुरतं आणि अपरिपक्व पण लढाऊ खेळियेपण ही त्याच्या व्यक्तिरेखेची वैशिष्टये ठरतात. दिग्दर्शक व दोन्ही अभिनेत्यांनी हे उमजूनच आपापली कामगिरी समर्थपणे बजावली आहे.

खेळिया म्हणजे काय?

या प्रश्नाचं मोठं आकर्षक उत्तर नाटकात दिलं गेलं आहे. त्या लांबलचक वर्णनातलं मला एवढंच आठवतंय की, 'खेळिया हा पूर्ण पुरुष असतो. तर्कशुद्ध तरीही कल्पक. लहान मुलाचा निरागसपणा आणि राजकारणी पुरुषाचा धूर्तपणा या शस्त्रांनी तो जीवनाला सामोरा जातो, वगैरे

मला वाटतं, या व्यक्तिरेखेची आणि वर्णनाची तुलना करीत बसण्यापेक्षा खेळिया म्हणजे खेळविणारा एवढा खुलासा पुरे होईल. निदान तुम्हा–आम्हाला! □

## प्रसिध्द झाले !



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**३०।४।७७ ते ६।५।७७**

**मेष : कौशल्याची गरज**

आज कन्येला चंद्र असून याच राशीत राहू प्रवेश करीत आहे, हे शत्रुस्थान आहे. दुसरा गुरू तर राशीतच बुध-रवी अशी फार छान ग्रहांची रचना आहे. या वेळी तुम्ही जर कौशल्याने व बुद्धीचा योग्य उपयोग केलात तर या वेळी अनेक महत्त्वपूर्ण कामे तुमच्या बाबतीत घडू शकतील. धंद्याची स्थिती सुधारू शकाल. नवा व्यापार अगर स्वतंत्र असा उद्योग हाती घेऊ शकाल. पैशाची कमतरता पडणार नाही. रेस-लॉटरीसारख्या साधनांपासून फायदा होण्याची शक्यता आहे. दूरचा प्रवास टाळा. नोकरीत तुमचे वर्चस्व प्रस्थापित होईल, परंतु वरिष्ठांबरोबर मतभेद-गैरसमज होण्याचा संभव दृष्टिआड करू नका. उत्साह राहील. शुभ दिनांक ३-५.

**महिलांना** : माहेरची वारसदारीची संपत्ती मिळू शकेल.

**विद्यार्थ्यांना** : यशदायक व प्रगतिकारक हा काळ आहे.

**वृषभ : थोडे गोड थोडे कडू**

तसे पाहिले तर हा आठवडा व एकंदर ग्रहमान तुम्हाला उपकारक आहेच. आजच राहू व केतूसारखे दीर्घकाल एकाच ठिकाणी राहणारे ग्रह तुम्हाला उपकारक असे होत आहेत. तुमच्या अनेक योजना आजवर धूळ खात पडल्या होत्या. त्या तुम्ही आता अमलात आणू शकता. त्यासाठी योग्य असे ग्रहमान होत आहे. प्रामुख्याने पैशाची अडचण हा तुमचा मोठा प्रश्न आहे, पण आता तसे काही होणार नाही. तुम्ही आखलेल्या योजनांना तुम्हाला अनपेक्षितपणे पैसा मिळणार आहे. सरकारची कृपा राहणार आहे. प्रामुख्याने तुमचा धंदा स्वयंपूर्ण करण्यासाठी तुम्ही या वेळी जी पावले उचलाल ती उपकारक ठरतील. अडचणी एकदम निवारण होतील असे नव्हे, पण त्या कमी करण्याचे उपाय कारणी लागतील. नोकरीत तुमचे मनोरथ पूर्ण होतील. शुभ दिनांक २९-३.

**महिलांना** : संसारात उत्साह व प्रसन्नता राहील.

**विद्यार्थ्यांना** : तुमच्या प्रयत्नाचे फळ तुम्हाला मिळणार आहे.

**मिथुन : प्रगतीकडे वाटचाल**

गुरू बारावा आहे. आजच राहू चौथा होत आहे. केतू दहावा होत आहे. हे ग्रह तसे फार वाईट आहेत असे नव्हे, परंतु ते तेवढे उपकारक देखील नाहीत. मन सतत उद्विग्न राहणे, उगाचच नैराश्य येणे असे काहीतरी घडू शकेल. जमीन, घर यासंबंधीतला प्रश्न निर्माण होणे शक्य आहे. असे असले तरी तुमच्या प्रगतीत कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. धंदा असो, नोकरी असो, यात फरक पडणार नाही. धंदा प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकेल. त्यासाठी योग्य त्या माणसाचे सहकार्य तुम्हाला मिळू शकेल. तुमच्या मोठेपणात भर पडेल, मित्र व मोठे अधिकारी उपयोगी पडतील. अनपेक्षित अर्थलाभ जरी झाला नाही तरी पैशाची कमतरता पडणार नाही. नोकरीत सारे ठीक चालेल. बदली झाली असेल तर ती रद्द करून घेऊ शकाल. बेकारांना प्रामुख्याने नोकरी मिळेल. लेखन व साहित्य निर्माण होईल. शुभ दिनांक ३-४.

**महिलांना** : ठरवलेले मंगलकार्य पार पडेल. अधिक विचार करू नये.

**विद्यार्थ्यांना** : स्थानांतर होण्याची शक्यता आहे.

**कर्क : कर्तृत्वाला वाव**

तिसरा राहू आजच झाला आहे. केतू भाग्यस्थानी आला आहे. राहू व केतू वाईट असा ग्रह करून घेण्याचे कारण नाही. आजवर तुमच्या अंगी असलेल्या गुणांना वाव मिळत नव्हता, या वेळी मिळू शकणार आहे. ह्यातून बरेच काही अनुकूल होण्याची शक्यता आहे. स्वतंत्र धंदा या वेळी प्रगतीचा नवा उच्चांक गाठील. तुमचा व्यापार असेल तर या वेळी तरी तुमची चलती होणार आहे. व्यापार व धंदा या क्षेत्रात तुम्ही नवे काही तरी निर्माण करू शकाल. नोकरीच्या क्षेत्रात बरेच हितकारक असे घडेल. कामात बदल, अधिकारात बदल असे घडण्याची शक्यता आहे. तुम्ही इंजिनीयर, शेतीतज्ज्ञ असाल तर तुम्हाला बरे दिवस आले आहेत असे समजा. लेखनाला बराच वाव मिळणार आहे. जुने साहित्य पुन्हा लोकांच्या समोर आणू शकाल. शुभ दिनांक ३०-२.

**महिलांना** : नोकरीत स्थानांतर व स्थित्यंतर होईल.

**विद्यार्थ्यांना** : मन प्रसन्न राहील. संशोधन होईल.

**सिंह : संयमाची गरज**

गुरू दशमात आल्यापासून खरे म्हणजे तुमचे सारे तंत्र आक्रमक व प्रगतिकारक बनत आहे. बारावा शनी आहे, तो साडेसातीचे जे जे काही त्रासदायक करता येईल ते करीत आहे. परंतु तो आता तुमचे फारसे नुकसान करू शकणार नाही. मात्र दुसरा राहू आजच तुम्हाला शह देण्यासाठी आला असून, केतू आठवा झाला आहे. हे दोन्ही ग्रह तुमचे आजच काही वाकडे करू शकणार नाहीत. मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेष करून कौटुंबिक

संबंध–मग ते भावाभावांतील असो वा नवराबायकोतील असो–तापले जाणार नाही याची काळजी घ्या. कोणतेही काम असो, संयमाने केल्यास ते हितकारक ठरेल. सार्वजनिक कामात प्रतिष्ठा उंचावेल. नोकरीत उत्पन्न वाढेल. वरिष्ठांच्या मर्जीचा लाभ प्रत्ययाला येईल. शुभ दिनांक १–४.

महिलांना : मानापमानासाठी भांडत बसणे शक्य तो टाळा.

विद्यार्थ्यांना : शालेय स्थित्यंतर घडण्याची शक्यता आहे.

**कन्या : व्यक्तिमत्त्व उंचावेल**

भाग्यस्थानी गुरू आहे. रवी-मंगळ एवढे अनुकूल नाहीत. ते तब्येतीला सारखे काही तरी अस्वस्थ ठेवण्याचा प्रयत्न करणार आहेत. आजच राहू राशीत येत आहे. राहू-रवीं यांचा षडाष्टक योग होणार आहे. हे असे थोडे फार प्रतिकूल ग्रह असले तरी, प्रत्यक्षात तुम्हाला कोणताच त्रास होणार नाही. उलट व्यक्तिमत्त्व उंचावणार आहे. महत्त्वपूर्ण गाठीभेटी होऊन आगामी अनुकूल घटनांची नांदी यातून गायिली जाईल. अनेकांशी चांगले संबंध सुधारतील. आर्थिक बाजू भक्कम नसली तरी चांगली राहील. दूरचा प्रवास घडण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु होतील. नोकरीची बाजू स्थिर राहील. पगारवाढ, भत्ता वगैरे बाबतीत वरिष्ठांकडून सहानुभूतीने विचार होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक आनंद मिळू शकेल. शुभ दिनांक ३०–३.

महिलांना : पित्त व उष्णता याबाबतीत दक्षता पाळा.

विद्यार्थ्यांना : या वेळी परीक्षेचा रिझल्ट तुम्हाला आनंद देणार आहे.

**तूळ : सावध राहणे इष्ट**

गेले काही दिवस तूळ राशीच्या व्यक्ती अनेक क्षेत्रांत आघाडीवर होत्या. कला, शास्त्र, संशोधन, राजकारण इत्यादी बाबती तुमच्यावर प्रकाशझोत पडत होता, परंतु आता तुम्ही पूर्वीइतके सैल राहून चालणार नाही. कारण दीर्घकाळ एकाच ठिकाणी राहणारे राहू-केतूसारखे ग्रह आता तुम्हाला प्रतिकूल झाले आहेत. ते ताबडतोब काही प्रतिकूल घडणार नसले तरी, त्यांचा तुम्हाला बेसावध राहू नका असाच इशारा आहे. राहू बारावा झाला आहे. मानसिक, शारीरिक व भावनिक या सर्वच बाबतीत त्याची प्रतिकूलता जाणवणार आहे. व्यापार स्थिर ठेवण्याची नवी समस्या होणार आहे. कर्ज काढण्याची इच्छा नसताही ते काढावे लागणार आहे. अनेक कल्पना मनात असतील; पण मन उत्साही राहणे कठीण. नोकरीत पूर्वीइतकी अनुकूलता राहणार नाही. वरिष्ठांची तुमच्याबाबतीत वागण्याची 'नवी तऱ्हा' लक्षात येऊ लागेल. शुभ दिनांक २-४.

महिलांना : घरगुती वा सार्वजनिक कोणताही व्यवहार काळजीपूर्वक करा.

विद्यार्थ्यांना : अभ्यासावरील लक्ष उडणार नाही, याची काळजी घ्या.

**वृश्चिक : आशादायक स्थित्यंतर**

दीर्घकाळ बाराव्या स्थानी ठाण मांडून बसलेला राहू आजच बदलत आहे व तो तुम्हाला अनुकूल साथ देण्यासाठी येत आहे. अनपेक्षित खर्च, अनेक बाजूने अनपेक्षित नुकसान होण्याचे आता थांबणार आहे. जे काही कराल ते हितकारक ठरेल. धंदा आणि नोकरीमध्ये झालाच तर लाभ होईल. तुम्ही जर रेसमध्ये आजवर पैसा घालवला असेल तर, आता पैसे मिळणार आहेत. तुमचा धंदा कोणताही असो, त्यातील तोटा थांबणार आहे व फायद्याचे नवे पर्व सुरू होणार आहे. नवा असा कोणताही उद्योग सुरू करता येईल. त्यात योग्य अशा माणसाचे सहकार्य मिळणार आहे. जमिनीचा, शेतीचा, राहण्याच्या जागेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटणार आहे. नोकरीत आजवर होत असलेले गुप्त शत्रुत्व आता जाणवणार नाही. बढती मिळेल. शुभ दिनांक ३०–४.

महिलांना : नोकरीच्या बाबतीत मनोरथ पुरे होतील.

विद्यार्थ्यांना : यशाचे मोठे समाधान मिळणार आहे.

**धनू : नोकरीत अनुकूल वातावरण**

चौथा मंगळ उगाचच मानसिक खळबळ चालू ठेवणार आहे. पण त्यामुळे नुकसान होणार नाही. पाचवा रवी उत्तम आहे. प्रगतीच्या नव्या योजना आखा व ठरवून उद्योगाला लागा. सहावा गुरू मात्र एवढासा चांगला नाही. उपासनेत अडथळे, अध्यात्मात अडथळे व वाचन-मनन करण्यात अडचणी असे काही तरी होऊ शकेल. असे असले तरी धनू राशीची माणसे आता अनेक क्षेत्रात चमकणार आहेत. राहूसारखा दीर्घकाळ एकाच ठिकाणी राहणारा ग्रह आजच दहावा झाला आहे. हा दहावा राहू नोकरीत अनुकूल वातावरण निर्माण करणार आहे. राहू–केतू हे दुष्ट ग्रह झाले तरी ते स्थानपरत्वे अनुकूलसुद्धा फळे देतात. तुमच्या उत्पन्नात वाढ होईल. अधिकारात वाढ होईल. मालक–वरिष्ठ यांच्या मनात सहानुभूती व आपुलकी निर्माण होईल. काही नवे धाडस हातून घडू शकेल. शुभ दिनांक २–६.

महिलांना : मन प्रसन्न राहून घरगुती उद्योगात श्रमाचे चीज होईल.

विद्यार्थ्यांना : बौद्धिक यश आनंद मिळवून देईल.

**मकर : अपेक्षित बदल**

मकर रास ही शनीच्या प्रभावाखालील रास आहे. कष्टाळू व राजकारणात रस घेणारी माणसे याच राशीत असतात. पण या राशीच्या व्यक्तींनी सध्या काही काळ तरी राजकारणात भाग घेऊ नये. इतर

सार्वजनिक क्षेत्रात काही तरी पराक्रम करण्याची संधी मिळेल. धंदा अपेक्षेप्रमाणे वाढवता येईल. बदल करता येईल. शेती, व्यापार, वाहनांची इतर कामे यशस्वीपणे करता येतील. त्यास हवे ते बुद्धिसामर्थ्य पणाला लावता येईल. तुम्ही जर लेखक असाल तर, वैचारिक वाङ्मय निर्माण करण्याची संधी मिळेल. सार्वत्रिक मोठेपणा चालत येईल. घरगुती वातावरण सुधारेल. नातेवाईक सामर्थ्याचा हात पुढे करतील. नोकरीत समाधान मिळेलच असे मात्र नव्हे. वरिष्ठांच्या गोड बोलण्यावर विश्वासून राहू नका. मालकाच्या सहानुभूतीवर फसू नका. एखाद्या जुन्या प्रकरणापासून अंतर देण्याची शक्यता असेल. मन स्वच्छ ठेवून चांगल्या हेतूने वागलात तर उत्तम होईल. शुभ दिनांक ३–५.

महिलांना : तब्येतीच्या अनेक तक्रारी दूर होतील.

विद्यार्थ्यांना : हातून दानधर्म – उपासना असे काही तरी घडेल.

**कुंभ : अडचणींवर मात**

राशिस्वामी सहावा आहे. तो शत्रुस्थानी आहे, ही खरे म्हणजे अनुकूल अशी गोष्ट आहे. विरोधक तुम्हाला सतत अडथळे निर्माण करीत राहणार. पण ते दूर करण्याचे व त्या विरोधकांना धडा शिकवण्याचे सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होईल. व शनी तुम्हाला अनेक क्षेत्रांत आता प्रतिष्ठा व कीर्ती मिळवून देणार आहे. राहू आजच भाग्यात प्रविष्ठ झाला आहे. तो तुमचे मानसिक सामर्थ्य वाढविण्यास उपकारक ठरणार आहे. पैशाची काळजी दूर होईल. अनेकांबरोबर विचारविनिमय घडेल. नोकरीत समाधान राहील. अडचणींवर मात कराल. वरिष्ठांच्या मनातील गैरसमज दूर होतील. हितकारक घटना घडतील. बदलीची शक्यता आहे. पण ही बदली तुमचे अधिकार वाढवील. उत्पन्नात भर घालील. घरगुती उद्योगधंदे प्रगतीचा मार्ग दाखवतो. बेकारांना काम मिळेल. प्रयत्नाचे फळ त्यांच्या पदरात पडेल. राजकारणात चलती राहील. शुभ दिनांक ३०–२.

महिलांना : स्वतंत्र धंदा चांगला होऊ शकेल.

विद्यार्थ्यांना : शाळेत बदल करायला हरकत नाही.

**मीन : मानसन्मान वाढेल**

आजच केतू राशीत आला आहे. तो दुसरा होता तेव्हा त्याने पैशाच्या दृष्टीने तुम्हाला बराच त्रास दिला असेल. पण हा केतू तुमचे मानसिक धैर्य वाढविण्याचे कार्य करणार आहे, केतू व शनी यांचा योग प्रत्यक्षात नसला तरी, त्याचप्रमाणे त्यांचा लाभ होणार आहे. नोकरीत तुम्हाला हवे ते काम वरिष्ठांबरोबर वाटाघाटी करून मिळवू शकता. बेकारांना स्वतंत्र धंदा अधिक फलदायी होईल. तुम्ही लेखक असाल तर अपुरे लेखन पुरे करता येईल. कल्पनारम्य, अद्भुत असे काही तरी लेखन हातून लिहून होईल. विचारविनिमय करून मार्ग काढणे उपकारक ठरेल. हट्ट उपयोगाचा नाही. मुलांच्या बाबतीत देखील 'माझे ते खरे' ही वृत्ती ठेवू नका. आर्थिक बाजू भक्कम होईल. शुभ दिनांक ३०–४

महिलांना : विवाहित स्त्रियांनी यजमानांच्या सल्ल्याने वागणे हितकारक ठरेल.

विद्यार्थ्यांना : आवडत्या शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश होईल. □


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

विद्यार्थी साहाय्यक समिती आणि इन्व्हेस्टमेंट इन् मॅन यांचा

# विद्यार्थिनींचा वासंतिक वर्ग : मे १९७७

व्यक्तिमत्त्वाचा विकास या उद्दिष्टावर आधारलेले उन्हाळी व हिवाळी सुट्ट्यांतील दोन आठवड्यांचे खास अभ्यासवर्ग महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी गेली पाच वर्षे घेण्यात येत आहेत. पुणे येथे घेण्यात अलेल्या दहा वर्गांमध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे साडेपाचशे विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. त्यांतील काही विद्यार्थिनींच्या पुढाकाराने आणखी दहा वर्ग श्रीपूर, सोलापूर, ठाणे, विलेपार्ले, रत्नागिरी, औरंगाबाद, मालेगाव येथे योजिले गेले. वर्गांचा हा उपक्रम विद्यार्थी साहाय्यक समिती आणि इन्व्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांतर्फे आयोजित केला जातो.

आपले विचार इतरांपुढे मांडणे, चर्चा–संवाद करणे, एवढेच काय, पण योग्य विचार कसा करावा हे समजणे-ही सर्व अभिव्यक्तीची अंगे आहेत. रूढ अभ्यासक्रमात यांवर अल्प भर दिला जातो. ही उणीव काहीं अंशी भरून काढावी हा प्रस्तुत वर्गांचा उद्देश आहे. याकरिता, उपयुक्त विषयांवरील माहिती व चर्चा, छंद, शिक्षण, व्यायाम व सांघिक खेळ, सामाजिक जीवनातील प्रश्नांचा परिचय, कलांची ओळख वगैरे विविध गोष्टींचा समावेश वर्गांच्या कार्यक्रमात असतो.

यंदाचा वासंतिक वर्ग सोमवार दि. २३ मे ते रविवार दि. ५ जून या काळात होणार आहे. १२ वी नंतरच्या विद्यार्थिनींना ( वय वर्षे १६ ते २५ ) या वर्गासाठी प्रवेश दिला जाईल. वर्गाचे शुल्क ( राहण्या-जेवण्याच्या खर्चासह ) रु. ५०/– आहे. छंदाच्या शिक्षणासाठी रु. १५/– जादा द्यावयाचे आहेत. सामान्य आर्थिक स्थितीतील विद्यार्थिनींना शुल्कामध्ये आवश्यक ती सवलत देण्यात येईल. विद्यार्थिनींच्या राहण्याची व वर्गाची सर्व व्यवस्था, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय विद्यार्थी भवन येथे होईल.

वर्गात भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी खालील पत्त्यावर लिहून ( ५० पैशांच्या तिकिटासह ) प्रवेश अर्ज मागवावेत. प्रवेश अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक १० मे १९७७ हा आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता–
विद्यार्थी साहाय्यक समितीचे वसतिगृह,
११३७/१३, मॉडेल कॉलनी,
पोलीस मैदानाजवळची गल्ली, पुणे १६.
प्रत्यक्ष भेटीची वेळ : सायंकाळी ५ ते ७.

निर्मला पुरंदरे
संचालिका

# ' आर डॉक्युमेंट ' : दोन अभिप्राय

□ " तुम्हाला लिहावे असे वाटले ते ' माणूस ' दिवाळी अंकातील ' आर डॉक्युमेंट ' या पुस्तकाच्या संक्षेपित अनुवादाबद्दल. अनुवाद अत्यंत प्रभावी आहे. नेहमीच अनुवादात भाषा आणि आशय यांच्या कमीपणाची जाणीव होते. विशेषत: संक्षेपामध्ये हे घडण्याची जास्त शक्यता असते. मी स्वत: ' आर डॉक्युमेंट ' हे मूळ पुस्तक वाचले आहे. त्यामुळे तर आपल्या अनुवादाचे सामर्थ्य अधिक जाणवले. आपण या निमित्ताने एका अत्यंत उपयुक्त वास्तवाचे प्रभावी दर्शन घडवले त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन. "

**—बापूसाहेब काळदाते** (खासदार)
(नाशिक मार्ग मध्यवर्ती कारागृहातून १४।११।७६ रोजी
अशोक जैन यांना पाठवलेल्या एका पत्रातून)

□ आणीबाणीच्या काळात गळयात सोनेरी साखळया मिरवणारी थोर थोर मंडळी दातखीळ बसल्यासारखी गप्प होती. अशा वेळी अशोक जैन यांनी ' दि आर डॉक्युमेंट 'चा अनुवाद करावा आणि ' माणूस 'ने तो प्रसिद्ध करावा हे खरोखरच एक अप्रूप होते. घटनादुरुस्तीच्या गोंडस मिषाने नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेता येतात व त्या मार्गाने लोकशाही जीवनपद्धतीचे रूपांतर हुकूमशाहीच्या सुरवंटात होऊ शकते. वॉटरगेट प्रकरणामुळे अमेरिकेला आलेला हा अनुभव आपल्यालाही आणीबाणीकाळात येत राहिला.
या कादंबरीच्या अफाट यशाचे हे एक रहस्य आहे.

**—प्रा. राम बापट**

**आर डॉक्युमेंट । अनुवाद : अशोक जैन**
**राजहंस प्रकाशन । मूल्य : दहा रुपये**